च
२९५

॥ श्री ॥

[...]नंत सभासद-विरचित

# [...]पतीचें चरित्र.

सातारा
४६
[...]हें वाचनालय, सातारा.

अनेक प्रतींवरून शुद्ध करून अर्थ-निर्णायक व
अवांतर माहितीच्या विपुल टिपांसह

**रा. ब. काशिनाथ नारायण साने, बी. ए.**

यांनीं प्रकाशित केलें.

५२
ग्रंथ स्थानांक - ६६४
९९०
१।-

" यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥
परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम्
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥

भगवद्गीता-४.

आवृत्ती चौथी.

( कापीराइट वगैरे सर्व हक्क प्रकाशकांनीं आपणाकडे ठेविले आहेत. )

शके १८४५.

---

**KRISHNÁJÍ ANANT SABHÁSAD'S**

# LIFE OF ŚIVA CHHATRAPATI.

EDITED WITH COPIOUS CRITICAL AND EXPLANATORY NOTES
BY

**R. B. KÁSHINÁTH NÁRÁYAN SANE, B. A.**

" For whenever virtue begins to droop
And vice rampant grows, O son of Bharata !
I create myself." " I take birth in each age
For establishing order and law ; for the protection
Of the good and the destruction of evil-doers."

*Bhagavat-Gita—4.*

FOURTH EDITION.

*( Right of Translation and all other rights reserved. )*

***A. C. 1923.***

श्री

महाराष्ट्राच्या भाषेचा आणि इतिहासाचा आस्थापूर्वक
अभ्यास करूं इच्छिणाऱ्या सज्जनांस
हा ग्रंथ
परमप्रेमपूर्वक अर्पण करितों.

ग्रंथ-प्रकाशक.

---

RESPECTFULLY OFFERED TO THE
STUDENT OF THE LANGUAGE
AND HISTORY OF THE
MARÁTHÁS.

*THE EDITOR.*

---

पुणें येथें ' आर्यभूषण ' छापखान्यांत अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें,
व रा. ब. काशिनाथ नारायण साने, यांनीं कल्याण येथें
प्रसिद्ध केलें.

SHRI.CHA.PRATAPSINH
MAHARAJ (THORALE)
NAGAR WACHNALAYA, SATARA.
088442

# श्री शिव छत्रपतीचें चरित्र.

४६

## उपोद्घात.

१. हें चरित्र रा० रा० कृष्णाजी अनंत सभासद यांनीं लिहिलें. हे थोरले राजाराम महाराज यांच्या पदरीं सभासद होते. थोरले महाराज म्हणजे शिवाजी राजे यांचें वृत्त प्रथमपासून विदित करावें, अशी राजाराम महाराज यांनीं आज्ञा केल्यावरून हें चरित्र तंजावर येथें मशारनिल्हे कृष्णाजी यांनीं लिहिलें. कृष्णाजी अनंत यांच्या घराण्याबद्दल जी काय थोडीशी माहिती कोल्हापूर येथें मिळाली ती येथें देतों. नारो कृष्ण सभासद हल्लीं कोल्हापुरीं सरकारवाड्यांत खाजगीकडील कारकून आहेत. यांच्या वडिलांचे पणजे त्रिंबक सदाशिव सभासद हे करवीर सरकारच्या राज्यांत, तें राज्य स्थापिलें त्यावेळींच आले. त्यास अजमासें २०० वर्षें होत आलीं. यांचे पूर्वज साताऱ्या नजीक वसंतगड आहे तेथें राहात असत. हल्लीं कांहीं वंशज हिंदुस्थानांतही आहेत. सभासद हे इकडे आल्यापासून त्यांनीं ह्या राज्यांत मोठमोठीं कामें केलीं. चिटणिशीकडील व कोठीकडील कामें पूर्वीं त्यांजकडेच होतीं. चरित्राचे कर्ते कृष्णाजी अनंत यांविषयीं नारो कृष्ण यांस विशेष माहिती नाहीं. अर्थात कोल्हापुरास गादी स्थापन होण्याच्या पूर्वीं कृष्णाजी अनंत होऊन गेले, तेव्हां जो पुरुष कोल्हापुरास ताराबाईबरोबर गेला त्याच्या वंशजांस कृष्णाजीबद्दल विशेष माहिती असण्याचा फारसा संभव कोठला ? ह्या पलीकडे ह्या चरित्रकाराची माहिती मिळत नाहीं. मात्र कृष्णाजी अनंत यांचें नांव शिवाजीच्या ब्राह्मण सुभेदारांमध्यें चित्रगुप्त देतो. ( शिवाजीची बखर, पृ० १२७, पाहावें. )

२. ह्या चरित्रांत अर्थात शिवाजी राजे यांचें वृत्त कथन केलें आहे. राजे यांच्या पूर्वजाची हकिकत जशी असावी तशी यांत दिलेली नाहीं. इतक साद्यंत खुलासेवार चरित्र लिहिण्यास जितका वेळ व स्वस्थता पाहिजे

तितकी ती सभासद यांस मिळाली नसावी, असें राजाराम महाराजांच्या कारकीर्दीत जी धामधूम चालली होती तिजवरून अनुमान होतें. तथापि शिवाजी राजे यांनीं जीं जीं महत्कार्यें आरंभून सिद्धीस नेलीं त्यांतून एखाद्याचें वर्णन सभासदांनीं आपले संक्षिप्त चरित्रांत गाळल्याचें बिलकूल आढळत नाहीं. शिवाजी महाराजांचे पश्चात १७।१८ वर्षांनींच सभासदासारख्या " पुरातन माहितगारानें " हें चरित्र लिहिलें यावरून तें विशेष विश्वसनीय असें म्हणण्यास हरकत नाहीं.

२. आम्हांकडे ह्या चरित्राच्या एकंदर पांच प्रती आल्या. पैकीं दोन अस्सल व तीन अलीकडे केलेल्या नकला होत्या.

( अ ) प्रथम प्रत प्रतापगड येथील पुजारी यांजकडून आम्हांकरितां रा० रा० दामोदर भिकाजी जठार यांनीं मिळविली. ही अस्सलच मिळाली. ही फार जुनी असून घोंटीव जुंनरी कागदाच्या अर्ध बंदांवर एका आंगानें लिहिलेली आहे. अक्षर सुरेख वळणदार आहे. हिचे ३०५ बंद आहेत. त्यांपैकीं १२१ पासून १२५ पर्यंत ५ बंद गहाळ झालेले आहेत; बाकी सर्व बंद शाबूद आहेत. ही प्रत—निदान हें चरित्र—शके १६१६ मध्यें चंदी चंदावर येथें लिहिली असें तिच्या शेवटीं लिहिलें आहे. ज्या ज्या प्रतींत मूळ लेखाचें साल दिलें आहे तेथें १६१६ हेंच दिलें आहे. परंतु संवत्सरावरून पाहतां ही बखर १६१९ मध्यें लिहिली असें होतें. संवत्सरही सर्वत्र एकच आहे. तो ईश्वर हा होय. शकाच्या आंकड्यांची चुकी सर्व प्रतींत दृष्टीस पडते. ती कशी घडली असेल ती न कळे. असो. ही प्रत फार जुनी, तशांत प्रतापगडावरील असल्यामुळें, हिचीच प्रत ह्या पुस्तकांत प्राधान्येंकरून येईल. क्वचित फेरफार करणें बरें वाटल्यास दुसऱ्या प्रतीवरून केला जाईल. ह्या प्रतीचें नांव ' प्रतापगडची प्रत ' असें ठेवूं.

( आ ) दुसरी प्रत पुणें येथील नेटिव जनरल लायब्ररींत मिळाली. ही इ० स० १८५२ सालीं तयार केली असें तिच्या शेवटीं लिहिलें आहे. प्रत तयार करणारानें जुनी भाषा जागोजाग काढून नवीन अलीकडील भाषा

... वाचनालय, सातारा.



सातारा नगर वा...

घालण्याचा प्रयत्न केला आहे, व कांहीं ठिकाणीं तर मूळांतलि मजकूर गाळलाही आहे, असें ही प्रत ' प्रतापगडचे ' प्रतीशीं ताडून पाहतां कळून आलें. ही फुलस्क्याप कागदाच्या वर्खांवर दोन्ही बाजूंनीं लिहिलेली आहे. हिचीं पृष्ठें १८५ आहेत. अक्षर सुवाच्य व सुरेख आहे. ही बुकाप्रमाणें बांधलेली आहे. ह्या प्रतीचा तिच्या भाषेंत बदल केला असल्यामुळें अर्थात फारसा उपयोग झाला नाहीं. कोठें कोठें अर्थनिर्णयाच्या मात्र ती उपयोगीं पडली. ही ' **पुणें** प्रत. '

( **इ** ) **साताऱ्याहून** दोन प्रती आम्हांस मिळाल्या. पैकीं १ नक्कल आहे. ती साद्यंत आहे. ही कोठल्या प्रतीची नक्कल हें समजत नाहीं. प्रतापगडचे प्रतीशीं ही पुष्कळ अंशीं जमते. ही ' **सातारा** प्रत. '

( **ई** ) दुसरी **साताऱ्याहून** मिळाली ती अस्सल आहेसें वाटतें. ही त्रुटित आहे. पहिला बंद गहाळ झाला आहे. पुढें २५ बंदांपर्यंत ती उपलब्ध आहे. तितक्यांत अफजलखानाचा वध करून प्रतापगडीं श्री जगदंबेचें मंदिर बांधण्याचें काम लाविलें, इतकी हकिकत आहे. ही साध्या खर्ची कागदावर लिहिली आहे. ह्या दोनही प्रती **साताऱ्याहून** रा० रा० कृष्णाजीपंत आचार्य कालगांवकर यांजकडून मिळाल्या.

( **उ** ) **पांचवी** प्रत **महाड** येथील रा० रा० **अंताजी रामचंद्र हरडीकर** यांनीं एका जुन्या प्रतीवरून नक्कल करून पाठविली ती होय. हिच्या व प्रतापगडच्या प्रतीच्या पाठांत पुष्कळ ठिकाणीं अंतर असतें. तें स्थळीं स्थळीं दर्शविलें आहे. हिच्यांत क्वचित ठिकाणीं डफ साहेबाच्या ग्रंथावरून फेर केलेला भासतो.

---

## आवृत्ती तिसरी. ( शके १८३४ ).

ही आवृत्ती पहिल्या व दुसऱ्या आवृत्तींचीच प्रतिमा आहे. किरकोळ फेरफार केले आहेत ते येणेंप्रमाणें:--

( १ ) मागील आवृत्तींत राहिलेलीं अशुद्धें काढून टाकिलीं आहेत.

( २ ) पूर्वीच्या आवृत्तींत अपरिचित अशा शब्दाचा अर्थ जेथें जेथें तो शब्द आला तेथें तेथें टीप देऊन दर्शविला होता. आतां एकदां अर्थ दिल्यावर पुन्हां त्याच शब्दाचा अर्थ देण्याची जरुरी विशेष नसल्यामुळें तसें करण्याचें बहुधा टाळिलें आहे. तथापि जागोजागीं नवीन टिपा देऊन विशेष माहिती अलीकडे उपलब्ध झाली ती नमूद केली आहे.

( ३ ) टिपांत दिलेल्या पाठांतरांपैकीं जीं निरुपयोगी दिसलीं तीं गाळिलीं आहेत, व कांहीं पाठांतरें चांगलीं वाटलीं तीं मूळांत घालून मूळांतील पाठ टिपांत दिले आहेत.

( ४ ) पुस्तकाचा आकार बदलून अधीक सोईचा केला आहे.

---

## आवृत्ती चौथी.

ही आवृत्ती तिसऱ्या आवृत्तीचीच प्रत होय, तेव्हां तिजबद्दल विशेष लिहिणें नको. मात्र हिजमध्यें अलीकडे १०।१२ वर्षांत उपलब्ध झालेली नवीन माहिती टिपांत ठिकठिकाणीं नमूद केली आहे. शुद्ध लिहिण्यासंबंधें जे फेरफार केलें आहेत ते भाऊसाहेबांच्या बखरीच्या " आरंभींचे चार शब्द " याचें कलम ५ मध्यें नमूद केलेले आहेत, तेच होत.

कल्याण,<br>शके १८४५. } **का० ना० साने.**

---

सातारा नगर वा
सातारा

# शुद्धिपत्र.

[ शुद्धिपत्राप्रमाणें शुद्ध करून मग ग्रंथ वाचावा. ]

| पृष्ठ | ओळ किंवा टीप | अशुद्ध | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ४ | टीप १९ | अस | असें |
| ,, | ,, २० | राज्यव्यवहार | राजव्यवहार |
| ,, | खालून ओळ ६ ,, २५ | व्यथ | व्यर्थ |
| ६ | ११ | कतव्य | कर्तव्य |
| ६ | १२ | बोलावृन | बोलावून |
| ,, | टीप ४७ | धाकरी | धारकरी |
| ११ | ८ | सुमानजी | सुभानजी |
| १४ | ११ | कळलियावा | कळलियावरि |
| ,, | १२ | हुकम | हुकूम |
| १५ | टीप ९६ | ऊर्जित करणे | ऊर्जित करणें |
| १६ | ,, १२ | भांडियचिा | भांडियाची. |
| २३ | २० | तळ-कोंकणांत | * तळ-कोंकणांत |
| ,, | खालून ओळ २ टीप | तळकोंकण | * तळकोंकण |
| २५ | १६ | मजमुदा-रास | मजमुदारास. |
| २७ | १९ | वरांता | वरातीं |
| ,, | २१ | वैंरातेने | वरातेनें |
| ३२ | टीप ९६ | वाकनास | वाकनीस |
| ३२ | टीप ९६ | त्यांवेळी | त्यावेळीं. |
| ३४ | ,, १० | शंत्र | शत्रू |
| ३५ | २४ | दिलामा | दिलासा. |

| पृष्ठ | ओळ किंवा टीप. | अशुद्ध, | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ३५ | टीप १४ | व्यथ | व्यर्थ |
| ३७ | ७ | दक्षण | दक्षिणा |
| ४५ | ९ | रांजियानीं | रांजियांनीं |
| ५३ | टीप ‡ | रामेय | समय |
| ६३ | १२ | दहा | दाहा. |
| ,, | १८ | दोनप्रहर | दोन प्रहर |
| ,, | टीप १५ | पिशवी. | पिशवी, कसा. |
| ,, | ,, १६ | मुरंतेदी | मुस्तेदी. |
| ६४ | १४ | त्यांस...गर्दीस | त्यास मारून गर्दीस |
| ,, | टीप १९ | रोजउदाराम | राजे उदाराम |
| ,, | ,, २४ | पलण | पालाण |
| ६५ | ,, २५ | पाठविलं | पाठविलें |
| ,, | ,, २६ | ग्रांटडफ | ग्रांटडफ. 'होदेगिरे' असें खरें नांव अलीकडील शोधानें ठरतें. |
| ७० | टीप ३७ | सें ग्रांट* | असें ग्रांट* |
| ७४ | ,, ५० | शौय | शौर्य |
| ७६ | ,, ५५ | कोशः | कोश. |
| ,, | ,, ५७ | हरोल स्यात् | हरोलः स्यात् |
| ७७ | ,, ५८ | तिची दुसरी | त्यांची दुसरी |
| ७८ | ,, ६२ | अर्धांगवायु | अर्धांगवायू |
| ७९ | १ | मृत्यु | मृत्यू. |
| ८२ | टीप ७६ | प्रतात मात्र | प्रतींत मात्र |
| ८३ | ,, ७७ | पुढाल | पुढील. |
| ,, | ,, ७८ | स्तंभा | स्तंभीं |
| ८७ | ,, ९३ | नाईक हकाम | नाईक हकीम |

## शुद्धिपत्र.

| पृष्ठ | ओळ किंवा टीप | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ९४ | टीप १५ | शिवाजीर | शिवाजीस |
| ” | ” ” | बहिरजांन | बहिरजीनें |
| ९५ | ” १८ | हष | हर्ष |
| ” | ” १९ | सवतर | सचंतर |
| ९७ | ११ | होती | होतीं |
| १०४ | १८ | अनाइक | अनाईक |
| ” | टीप ६२ | ” | ” |
| १०५ | १२ | तुम्ही | तुम्हीं |
| १०६ | २ | अमावसणी ? | अमासवणी |
| ” | ७ | केल | केलें |
| ” | टीप § | झालेलें | झालेलें. |
| ” | टीप * | ६७ ह | ६७ पाहा |
| १०८ | ८ | शंरफजी | शरीफजी |
| १०९ | ५ | ” | ” |

# विषयानुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| १. सभासदास राजारामाची पृच्छा-शिवचरित्रास आरंभ. | १ |
| २. शंभु महादेवाची भक्ती-मालोजी तलाव बांधितो-त्यास दृष्टांत. | १।२ |
| ३. शाहाजीचीं लग्नें व संतती-शिवाजीचा जन्म-त्याची बेंगरुळाहून पुण्यास रवानगी-बरावर कारभारी. | २।३ |
| ४. शिवाजी जहागिरीचा कारभार करूं लागतो-त्याच्या पुंडाईस आरंभ-मावळ व सुपें परगणे घेतो. | ४ |
| ५. जुन्नर मारतो-पुरंदर घेतो. | ५ |
| ६. कल्याण मारतो-राजगड-मोरे यास मारवितो-जावळीचें राज्य घेतो. | ६।७ |
| ७. शृंगारपूरचे सुर्वे-शिवाजीची कामगार मंडळी-संभाजीचा जन्म. | ७।८ |
| ८. शिवाजीच्या पुंडाईची शाहाजीकडे कागाळी-त्याचें उत्तर. | ८।९ |
| ९. अफजलखानाची शिवाजीवर रवानगी-खानाची बढाई व प्रतिज्ञा. | ९ |
| १०. तुळजापूरची भवानी-तिचा शाप-पंढरीस उपद्रव-कृष्णाजी भास्करची हेजिबी. | ९।१० |
| ११. शिवाजीची तजवीज-भवानीचा दृष्टांत खलबत-युद्धाचा निश्चय. | १०।१२ |
| १२. नेताजी पालकर व मोरोपंत पिंगळे यांस कामगिरी. | १२ |
| १३. कृष्णाजी भास्कर व पंताजी गोपीनाथ बोकील-भेटीचा घाट | १२।१३ |
| १४. बोकिलाची कर्तबगारी-खानाच्या कपटाचा परिस्फोट. | १३।१४ |
| १५. बोकील प्रतापगडीं परत-त्याची मसलत. | १४।१५ |
| १६. खान वाईहून जावळीस येतो. | १५ |
| १७. भेट कोठें व्हावी ? प्रतापगडाखालीं सदर. | १५।१६ |
| १८. शिवाजीची तयारी-तो गडाखालीं उतरतो. | १६।१७ |
| १९. खान सदरेस येतो-त्याचा जळफळाट. | १७।१८ |
| २०. खानाची भेट व त्याचें कपट—मारामारी-वध. | १८।१९ |
| २१. भांड्याचे आवाज - खानाच्या फौजेवर हल्ला-लूट-पाडाव. | १९।२१ |
| २२. शरणागतास राजा मारीत नाहीं. | २१ |
| २३. लोकांस बक्षिसें. | २१ |
| २४. दुर्योधन आणि भीम. खुशाली. | २२ |
| २५. पादशाहाचा व पादशाहजादीचा शोक. | २२।२३ |

विषय. पृष्ठ.

२६. प्रतापगडास देवीची स्थापना. २३
२७. तळकोंकण काबीज – मोंगलाईंत धुंद. २३।२४
२८. किल्ल्यांचा बंदोबस्त. २४।२५
२९. पागांची व्यवस्था. २५।२६
३०. छावण्या–स्वारीस जातां व परत येतां अजबाबाची तपासणी. २६।२७
३१. मावळे पायदळ. २७
३२. शिपाई व कामगार यांच्या पगाराची व्यवस्था. २७।२८
३३. मुलखाचा बंदोबस्त. २८।२९
३४. जमीन-मोजणी व महसूल–देशमुख इत्यादि वतनदारांचा बंदोबस्त. २९।३०
३५. देवस्थानांचा आणि विद्वानांचा योगक्षेम. ३०
३६. शाहिस्तेखान–दक्षिणचा सुभा—त्याची वल्गना–पुण्यास येतो. ३०।३१
३७. शिवाजीची तजवीज – देवीचा दृष्टांत–तयारी–बाबाजी व चिमणाजी देशपांडे–खानावर घाला—त्याच्या जिवावरचें बोटांवरच जातें. ३२।३४
३८. खानाचा गैरइतबार – खान परत जातो. ३४।३५
३९. शिवाजीची खुशाली–'शास्ताखानास' 'शास्त' केली !! ३५
४०. शिवाजी 'बडा सैतान'–शाहिस्तेखानाची तगीरी—मिरजाराजा व दिलेरखान यांची नामजादी. ३५।३६

विषय. पृष्ठ.

४१. मिरजाची चिंता-अनुष्ठानें. ३६।३७
४२. शिवाजीला पुन्हा दृष्टांत. ३७।३८
४३. जयसिंग कोंढाणा व पुरंदर यांच्या दरम्यान तळ देतो. त्याजकडे रघुनाथ पंडिताची रवानगी. ३८
४४. परस्परें आणाभाका. ३८।३९
४५. दिलेरखानाचा संताप-पुरंदरास वेढा. ३९।४०
४६ पुरंदरावर हल्ला–मुराराचा पराक्रम–मुरार पडतो–मावळ्यांचें धैर्य. ४०।४१
४७. शिवाजी जयसिंगास भेटतो — दिलेराची भेट – हिडिंब राक्षसाची उपमा–खानाचा मनोभंग. ४१।४४
४८।४९. मोंगलांशीं सल्ला–शिवाजीचे दिल्लीस प्रयाण–बरोबरची मंडळी—शिवाजीची मार्गीं बरदास्त. ४४।४५
५०. दिल्लीस म्ह० आग्र्यास मुक्काम–औरंगजेबाची मजलस-त्याची तरतूद-मुलाखत-चलबिचल-शिवाजी मुक्कामास परत. ४६।४७
५१. शिवाजी नाखूष—रामसिंगाची सल्ला. ४७
५२. पादशाहास अर्ज-त्याचा जाब. ४८
५३. शास्ताखान व जाफरखान दिवाण –पादशाहाचा विकल्प. ४८
५४. जाफरखानास शिवाजी भेटतो. ४९
५५. पोलादखान कोतवाल-शिवाजी नजरबंद-भवानीचा साक्षात्कार ४९।५०

विषय. पृष्ठ.

५६. मेव्याचे पेटारे. ५०

५७. शिवाजी पसार!! चौघे बैरागी- ५०।५१

५८. हिरोजी व पाहरेकरी. ५१

५९. रामसिंगाची तकरार. ५१।५२

६०. हुनराचा परिस्फोट–शिवाजी मागें धावणी. ५२

६१. शिवाजी मथुरेस-संभाजीची व्यवस्था–महायात्रा–राजगडास परत–आनंदी आनंद! ५३

६२।६४. सत्तावीस किल्ले परत – एक गड घेतला परंतु एक गड गेला! ५३।५५

६५. संभाजी परत—कृष्णाजीपंत इ० 'विश्वासराव'–निराजीपंत, दत्ताजीपंत, राघो मित्रा यांस बक्षिसें. ५५।५६

६६. 'चखोट' माणूस–शंभर लोक—साठ लोक-चाळीस लोक इ०. ५६।५७

६७. पन्हाळ्यांत शिवाजीची कोंडी. ५७

६८. नेताजीवर गैरमर्जी – कडतोजी गुजर 'प्रतापराव'–सरनोबत. ५७।५८

६९।७४. शाहजादा दक्षिणेस-त्याच्याशीं स्नेह-संभाजी हप्तहजारी-वऱ्हाड जहागीर –मोंगलाईत दोन वर्षे गुजारा–मोंगलांशीं बिघाड. ५८।६१

७५. विजापूरच्या सरदारांचा पराभव. ६१

७६।७७. मोंगलाई शहरांची पाळत-सुरतेस घाला–लूट–मोंगलांचा हल्ला-त्यांचा मोड-रायबागीण शरण येते. ६२।६४

विषय. पृष्ठ.

७८. गडकोट काबीज–हबशाचा उपद्रव–शिवाजी दर्यास पालाण घालतो. ६४।६५

७९. सावंत व पासलकर. ६५

८०. शाहाजीचा मृत्यू. ६५।६६

८१. घरांतील उंदीर–त्यावर व्यंकोजी दत्तो–आरमार सजतें–शिद्दीस कोंडी. ६६।६७

८२ सावंत, खवासखान व बाजी घोरपडे यांचा समाचार–गोकर्ण महाबळेश्वरपर्यंत सरद–गोंवेकरांवर दबाव. ६८।६९

८३. बसनूरवर घाला-दोन कोटींची मत्ता. ६९।७०

८४. कारंज्याची तीन दिवस लूट—सात कोटींचा आकार. ७०

८५. रायरी ऊर्फ रायगड-तख्तास जागा हाच करावा. ७१

८६।८७. राजारामाचा जन्म–दिल्लीची पातशाई पालथी घालिलि!! मोरोपंत बागलाण व कोळवण काबीज करतो. ७१।७२

८८. औरंगजेब चिंताग्रस्त–खळा-जवळा किल्ल्यास दिलेरखान लागतो–कणेरागड–रामाजी पांगेऱ्यांची मर्दुमकी–'एक प्रहर ठिपरी दणाणते!' ७२।७३

८९।९०. साल्हेरीचा वेढा–मोरोपंत व प्रतापराव–महायद्ध–भारतींचा कर्ण!

| विषय. | पृष्ठ. |
| --- | --- |
| विजय—इखलास व मोहोबत पाडाव—त्यांची बोळवणी—खुशाली. | ७३।७५ |
| ९१ औरंगजेबाचा शोक—बहादूरखान त्यास धीर देऊन दक्षिणेंत येतो—“ पेंढीच गुरू. ” | ७५।७६ |
| ९२।९३. दक्षिणेस रायबागपर्यंत मुलूख सुटतो—मुलुखाच्या कारभाराचे तीन हवाले. | ७६।७८ |
| ९४।९६, विजापूरच्या बेलोलखानाची ‘वळवळ’-प्रतापरावाची रवानगी-लढाई-सला-ठपका-पुन्हा युद्ध-प्रतापराव पडतो-हसाजी मोहिते. ‘हंबीरराव.’ | ७८।७९ |
| ९५. निळो सोनदेवचा मृत्यू. | ७९ |
| ९७. कोंकणांत छावणी — हंबीरराव सरनोबत. | ७९।८० |
| ९८. तंजावरचें राज्य — व्यंकोजीचा रघुनाथपंताशीं बेबनाव— रघुनाथपंत शिवाजीकडे—त्याचा सन्मान. | ८० |
| ९९।१००. विजापूरकरांचा व हंबीररावाचा तंटा—मोरोपंत कोपल घेतो-तुंगभद्रेपर्यंत सरहद्द जाते. | ८०।८१ |
| १०१. हंबीररावाची मोंगलाईंत स्वारी-नर्मदेपर्यंत धामधूम. | ८१।८२ |
| १०२. वेदमूर्ति गागांभट्ट—छत्रसिंहासन करण्याचा निश्चय—महोत्सव – राज्याभिषेक-सिंहासनाधिरोहण- अष्टप्रधान. “ मराठा छत्रपती जाला ही सामान्य गोष्ट झाली नाहीं ! ” | ८२।८४ |

| विषय. | पृष्ठ. |
| --- | --- |
| १०३. यवन बादशाहांचा खेद आणि आशंका—तुंगभद्रा ते कावेरीपर्यंत कर्नाटक साधणें. | ८५।९२ |
| १०४. बाहादूरखानाची हातचेपी-भागानगरीं प्रल्हादपंताची हेजिबी. | ८५।८६ |
| १०५. शिवाजीची साधकता – नगर प्रवेश—उभय भूपतींची भेट – शिवाजी मुक्कामास परत. | ८६।८८ |
| १०६. तानाशाहाचा जिवांत जीव येतो ! | ८८ |
| १०७. मादण्णांकडे शिवाजीस मेजवानी-पुन्हा भेट—सरदारांचे मुजरे—तहाची बळकटी. | ८८।८९ |
| १०८. चंदीवर स्वारी—शिवाजी श्रीशैल मल्लिकार्जुनीं. | ८९ |
| १०९. चंदीस वेढा-कौल—त्रिमल महाल फत्ते. | ८९ |
| ११०. व्यंकोजी येऊन भेटतो—वडिलांची बारा बिरुदें मागतां व्यंकोजी उठून चंदावरास जातो. | ९० |
| १११. शिवाजीचें आश्चर्य—येलूरकोट हस्तगत—रघुनाथपंत मुजुमदार-त्याची चंदीस स्थापना—मदतीस हंबीरराव—शिवाजी परत फिरतो—कोल्हार, बाळापूर इ० काबीज—रंगो नारायणाची स्थापना—बलवाड येथील देसाईण—शिवाजी देशीं परत. | ९०।९२ |
| ११२. व्यंकोजी हंबीररावावर हल्ला | |

विषय. पृष्ठ.

करतो-त्याचा पराजय - शिवाजीची सबूरी-व्यंकोजीशीं तह - हंबीरराव परत. ९२।९३

११३. जालनापुरावर घाला-शिवाजीचा पाठलाग-बहिरजी नाइकाची शिताफी-पट्टा ऊर्फ विश्रामगड. ९३।९४

११४. संभाजीचा रुसवा-त्याचा मूर्खपणा-त्याची समजूत-दोन राज्यें- एकंदर दौलतीची व माणसांची मोजदाद्-अठरा कारखाने-बारा महाल-खजिन्याची गणती-पागांचे सरदार-शिलेदार सरदार व मुलखीचे सुभेदार-हशम मावळे सरदार-गड, कोट व जांजिरे यांची नांवनिशी. ९४।१०२

११५-११६. संभाजी पन्हाळ्यास-राजारामाचें लग्न. १०२।१०३

११७. शिवाजीस ज्वराची व्यथा-आयुष्याची अवधी जाली-पुढील भविष्य-तीन ब्राह्मण व तीन मराठे-चैत्र शु॥ १५, शके १६०२. १०३।१०५

११८. नानाप्रकारचीं दुश्चिन्हें-शिवाजीच्या देहाचें सार्थक. १०६

११९. सिंहावलोकन. १०६

१२०, फलश्रुती आणि समाप्ती. १०६।१७

परिशिष्ट १ जगदीश्वराच्या प्रासादावरील लेख. १०७, परिशिष्ट २ शिवराजमुद्रा १०७-१०८, परिशिष्ट ३ शिवराजाची छोटी वंशावळ वगैरे. १०८-११०, परिशिष्ट ४ शिवराजाच्या छत्रीची स्थिती. ११०

[illegible] वाचनालय, सातारा.

॥ श्री ॥

## श्रीमंत महाराज राजश्री राजाराम साहेब छत्रपती,

साहेबांचे सेवेशीं.

विनंती सेवक कृष्णाजी अनंत सभासद[1] कृतानेक विज्ञापना ऐसी जे. साहेबीं[2] मेहरबानी करून सेवकास पुसिलें कीं, " आपले पिते थोरले राजे यांणीं इतका पराक्रम केला व चार पातशाहींशीं दावा लाविला. ऐसा पराक्रम केला. ऐसे असतां औरंगजेब येऊन [ त्यानें ] किल्लोकिल्लीं अनर्थ मांडिला[3]. याचा अर्थ काय? तुम्ही *पुरातन, राज्यांतील माहीत [गार] लोक आहां, तरि इस्तकबिल[4] पासून चरित्र लेहून देणें. " म्हणोन आज्ञा केली. त्याजवरून वर्तमान ऐसी जे:—

राजियांचे बाप थोरले महाराज राजश्री शाहाजी राजे, यांचे बाप म्हणजे राजियांचे आजे राजश्री मालोजी राजे व विठोजी राजे भोंसले, हे निजामशाही वजीर दौलता‡ करून तोलदारीनें[5] होते. त्यांची निष्ठा श्रीशंभुमहादेवें[6] यांचे भजनीं बहूत होती. त्यास शिखरीं यात्रा चैत्रमासीं भरते. पांच सात लक्ष माणसें मिळतात. पाणियाचें बहूत संकट. उदक

---

१. " सभासद राजमंडळ " पाठांतर. २. साहेबीं=स्वामींनीं. ३. औरंगजेब दक्षिणेंत स० इ० १६८३ पासून १७०७ पर्यंत लढाया करीत होता. गोंवळकोंडा व विजापूर हीं राज्यें मोडून ( १६८६-८७ ) तो मराठ्यांच्या पाठीमागें लागला. खुद्द राजाराम यास कर्नाटकांत पळून जावें लागलें. ह्या गोष्टींस अनुलक्षून वरील लेख आहे. *कृष्णाजी अनंत शिवाजीच्या वेळेस एका प्रांताचा ब्राह्मण सुभेदार होता. ४. इस्तकबिल=अमक्या दिवसापासून=आरंभापासून. ‡दौलत= जाहागीर, सरंजाम. ५. तोलदारी=वजन, प्रतिष्ठा. ६. शंभुमहादेव हें देवस्थान सातारा जिल्ह्यांत त्याच नांवाच्या डोंगरावर आहे.

नाहीं. तीन कोशांवरून उदक आणतात. लोक श्रमी बहूत होतात. म्हणून राजश्री मालोजीराजे यांनीं तेथें जागा पाहून तळें एक थोर बांधिलें. सर्वत्र लोकांस उदक कार्यास येई असें केलें. अपरमित द्रव्य खर्च केलें. तळें संपूर्ण उदकानें भरलें. हें करितांच रात्रौ श्रीशंभुमहादेव स्वप्नांस[7] येऊन, प्रसन्न होऊन बोलिला जे, "तुझ्या वंशांत आपण अवतार घेऊं. देव-ब्राह्मणांचें संरक्षण करून म्लेंछांचा क्षय करतों. दक्षण देशाचें राज्य देतों." म्हणोन त्रिवार वचन करून वर दिला. त्याजवरून राजे [ यांस ] बहूत संतोष होऊन [ त्यांनीं ] दानधर्म बहूत केला.

पुढें राजश्री मालोजी राजे यांच्या पोटीं राजश्री शाहाजीराजे [ व ] राजश्री सरफजी राजे हे दोघे पुत्र जाहाले. दोघांनीं पातशाहीमध्यें दौलता केल्या. दौलत करीत असतां निजामशाही[8] बुडाली. यावरि शाहाजी राजे इदलशाही[9] वजीर जाले. महाराज [ हा ] किताब दिला. दाहाबारा हजार फौज चालूं लागली[10]. शाहाजी राजियासि दोघी स्त्रिया. प्रथम स्त्री जिजाई आऊ[11]. दुसरी स्त्री तुकाई आऊ. तिचे पोटीं एकोजी[12] राजे पुत्र जाले.

---

७. "जागृतीमध्यें स्वप्नांत येऊन" प्रतापगड प्रत. ८. निजामशाही= अहमदनगरची पादशाही. हिचा शेवट स० इ० १६३७ मध्यें झाला. निजामशाहीकरितां शाहाजी फार झटला. परंतु शेवटीं त्याचा नाइलाज झाल्यावर विजापूरचा दिवाण जो मुरारपंत त्याचे मार्फत तो अदलशाही मनसबदार बनला. इ० स० १६३७. ९. इदलशाही=अदलशाही=विजापूरकरांचें राज्य. १०. "सरफजी राजे मोंगलाई वजीरपणा करून चाकर होऊन राहिले" असें म० प्रतींत अधिक आहे. ११. "प्रथम स्त्री नांव जिजाई तिचे पोटीं पुत्र संभाजीराजे जाले. दुसरे पुत्र शिवाजीराजे जाले" असा म० व सा० प्रतींचा पाठ. जिजाबाई ही लखुजी जाधव शिंदखेडकर यांची कन्या. शाहाजीचें व जाधव यांचें कधींच बरें नव्हतें. याजकरितां जिजाबाईवर शाहाजीचें प्रेम कमी होतेंसें दिसतें. १२. एकोजी ऊर्फ वेंकोजी. ह्याची आई तुकाबाई ही मोहित्यांची कन्या. हिशीं सन १६५२ मध्यें शाहाजीनें लग्न लाविलें.

नगर वाचनालय, सातारा.



जिजाई आऊ तिचे पोटीं राजश्री शिवाजी राजे पुत्र होतांचें[१३] श्रीशंभुमहादेव जागृतीं येऊन स्वप्न जालें कीं, " आपणच अवतरलों आहें. पुढें बहूत [१४]ख्यात करणें आहे. बारा वर्षेपर्यंत तुम्हीं आपले जवळ ठेवावें. पुढें न ठेवणें. जातील तिकडे जाऊं देणें. आटोप न करणें." ऐशी जागृति जाली[१५]. शाहाजीराजे कर्नाटक बेंगरूळ[१६] येथें होते. त्यांपाशीं कारभारी राजश्री नारोपंत[१७] दीक्षित होते. त्यांच्या पोटीं रघुनाथपंत व जनार्दनपंत हे दोघे पुत्र बहूत शाहाणे जाले. शाहाजी राजे यांसि दौलते[१८] मध्यें पुणें परगणा होता. तेथें दादाजी कोंडदेव शाहाणा, चौकस ठेविला होता. तो बेंगरुळास महाराजांचे भेटीस गेला. त्याबरोबर राजेश्री शिवाजी राजे व जिजाबाई आऊ ऐशीं गेलीं. तेसमयीं राजियास वर्षें बारा होतीं. बराबर शामराव निळकंठ म्हणून पेशवे करून दिले व बाळकृष्णपंत, नारोपंत दीक्षिताचे

---

१३. शाहाजीचा पाठलाग मोंगल करीत असतां, पळतां पळतां त्यानें जिजाबाईस शिवनेरी किल्ल्यांत ठेवून आपण विजापुरास गेला. त्या वेळीं जिजाबाई गरोदर होती. तिनें शिवनेरीच्या शिवाई देवीस नवस केला कीं, पुत्र झाला तर तुझें नांव ठेवूं. त्यापुढें शिवाजीचा जन्म शके १५४९ वैशाख शुद्ध द्वितीयेस झाला. पण अलीकडील शोधावरून फाल्गुन व॥ ३, शके १५५१, शुक्रवारीं जन्म झाला असें सिद्ध होऊं पाहात आहे. १४. ख्यात=ख्याती=पराक्रम. १५. याच्या पुढें सा० व म० प्रतींत असें आहे—" दानधर्म दुसरे दिवशीं बहूत केला. दुसरी स्त्री तुकाई आऊ, तिचे पोटीं पुत्र व्यंकोजी राजे जाले. असे तिघे पुत्र जाले, त्यांमध्यें संभाजीराजे वडील. यांसि विजापुराहून वेगळी दौलत जाली होती. यांसि बडी साहेबीण, बाईल सुलतान महंमद पादशाह याची स्त्री, विजापुरीं होती तिणें विश्वासघात करून विषाची लुगदी दिली, तेव्हां, ते मेले." लुगदी=लगदा; मळून केलेली गोळी. १६. बेंगरूळ=बंगलूर. कोल्हार, होसकोटा, बाळापूर, सेरा व बंगलूर हे पांच प्रांत शाहाजीस कर्नाटकांत जाहागीर होते. १७. नारो त्रिमळ हनमंते. १८. दौलत=जागीर, सरंजाम; राज्य.

चुलतभाऊ[१९], मजुमदार[२०] दिले व सोनोपंत डबीर[२१] व रघुनाथ बल्लाळ सबनीस[२२], ऐसे देऊन दादाजीपंतास व राजे यांसि पुण्यास रवाना केलें. ते पुण्यास आले.

येतांच बारा[२३] मावळें काबीज केलीं. मावळे देशमूख बांधून, दस्त[२४] करून, पुंड होते त्यांस मारिलें. त्याजवर, कालवशात, दादाजी कोंडदेव मृत्यू पावले[२५]. पुढें शिवाजी राजे आपणच कारभार करीत चालले. मग सुपें महाल येथें कोणे एके जागां संभाजी मोहिता म्हणोन सावत्र आईचा भाऊ, मामा होता. तो महाराजांनीं[२६] महालावरि[२७] ठेविला होता. त्याचे भेटीस शिमग्याचे सणास पोस्त मागावयास म्हणून गेले. मामास कैद करून ठेविलें.[२८] त्याचे तीनशें घोडे पागेचे होते व द्रव्यही बहूत होतें. वस्तभाव, कापड

---

१९. "बाळकृष्णपंत व नारोपंत०" अस मूळांत आहे. "चुलते व भाऊ मुजुमदार" म० प्रत. २०. "अमात्यःस्यान् मुजुमदारः" राज्यव्यवहार कोश. २१. "युक्त्यभिज्ञो दबीरःस्यात् रा० व्य० कोश. २२. "सबनीसस्तथा सेना-लेखकः परिकीर्तितः" रा० व्य० कोश. २३. हीं बारा मावळें कोणतीं ? नाणें, हिरडस, पवन, अंदर, गुंजाण, हिंजग, कर्यात हें सात प्रसिद्ध आहेत. मुठे-खोरें, मुसेखोरें वगैरे खोरीं धरून १२ होतील. २४. दस्त करणें = धरणें. २५. दादाजी कोंडदेव हा पेटा दौंड पैकीं राजेगांव मलठण गांवचा कुलकर्णी. यानें मावळ प्रदेश चांगल्या दशेस आणिला. मलिकंबरी धाऱ्याची पद्धती सुरू करून जाहागिरीचें उत्पन्न वाढविलें. बक्षिसें देऊन क्रूर पशू मारविले व मावळे लोकांस नौकरींत ठेवून त्यांस सुधारण्याचा क्रम घातला. शिवाजीच्या पुंडाईबद्दल दादाजीस पहिल्यानें वाईट वाटून त्यानें "हे ढंग सोडून द्याल, तरच तुमच्या बापाचें व तुमचें हित आहे," असें शिवाजीस सांगून पाहिलें; पण तें सर्व व्यर्थ गेलें. शेवटीं मृत्युसमयीं "गोब्राह्मणांचें प्रतिपालन करण्याचा जो उद्योग तुम्हीं आरंभिला आहे तो तसाच चालवून धर्मसंस्थापना करा. ह्यांत देव तुम्हांस यश देईल," असा उपदेश त्यानें शिवाजीस केला. २६. म्हणजे शाहाजीनें. २७. 'मोकाशियावर' सा० व म० प्रती. २८. हा मामा शिवाजीचे पदरीं राहीना तेव्हां त्यास व त्याच्या पदरचे लोकांस लवकरच शाहाजीकडे कर्नाटकांत पाठविलें.

हस्तगत करून सुपें देश साधिलें. तुकोजी चोर मराठा म्हणोन लष्करचा सरणोबंत[३०] केला. शामराव निळकंठ पेशवे व बाळकृष्णपंत मजुमदार व नारोपंत व सोनाजीपंत व रघुनाथ बल्लाळ सबनीस असे कारभारी करून, बहूत सावधपणें चौकशीनें वर्तणूक करीत चालले.

पुढें जुन्नर शहर मारिलें[३१]. घोडे दोनशें पाडाव[३२] केले. तीन लक्ष होनांची मत्ता, खेरीज कापडजिन्नस, जडजवाहीर, हस्तगत करून पुण्यास आले. मग अमदानगर शहर मारलें. मोंगलांशीं मोठें युद्ध केलें. सातशें घोडे पाडाव केले. हत्तीही पाडाव केले. द्रव्य बहूत सांपडलें. तेसमयीं पागा बाराशें व शिलेदार दोन हजार जाहाले. अशी तीन हजार स्वारांची बेरीज जाली. तेव्हां माणकोजी दाहोतोंडे[३३] सरनोबत लष्करचे केले. मग किल्ले कोंढाणा[३४] इदलशाही होता, तो भेद[३५] करून घेतला. ठाणें आपलें ठेविलें. सवेंच पुरंदरगड इदलशाही येथें निळकंठराव म्हणोन ब्राह्मण गडास खावंद होते, ते मेले. त्यांचे पुत्र [३६]दोघे, ते एकांत एक भांडूं लागले. त्यांची समजावीस करावयास म्हणोन राजे पुरंदरास गेले. आणि ते दोघे भाऊ कैद करून तोही गड आपणच घेतला. आपलें ठाणें बसविलें.

त्याजवरि कोंकणांत कल्याण[३७] भिवंडी मारिली. आणि माहुली[३८] किल्ला

---

२९. "सुपें देखील कोट साधिला" म० प्रत. ३०. "सनौबतस्तु सेनानी" राज-व्य० कोश. सनोबत=सेनापती. ३१. जुन्नर व अहमदनगर हीं ठाणीं मोंगलांचीं होतीं. जुन्नर स० इ० १६५७ मध्यें मारिलें. ३२. पाडाव केले=जिवंत धरले. ३३. "दुतोंडे" असें ग्रांट डफ लिहितो. ३४. याचें नांव शिवाजीनें 'सिंहगड' असें ठेविलें. पुण्याचे नैर्ऋत्येस ६ कोशांवर. ३५. "जोरावारीनें घेतला." म० प्रत. ३६. पुरंदरचे मालक तिघे भाऊ होते असें ग्रंथांतरीं सांपडतें. ३७. कल्याण आबाजी सोनदेव यानें मारिलें. मुलाना म्हणून तेथील अधिकारी यास कैद करून विजापुरास परत पाठविलें. मुलानाची सून आबाजी-पंतानें महाराजांकरितां अटकावून ठेविली होती, तिला पाहून "या माउलीच्या पोटीं आम्ही जन्मलों असतों तर आम्हीही बहूत सुंदर झालों असतों !" असें म्हणून महाराजांनीं तिजला वस्त्रालंकार देऊन विजापुरास पोंचविलें!! ३८. तालुका शाहापूर जि० ठाणें.

अदलशाही घेतला. मावळे लोक यांची संचणी[३९] करीत चालले. मुरबाद[४०] म्हणोन डोंगर होता त्यास वसविलें[४१]. त्याचें नांव **राजगड** म्हणोन ठेविलें. त्या गडाच्या चार माच्या[४२] वसविल्या. **कोंकणांत चंद्रराव मोरे** म्हणून राज्य करीत होते. व **शृंगारपुरीं**[४३] **सुर्वे** राज्य करीत होते. त्यांचे प्रधान **शिरके** होते. असे जबरदस्त गड, कोठें[४४], दाहा बारा हजार लष्कर, हशम[४५] समेत राज्य करीत असत. त्यांजकडे **रघुनाथ बल्लाळ सबनीस** बोलावून पाठविले. विचार करितां, "चंद्रराव मोरे यास मारल्या विरहित राज्य साधत नाहीं. त्यास तुम्हांवांचून हें कर्म कोणास न होय. तुम्ही त्यांजकडे हेजीबीस[४६] जाणें." ऐसें सांगितलें. बराबर निवडक धारकरी[४७] शें सवाशें माणूस निवडून दिले. ते स्वार होऊन **जावली**[४८] नजीक जाऊन पुढें **चंद्ररायास** सांगून पाठविलें कीं, "आपण राजियाकडून आलों आहों. कित्येक बोलणेंचालणें तहरह कर्तव्य आहे." असें सांगून पाठविलें. उपरि त्यांनीं त्यांस आपणाजवळ बोलावून भेट घेतली. कित्येक बाह्यात्कारी बोलणें जाहालें. बिराड दिलें तेथें जाऊन राहिले. दुसरे दिवशीं मागती गेले. एकांतीं भेट घेतली. बोलणें जाहालें. प्रसंग पाहून **चंद्रराव** व **सूर्याजीराव** दोघां भावांस कटारीचे वार चालविले. जमातीशीं निघून चालिले. पाठीवर लाग जाहाला त्यास मारून निघून चालिले. खांसाच पडलियावरि लोक काय चालून येतात? असें कर्म करून,

---

३९. संचणी=जमाव. ४०. "म्होरबध" डफ. 'मुरुमदेव' पाठांतर ४१. वसविलें=बांधिलें, तटबंदी केली. ४२. "उपत्यका तु माची स्यात्" रा० व्य० कोश. डोंगराच्या पायथ्याशीं किंवा पायथा व शिखर यांच्या दरम्यान असणारी सपाटी. ४३. शृंगारपूर कोंकणांत संगमेश्वर तालुक्यांत. येथील अधिपती दळवी होते व सुरवे त्यांचे कारभारी होते असें **ग्रांट डफ** म्हणतो. ४४. "प्राकारः कोट इत्युक्तो गिरिदुर्ग गडः स्मृतः" रा० व्य० कोश. ४५. हाशम, हशम=पायदळ, पायींचे लोक. ४६. "दूतो हेजीबनामकः" रा० व्य० कोश. हेजिबी=दौत्य, वकिली. ४७. धा करी=तरवारबहादर, वीर. ४८. चंद्रराव **मोरे** यांजकडे **कृष्णा** व **वारणा** या नद्यांमधील घाटमाथ्याचा मुलूख होता. **ग्रांट डफ. जावली महाबळेश्वराच्या डोंगराखालीं प्रतापगडाजवळ कोयनेच्या कांठीं आहे.**

परतोन राजियाकडे भेटीस आले. तेंचे[४९] खांसा राजा चालोन जाऊन जावली सर केली. मावळे लोकांस कौल[५०] देऊन संचणी केली. प्रतापगड म्हणवून नवाच[५१] बैसाविला. हणमंतराव म्हणवून चंदररायाचा भाऊ चतुर्बेट[५२] म्हणून जागा जावलीचा होता, तेथें बळ[५३] धरून राहिला. त्यास मारल्याविना जावलीचें शैल्य[५४] तुटत नाहीं. असें जाणून संभाजी कावजी म्हणून महालदार[५५] राजियाचा होता त्यास हणमंतराव याजकडे राज्यकारणास पाठवून, सोइरिकीचें नातें लावून, एकांतीं बोलीचालीस जाऊन, संभाजी कावजी यानें हणमंतरायासि कटारीचे वार चालवून जिवें मारिलें. जावली काबीज केली. सिवतर खोरि-यांत बाबजी राऊ[५६] म्हणून पुंड[५७] होता. तोही कैद करून त्याचे डोळे काढिले

पुढें, सुर्वे राज्य करीत होते त्यांजवर चालून गेले. शृंगारपूर घेतलें. सुर्वे पळोन देशांतरास गेले. त्यांचे कारभारी शिर्के होते त्यांशीं भेद करून राज्य हस्तगत केलें. त्यांसि महाल मुलूख देऊन त्यांची कन्या राजियानें आपले पुत्रास[५८] केली. या प्रकारें जावलीचें राज्य व शृंगारपूरचें राज्य ऐशीं दोन राज्यें काबीज केलीं. तेव्हां मोरो त्रिंबक पिंगळे ब्राह्मण यांनीं बहूत मेहनत केली. त्याजवरून शामराव निळकंठ यांची पेशवाई दूर[५९] करून मोरोपंतास पेशवाई दिली, व निळो सोनदेव यांणींही मेहनत केली म्हणोन सुरनिशी[६०]

---

४९. तेच=त्या क्षणींच, ताबडतोब. ५०. कौल=वसाहत करावी अशाबद्दल सरकारी लेख. ५१. प्रतापगड मोरो त्रिमल पिंगळें यांनें बांधिला. हें काम नीट केल्याबद्दल व दुसऱ्याही कांहीं प्रसंगीं मोरोपंत उपयोगीं पडला होता म्हणून त्यास पेशवाईचें पद दिलें. ५२. चतुर्बेट–हें गांव जावळीजवळच कोयना कांठीं आहे. ५३. बळ धरून=मजबुदीनें. ५४. शैल्य=शल्य, कांटा. ५५. महालदार=भालदार. ५६. ‘बाबाजी कोंडणें’ म० प्रत. ५७. पुंड=अधिकाऱ्यास न जमानतां स्वतंत्रपणें राहणारा, बंडखोर. ५८. हें लग्न पुढें झालें असावें. ५९. दूर करण्याचें कारण शामराजपंताचा सिद्दीचे लढाईंत पराजय झाला होता. ६०. “बाळकृष्णपंताची मुजुमदारी काढून निळोपंतास सांगितली. आबाजीपंत याणींही... केली. त्यासि सुरनिशी सांगितली” म० प्रत. “सुर्नीसः सचिवस्तथा” रा० व्य० कोश.

सांगितली. गंगांजी मंगांजी म्हणोन होते त्यांस वाकनिशी[६१] सांगितली. प्रभाकरभट म्हणून थोर ब्राह्मण उपाध्ये होते त्यांचे पुत्र बाळंभट व गोविंदभट हे उपाध्येपण चालवीत होते. लष्करचा[६२] सरनोबत नेताजी पालकर[६३] केला. नेताजी सरनोबती करीत असतां सात हजार पागा व तीन हजार शिलेदार[६४] अशी दहा हजार फौज जाहाली. मावळे लोकांची संचणी दाहा हजार पावेतों जाली. यांसि सरनोबत येसाजी कंक म्हणून केला. ऐसें राज्य चौकशी बंदोबस्त करून राहिले. राजियाची स्त्री निंबाळकर यांची कन्या सईबाई केली होती ती प्रसूत जाहाली. पुत्र जाहाला. त्याचें नांव संभाजी राजा म्हणून ठेविलें. बहूत उत्साह केला. धर्म बहूत केला. राजगडीं राहिले.

मग पुढें या खबरी दिल्लीस पातशाहास कळाल्या. विजापूर [ येथें ] अली[६५] इदलशाहा पादशाही करूं लागले व बडी साहेबीण सुलतान महंमद याची बायको ही कारभार कुल[६६] करीत असतां त्यांस हें वर्तमान कळून बहूत कष्टी जाहालीं. पातशाही किल्ले घेतले. देशही काबीज केला. एक दोन राज्यें बुडविलीं. हा पुंड जाहाला. त्यास मारून गर्दीस मेळविण्याचें कसें करावें, म्हणून विचार करून, राजश्री शाहाजी राजे बेंगरुळाकडे होते, त्यांस पत्रें लिहिलीं. महालदार रवाना केले कीं, " तुम्ही पादशाहीं चाकर, आणि शिवाजी लेंक पुण्याकडे पाठवून यांणीं पादशाहाशीं बदलून

---

६१. " वाकानवीसो वृत्तांतलेखकः परिकीर्तितः " रा० व्य० कोश. वाकानवीस =खासगीकडील हिशेब व पत्रव्यवहार ठेवणारा कामगार. ६२. लष्करचा =घोडदळाचा, घोडेस्वारांचा. ६३. " जैतोजी पालकर " म० प्रत; दाहातोंडे मेल्यावर पालकर यास हें पद दिलें. ६४. " शिलेदारः स्वतुरगी " रा० व्य० कोश. आपला घोडा घेऊन नौकरी करणारा राऊत तो शिलेदार. ६५. अली हा सुलतान महंमद अदलशाहा याचा मुलगा. याचें वय १८ वर्षांचें होतें. खुद्द महंमदशाहाही स्वभावानें ऐषआरामी होता व त्याचा काल विजापुरांत मोठमोठाल्या इमारती बांधून तें शहर सुशोभित आणि सुखावह करण्यांत जात असे. यामुळें शिवाजीच्या धामधुमीकडे त्याचें अगदीं दुर्लक्ष्य झालें. ६६. कुल, कुल्=सर्व.

हरामखोरी केली. चार किल्ले पादशाही घेतले. देश, मुलूख काबीज केला व मारिला. एक दोन राज्यें बुडविलीं व एक दोन राजे पादशाहीं [६७]रुजुवात होते ते मारिले. आतां लेंकास [६८]कैदवार ठेवणें. नाहीं तरि पादशाही [६९]हवाला घेतील." असें लिहून पाठविलें. मग महाराजांनीं उत्तर दिलें कीं, "शिवाजी आपला पुत्र, परंतु आपणाजवळून पळोन गेला. तो आपल्या हुकुमांत नाहीं. आपण तो* पादशाहांशीं रुजुवात एकनिष्ठेनें आहों. शिवाजी आपला पुत्र याजवरि हल्ला करावी, मन मानेल तें करावें, आपण दरम्यान येत नाहीं." असें [७०]उत्तर पाठविलें.

त्याजवरून बडी साहेबीण हिणें कुल वजीर उमराव अदलशाही बोलावून आणून शिवाजी राजियावरि रवाना करावे म्हणोन पुसतां कोणीं कबूल केलें नाहीं. अफजलखान वजीर यांणीं कबूल केलें कीं, "शिवाजी काय? चढे [७१]घोडियांनिशीं जिवंत कैद करून घेऊन येतों." असें बोलिलियावरि पादशाहाजादी खुशाल होऊन वस्त्रें, अलंकार, हत्ती, घोडे, दौलत [७२]इजाफा देऊन, नावांजिक बरोबर उमराव जमाव बारा हजार स्वार, खेरीज पायदळ रवाना केलें.

तेव्हां अवघी फौज एकत्र होऊन औरस चौरस लष्कर उतरलें. आणि पुढें तुळजापुरास आलें. तेथें येऊन मुकाम केला. श्रीभवानी कुलदेवता महाराजांची, तीस फोडून, जातियांत घालून, भरडून पीठ केलें. भवानीस फोडतांच आकाशवाणी जाहाली कीं, "अरे अफजलखाना, नीचा, आजपासून एकविसावे दिवशीं तुझें शीर कापून, तुझें लष्कर अवघें संहार करून नव कोटी चामुंडांस संतृप्त करितें." अशी [७३]अश्रणी जाहाली. पुढें लष्कर कूच

६७. पातशाहीं रुजुवात=पातशाहाच्या आज्ञेंत, राजनिष्ठ. ६८. कैदवार=आज्ञेंत, हुकुमांत, योग्य रीतीनें. ६९. हवाला=ताबा, ताबेंत दिलेला मुलूख. *तो=तर ७०. ह्या उत्तरानें पातशाहाची खात्री होईना. शेवटीं बाजी घोरपडे याजकडून विश्वासघातानें शाहाजीस धरवून भिंतींत त्यास कोंडून ठेविलें. पुढें शिवाजीनें शाहाजहानमार्फत आपल्या बापाची सुटका करविली. ७१. चढे घोडियानिशीं=एकदांही घोड्यावरून न उतरतां, सपाट्यासरसा. ७२. इजाफा=अधीक, जास्ती. ७३. अश्रणी=अशरीरिणी वाणी, आकाशवाणी.

करून श्रीपंढरीस आलें. भीमातीरीं उतरलें. देवास उपद्रव देऊन वांईस आलें. तेथें येऊन विचार केला कीं, "राजियाकडे हेजिबीस पाठवून, सला करून, पातेजूँन जिवंत हातीं धरावा." अशी मनांत योजना करून कृष्णाजी भास्कँर हेजीब यास बोलावून आणून सांगितलें कीं, "तुमचे बाँप महाराज त्यांचा आमचा भाईचारांत पुरातन स्नेह चालला आहे. त्याजमुळें तुम्ही कांहीं आपणांस इतर नाहीं. तुम्हीं येऊन आपल्यास भेटणें. आपण पादशाहाजवळून तुम्हांस तळकोंकणचें राज्य व जाहागिरी देवावितों. गडकोट घेतले ते करार करवितों. वरकडही नावांजितों. जितकें तुमचे मनांत असेल तेणेंप्रमाणें सरंजाम देववितों. पादशाहाशीं भेट घेणें तरि घ्या, नाहीं तरि मुँलाजमत माफ करवितों." ऐशा कित्येक गोष्टी सांगोन "सल्यांत राजासि भेटीस आणावें. अगर आपण येऊं." असें कृष्णाजीपंतांँपाशीं सांगितलें. आणि त्यास पुढें रवाना करावें [ असें केलें. ]

तों या खबरी राजियासि पावल्या कीं, "विजापुराहून अफजलखान बारा हजार स्वारांनिशीं नामँजाद जाहाला. हें कळून राजानें आपली कुल फौज लष्कर मुँस्तेद करावें, आणि जावलीस युद्ध करावें, आपण प्रतापगडास जावें, हा विचार केला. तेव्हां सर्वांनीं निवारिलें कीं, जुंज देऊं नये, सला करावा. त्यास राजे बोलिले जे, "संभाजी रार्जियास जसें मारिलें

---

७४. पातेजणें=विश्वासविणें. ७५. "पंतोजीपंत" म० प्रत व ग्रांट डफ. ७६. शिवाजीचा बाप शाहाजी. ७७. मुलाजमत=भेट. ७८. "पंतोजीपंतास" असा महाडप्रतीचा पाठ सर्वत्र आहे. सातारा व प्रतापगड प्रतींचा पाठ 'कृष्णाजीपंत' असा सर्व ठिकाणीं आहे. कृष्णाजी भास्कर हा शिवाजीचा वकील होता असें ग्रांट डफ म्हणतो पण तें चुकीचें होय. ७९. नामजाद=नियुक्त, नेमिलेला, अधिकृत. ८०. मुस्तेद=तय्यार. ८१. संभाजी हा शिवाजीचा वडील बंधू, त्यावर शाहाजीचें प्रेम विशेष असे. शाहाजीला विजापुरीं शिवाजीच्या बंडाबद्दल कोंडून ठेविलें होतें, तेथून त्याची सुटका झाल्यानंतर कर्नाटकांत बंडें झालीं होतीं, तेथील बंदोबस्तास संभाजीस पाठविलें. तेथें कनकगिरी किल्ल्याच्या वेढ्यांत तो पडला. संभाजीस अफझलखान किंवा त्याचा कोणी संबंधी यानें विश्वासघात करून मारिलें असा मराठी बखरींचा झोंक असतो. मागें पृष्ठ ३, टीप १५. पाहा.

[library stamp]



तसें आपणास मारितील. मारितां मारितां जें होईल तें करूं. सला करणें नाहीं." हा विचार केला. तों रात्रीं श्रीभवानी तुळजापूरची [ इणें ] मूर्तिमंत दर्शन दिलें आणि बोलिली कीं, " आपण प्रसन्न *जाहालों. सर्वस्वें साह्य तुला आहें. तुझे हातें अफजलखान मारवितों. तुजला यश देतों. तूं कांहीं चिंता करूं नको." म्हणून धीर भरंवसा देऊन अभय दिलें. राजे जागे होऊन जिजाबाई आऊस बोलावून आणून स्वप्नाचें वर्तमान सांगितलें. व गोमाजी नाईक पानसंबळ जामदार व कृष्णाजी नाईक व सुमानजी नाईक असे मातबर लोक व सरदार व सरकारकून मोरोपंत व निळोपंत व अण्णाजीपंत व सोनाजीपंत व गंगाजी मंगाजी व नेताजी पालकर सरनोबत व रघुनाथ बल्लाळ सबनीस व पुरोहीत असे बोलावून सर्वांस स्वप्न सांगितलें. " श्रीप्रसन्न जाहाली, आतां अफजलखान मारून गर्दीस मेळवितों. " [ असें म्हणाले. ] हें सर्वांचे मतें कठीण कर्म, सिद्धीस गेलें म्हणजे बरें, नाहीं तरि कसें होईल? म्हणोन विचार पडला. मग राजे बोलिले कीं, " सला केलियानें प्राणनाश होईल. युद्ध केलियानें जय जाहालियास उत्तम, प्राण गेलियानें कीर्ति आहे. येविषयीं श्लोकः—

जितेन [ जयेन ? ] लभते लक्ष्मीं मृत्युनापि सुरांगनाः ।
क्षण-विध्वंसिनी काया का चिंता मरणें रणे ॥ १ ॥

असा नीतीमध्यें विचार सांगितला आहे. त्याजकरितां युद्ध करावें हें खरें. आतां एकच तजवीज करावी. संभाजी राजे पुत्र व मातोश्री आहेत हीं राजगडीं ठेवावीं. जर अफजलखान मारून जय जाहाला तरि माझा मीच आहें. एखादे समयीं युद्धीं प्राणनाश जाहाला, तरि संभाजी राजे आहेत, त्यांस राज्य देऊन त्यांचे आज्ञेंत तुम्हीं राहाणें." अशी निर्वाणूक करून,

---

*प्रथमपुरुषीं पुल्लिंगीं प्रयोग कराड्यांच्या बायका करितात, तसाच देवी येथें व इतरत्र करिते. ८२. गोमाजी नाईक हा जाधवरावाच्या पदरचा एक फार जुनाट माणूस जिजाबाईच्या तैनातीस दिला होता.

सर्वांस सांगून, मातुश्रीच्या पायांवरि डोई ठेवून, निरोप घेतला. मातुश्रींनीं आशीर्वाद दिला कीं, “ शिवबा! विजयी होशील. ”

असा आशिर्वाद घेऊन मग राजे निघोन प्रतापँगडास गेले. नेताजी पालकर सरनोबत यास लष्कर घेऊन वर घाटावरि येणें म्हणोन सांगितलें. आणि अफजलखानास जावलीस बोलावितों, सला करून भेटतों, विश्वास लावून जवळ आणितों, ते समयीं तुम्हीं घाटमाथां येऊन मार्ग धरणें.” असें सांगितलें, त्याजबरोबर रघुनाथ बल्लाळ सबनीस दिले. व मोरोपंत पेशवे व शामराव निळकंठ व त्रिंबक भास्कर यांसही समागमें घेऊन तेही कोंकणांतून यावे असें केलें.

इतक्यांत कृष्णाजीपंत हेजीब खानाकडील आले. त्यांस प्रतापगडावर घेतलें. राजियाची भेट जाहाली. कित्येक खानांनीं गोष्टी सांगितल्या होत्या त्या विदित केल्या. लौकिक बोलणें जाहालें. राजे बोलिले कीं, “ जसे महाराँज तसे खान आपणास वडील आहेत. त्यांची भेट अलबत्ता घेऊं.” असें बोलून कृष्णाजीपंत यांस बिराड एक घर दिलें. तेथें जावयास निरोप दिला. दुसरे दिवशीं राजे सदरेंत बैसले. सरकारकून सर्व सरदार असे सर्वही बोलावून आणिले. व पंँतोजी गोपिनाथ म्हणवून राजियाजवळ विश्वासू मातबर होते, त्यांस बोलावून आणून एकांतीं महालांत खलबत बैसले. राजे पंताजीपंतांस बोलिले जे, “ खानाचे हेजींबँ कृष्णाजीपंत हेजिबीस आले आहेत, त्यांस निरोप देऊन रवाना करितों, व तुम्हांसही अफजलखान याजकडे रवाना करितों. तेथें जाऊन, खानाची भेट घेऊन बोलीचाली करणें. खानास क्रिँयाँ शपथ मागणें. तुम्हीं ते शपथ मागतील तरि देणें.

---

८३. यावरून शिवाजी राजगडीं होता असें होतें. पण हें सर्व प्रतापगडींच घडलें, मातुश्रीस व संभाजीसही प्रतापगडींच ठेविलें होतें, असें ग्रंथांतरीं आढळतें. ८४. महाराज=शाहाजी राजे. ८५. ‘ दत्ताजी ’ असें ग्रंथांतरीं आढळतें, ‘प’ व ‘द’ हीं अक्षरें मोडींत जवळ जवळ सारखीं आहेत यावरून हा घोटाळा झाला असावा. ८६. हेजीब=वकील, दूत, ८७. क्रिया=शपथ, आणभाक.

अनमान न करणें. हर-प्रकारें जावलीस घेऊन येणें. याखेरीज सैन्यामध्यें युक्तिप्रयुक्तीनें ज्या रितीनें शोध मनास आणावयाचा त्या रितीनें आणा. खानाचें चित्त आमच्या बरियावरि किंवा वाइटावरि आहे असा शोध करणें." इतकें सांगून, राजे सभेस आले. कृष्णाजीपंतास बोलावून आणिलें. राजे म्हणों लागले कीं, "खानाची क्रिया पाहिजे. याजकरितां आमचे पंताजी गोपिनाथ यांस तुम्हीं आपणांसमागमें खानाच्या भेटीस नेणें. यांजवळ हस्तपंजराची आण देववणें. खानास जावलीस घेऊन येणें. काकाची भेट घेऊन येऊं. आमच्या मनांत कांहीं कपट नाहीं." असें सांगितलें. त्यांस ही गोष्ट मानली. मग कृष्णाजीपंतास वस्त्रें देऊन रवाना केलें. तसेंच पंताजी-पंतास वस्त्रें देऊन अफजलखानाकडे रवाना केलें.

त्यांणीं जाऊन खानाची भेट घेतली. खानांनीं सन्मान केला. कृष्णाजी भास्कर यांनीं अर्ज केला कीं, "शिवाजीनें हेजिबीस पंताजीपंतास पाठविले आहेत. एकांतीं बैसून बोलावें." असें सांगितल्यावरि खान एकांतीं बैसून, कृष्णाजीपंत व पंताजीपंत यांस बोलावून आणून वर्तमान पुसिलें. कृष्णाजी-पंत बोलिले कीं, "राजे तुम्हांवेगळे नाहींत. जसे महाराज शाहाजीराजे तसे तुम्ही, म्हणून शपथ दिली. राजे निर्भय होऊन जावलीस येतील.

---

८८. हस्तपंजर=हाताचा पंजा. ८९. ही हकिकत ग्रांट डफ यांनीं दिलेल्या हकिकतीच्या अगदीं उलट आहे. ते म्हणतात पंताजीपंत हा खानाच्या पदरचा होता व त्याबरोबर शिवाजीनें आपला कारकून कृष्णाजी भास्कर यास दिलें. म० प्रतींतही येथें कृष्णाजीपंताचें नांव नाहीं, पंताजीपंत खानाकडून आला असें तेथेंही लिहिलें आहे, व पंताजीपंतास बिऱ्हाडास जागा दिल्यानंतर "रात्रीं एकांतीं पंताजीपंतास बोलावून आणिला; राजे यांनीं व त्यांनीं दोघांनीच बसून आण, शपथ त्यांसि घालून वर्तमान पुसिलें. 'यथार्थ करीणा सांगणें, खानाचे मनांत काय आहे तें सांगणें, आम्ही तुम्हां वेगळे नाहीं, तुम्ही शाहाणे आहां राज्याचें रक्षण तुम्हीं करणें, सर्व राज्यकारभार देतों इत्यादि," असा महाड प्रतीचा पाठ आहे. पुढें पृष्ठ १८, टीप २७ पाहा.

खानानींही शंका न धरतां जावलीस यावें. त्यांची तुमची मुलाजमत होईल. तुम्ही सांगाल तें ऐकतील. " हा भावार्थ खानास कळल्यावरि मनांत नैष्टाई धरून शपथ दिली. खान बोलिले कीं, " राजा हरामजादा काफर, जावली कुंबल जागा, येथें भेटीस यावें म्हणोन बोलावितो. यास्तव तूं ब्राह्मण मध्यस्थ होऊन शपथ देशील तरि शिवाजी राजियाचे भेटीस येईन. मुलाजमत घेऊं." त्यास पंताजीपंतीं क्रिया दिली जे, "राजे तुमच्या वाइटावरि नाहींत. संदेह न धरणें. भेटीस यावयाचें करणें. " ऐसें खानास सांगून सैन्यांत लांचलुचपत देऊन, मुत्सद्दी वजीर यांजवळ शोध करून विचारलें. त्यांनीं सांगितलें कीं, " शिवाजी हरामजादा आहे. याशीं युद्ध करितां सांपडणार नाहीं. याजकरितां राजकारण लावून भेटी घ्यावी, [आणि] भेटीचे समयीं धरावा, ऐसी खानांनीं तजवीज केली [ आहे. ]" म्हणून कळलियावरि दुसरे दिवशीं पंताजीपंत खानाकडे येऊन, राजियाकडे जातों म्हणून हुकूम मागितला. खानानें बहुमान करून राजाकडे पाठविलें.

पंताजीपंत प्रतापगडास आले. राजाची भेट जाहाली. ते समयीं पंताजीपंतांस घरीं जावयास निरोप दिला. रात्रीं एकले पंताजीपंत भेटीस बोलाविले. राजे व पंत दोघे बैसून आण शपथ घालून, एकांतीं वर्तमान पुसिलें कीं, " यथार्थ करीणा सांगणें. खानाच्या मनांत कसें काय आहे हें सांगणें. आम्ही तुम्ही वेगळे नाहीं. आपलें राज्य संरक्षिलें म्हणजे सर्व कारभार तुम्हांस देतों. द्रव्यही बहूत देतों. आम्हांस वर्तमान यथार्थ सांगणें." ऐसें घरोबियांत घेऊन राजांनीं पुसिलें. तेव्हां त्यांनीं सांगितलें कीं, "खानाच्या मनांत दुष्ट बुद्धी आहे. सला करून, तुम्हांस भेटीस आणून, दगा करून कैद करून, विजापुरास धरून न्यावें ऐसें आहे. जर तुम्हांस हिंमत असली

९०. नष्टाई=कपट. ९१. कुबळ, कुब्बल=चळकट, कठीण, अडचणीची. ९२. करीणा=हकिकत, मजकूर, वर्तमान. ९३. मागें पृष्ठ १३, टीप ८९ पाहा. पण पंताजीपंत शिवाजीच्या पदरींचा जर होता तर त्याची इतकी विनवणी व मनोधारणी कां ?

तरि खानास नानाप्रकारें भेद करून जावलीस घेऊन येतों. तुम्ही हिंमत धरून एकांतीं ऐकांगी[९४] करून मारणें आणि लष्कर सर्व लुटणें. राज्य सर्व आपलें करणें." ऐसा विचार सांगितला. [ तो ] राजाच्या मनांत आला. तेव्हां पंताजीपंतास पांच हजार होन बक्षीस दिले. आणि खानास सांगणें जे, "राजा बहूत भितो. वांईस[९५] भेटीस यावयास धीर पुरत नाहीं. खान वडील आहेत, मेहेरबानी करून जावलीस येऊन भेट देतात तरि आपण भेटीसि येतों. आपण यास हातीं धरून, धीर भरंवसा देऊन, पादशाहाचे मुलाजमतीस घेऊन जाऊन ऊर्जित[९६] करतील तरि थोरपण आहे. ऐसे कित्येक मजकूर सांगून घेऊन येणें." म्हणोन विचार सांगोन पंताजीपंत यांस रवाना[९७] केलें.

ते जाऊन वांईस खानास भेटले. करीणा जाहीर केला. "राजा कचदील[९८] आहे. येथें भेटीसि येतां शंका धरितो. तुम्हींच तेथें जावलीस चलणें. तेथें भेटीस येतील, दिलासा[९९] करून बराबर घेऊन जाणें." असें सांगितलें. त्यावरून खान बहूत खुशाल होऊन, कूच करून, जावलीस रडतोंडीचा घाट उतरून आला. तो प्रतापगडाखालीं डेरे देऊन राहिला. आसपास चौगर्दी[१] बारा हजार लष्कर व बंदुखी[२], आराबियाच्या[३] गाड्या, हत्ती, सुतार[४]-नाल्याच्या गाड्या, जागां जागां पाणी पाहून उतरले. पंताजीपंतांस गडावरि राजियाकडे पाठविलें कीं, "भेटीस येणें."

त्याजवरून ते राजियासि जाऊन भेटले. लौकिक बोलणें जें बोलावयाचें तें बोलिले. एकांतीं मागती सर्व वर्तमान सांगितलें कीं, "आपण बोलल्याप्रमाणें खानास घेऊन आलों. आतां तुमची त्यांची भेटी एकांतीं

---

९४. एकांगीकरून=एकट्यानेंच हिंमत करून. ९५. वाई हें सुभ्याचें ठाणें होतें. अफजलखान तेथें एकदां सुभेदार होता. या वेळीं त्याचा मुकामही तेथेंच होता. ९६. ऊर्जित करणे=नांवारूपास आणणें, उत्तम दशेप्रत नेणें. ९७. मागें पृष्ठ १३, टीप ८९ पाहा. ९८. कचदील=भित्र्या मनाचा. ९९. दिलासा करून=आश्वासन देऊन. १. चौगर्दी=चौगर्दा=चोंहींकडे, सर्व बाजूंस. २. बंदुखी=बंदूक बाळगणारे. ३. आराबा=तोफखाना. ४. सुतार-नाला, पूतर-नाला=उंटावरील अग्नियंत्रें.

खासे खासे यांची करवितों. तुम्हीं हरीफ़ी[५] करून कार्यभाग करणें तो करावा." म्हणोन सांगितलें. भेटीस एक दिवस आड करून दुसरे[६] दिवशीं भेटावें असें केलें. " राजे गडावरून उतरावे, खानांनीं गोटांतून पुढें यावें, उभयतांनीं दरम्यान डेरे देऊन खासे खासे भेटावे, " ऐसा निर्वाद[७] करून राजाचा निरोप घेऊन खानाजवळ गडाखालीं माचीस उतरून गेले. खानास वर्तमान सांगितलें. खानानेंही मान्य केलें.

मग दुसरे दिवशीं गडाखालीं राजियांनीं[८]सदर केली. डेरे बिछाने व [९]असमानगिरी, तिवाशिंया[१०] व मोतियांच्या झालरी लाविल्या. चित्रविचित्र [११]बांडें व लोडें, गाद्या, पडगाद्या टाकिल्या. सदर सिद्ध केली. घाटमाथां लष्कर [ सुद्धां ] नेताजी पालकर आणविले होते, त्यांसि इशारत सांगोन पाठविली कीं, " उद्यां खानाचे भेटीस जातों, फत्ते करितों, आणि गडावरि येतों. तेव्हां एकच आवाज गडावरि करितों. तेव्हां तुम्हीं घाटाखालीं उतरोन लष्करांत खानाच्या चालोन येऊन मारामारी करणें. " तैसेच कोंकणांतून राजश्री मोरोपंत पेशवे आणविले. त्यांसही गडावरील [१२]आवाजाची इशारत सांगितली. आपण निवडक लोक गडावरून उतरोन जागां जागां झाडींत ठेविले. आणि खांसा राजियांनीं [१३]जरीची कुडती घातली. डोईस मंदील बांधिला त्यांत तोडा बांधिला. पायांत चोळणा घालून कास कसली, व हातांत एक बिचवा[१४] व वाघनखें[१५] चढविलें. आणि बराबर जिऊ

---

५. हरीफी=शौर्य, धाडस. ६. " भेटीस एक दिवस आड करून तिसरे दिवशीं भेट घ्यावी असा करार केला. प्रतापगडावरून राजे यांनीं उतरावें, " म० प्रत. ७. ' नेम ' सा० प्रत. ' निश्चय. ' म० प्रत. ८. सद्र=कचेरी, सभास्थान. ९. आस्मानगिरी=छत. १०. तिवाशी=गिर्दी, तक्या. ११. बांडें=चिकाचे पडदे, कनाथी. १२. " भांडियाचा " म० प्रत. भांडें=तोफ. १३. जरीची, [illegible]ची ) कुडती=कमरेपर्यंत येणारें डगलें. ' जिराची ' असें असावेंसें वाटतें, [illegible]जिराची= लोखंडाच्या कड्यांची. १४ बिचवा=विंचूच्या आकृतीची एक वांकडी कट्यार. १५. वाघनख=वाघाच्या पेंजाच्या आकृतीचें एक तीक्ष्ण शस्त्र. हें हाताच्या पंजावर चढवून मूठ मिटतां येते.

महाला म्हणून मरदाना होता त्याजवळ एक पट्टा व एक फिरंग[16] व ढाल, तैसाच संभाजी कावजी महालदाराजवळ पट्टा व फिरंग व ढाल, ऐसे दोघे[17] माणसें मर्दांनीं आपणाबराबरि भेटीसि[18] घेतलीं. वरकड आसपास धारकरी लोक जागां जागां जाळींत उभे केले. आणि राजियानें स्नान करून भोजन केलें. सिद्ध होऊन गडाखालीं भेटीस जावयास उतरले.

गोटांतून भेटीस यावयास खानही सिद्ध होऊन चालले. बराबरि लष्कर हजार दीड हजार बंदुखी मुस्तेद[20] होऊन चालिले. मोठे मोठे धारकरी लोक समागमें निघाले, चालिले. इतक्यांत पंताजीपंत पुढें होऊन अर्ज केला कीं, " इतका जमाव घेऊन गेलियानें राजा धाशत खाईल. माघारा गडावरि जाईल. भेटी होणार नाहीं. शिवाजी म्हणजे काय? यास इतका सामान* काय करावा? राजा दोघां माणसांनिशीं तिकडोन येईल. तुम्हीं इकडोन दोघांनिशीं चलावें. दोघे बैसोन भेटावें. तेथें तजवीज करणें ते करा." असें सांगितल्यावरि अवघा जमाव दूर बाणाचे टपियावरि उभे राहून खासा खान, एक पालखी, दोघे हुद्देकरी[21] व कृष्णाजीपंत हेजीब असे पुढें चालिले. सैदबंडा म्हणोन पैटाईत[22] एक लष्करी समागमें घेतला. पंताजीपंतही बराबरि आहेत. असे सदरेंत गेले. सदर देखोन खान मनांत जळाला कीं, "शिवाजी म्हणजे काय? शाहाजीचा लेंक. वजीर यास असा जरी बिछाना नाहीं! अशी मोतीलग[23] सदर म्हणजे काय? पातशाहास असा सामान नाहीं, येणे जातीचा त्यानें सामान मेळविला." असें बोलतांच पंताजीपंत बोलिला जे, "पादशाही

---

१६. " फिरंगस्तुभवेदसिः" रा० व्य० को० फिरंग=तलवार. १७. ग्रां० डफ म्हणतो, 'तानाजी मालसुराच एक बरोबर होता.' १८. भेटीस= भेटीस जातां वेळीं. १९. [illegible] रितां झाडें तोडून रस्ता साफ केला होता, पण त्या रस्त्याशिवाय दुसऱ्या सर्व चोरवाटा व आडमार्ग बंद करून टाकिले होते. २०. मुस्तेद=तयार, सिद्ध. *सामान=लोक, जमाव. २१. हुद्देकरी=शस्त्रवाहक कामगार. २२. पटाईत=पट्टा वापरण्यांत कुशल, पट्टेकरी. २३. मोतीलग=मोतीं लाविलेली.

माल पादशाहाचे घरीं जाईल. त्याची इतकी तजवीज[24] काय?" असें बोलून सदरेस बैसले. राजियास सितौब[25] आणवणें म्हणून जासूद हरकारे रवाना केले.

राजे गडाचे पायीं उभे होते. तेथून हळू हळू चालिले. समाचार घेतां खानाबरोबर सैदबंडा मोठा धारकरी आहे हें ऐकून उभे राहिले. आणि पंताजीपंतास बोलावूं पाठविलें. ते आले. त्यास म्हणूं लागले जे, "जैसे महाराज तैसे खान. आपण खानाचा भतीजा[26] होय. ते वडील. सैदबंडा खानाजवळ आहे त्याकरितां शंका वाटते. हा सैदबंडा इतका यांतून दूर पाठवणें," म्हणोन पंताजीपंतास सांगितलें. त्यावरून पंताजीपंत [ यानें ] जाऊन कृष्णाजीपंतांकडून[27] खानास सांगोन सैदबंडाही दूर पाठविला. खान व दोघे हुद्देकरी राहिले. तेव्हां राजेही हिकडून जिऊ महाला व संभाजी कावजी दोघे हुद्देकरी [ यां ] सहित गेले. खानही उभा राहून, पुढें सामोरा येऊन राजियास भेटला. राजियानें भेटी देतां खानानें राजियाची मुंडी कवटाळून खांकेखालें धरिली. आणि हातींची जमदाड[28] होती तिचें मेण टाकून कुशीस राजियाचे चालविली. तों आंगांत जेरीची कुडती होती त्यावरि खरखरली. आंगास लागली नाहीं. हें देखोन राजियांनीं डावे हाताचें वाघनख होतें, तो हात पोटांत चालवला. खानानें आंगांत झगाच घातला होता. वाघनखाचा मारा करितांच खानाची चरबी बाहेर आली. दुसरा हात, उजवे हातचे बिचवियाचा मारा चालविला. ऐसे दोन वार करून, मुंडी आंसडून, चौथरियाखालें उडी घालोन निघोन गेले. खानानें गलबला केला कीं, "मारिलें! मारिलें! दगा दिधला! बेगी धांवा!!" असें

---

२४. तजवीज=विचार. २५. सिताब=जलद. २६. भतीजा=भाचा. २७. ग्रां० ड० म्हणतो कीं, पंताजीपंत हा खानाचा वकील होता व त्याजबरोबर शिवाजीनें कृष्णाजी भास्कर यास दिलें. हें ह्या चरित्राच्या लेखाविरुद्ध आहे. डफ साहेबाचेंच अनुकरण महाड प्रतींत झालें असावेंसें दिसतें. २८. जमदाड— "जमदाड् यमदंष्ट्रःस्यात्" रा० व्य० कोश. एक मोठ्या पात्याची तलवार. २९. मागं पृष्ठ १६, टीप १३ पाहा. वरील हकिकत ग्रां० ड० याच्या हकिकतीहून अगदी भिन्न आहे.

नगर वाचनालय, सातारा.



बोलतांच भोयांनीं पालखी आणिली. आणि पालखींत घालून, उचलून चालविला. इतकियांत संभाजी कावजी महालदार यानें भोयांचे पाय मारिले.[३०] आणि पालखीखालें भोयांस पाडिलें. खानाचें डोंचकें कापिलें. हातीं घेऊन राजियाजवळ आला. इतक्यांत सैदबंडा पटाईत धावला त्यानें राजे जवळ केले. पट्याचे वार राजियावरि चालविले. तों राजियानें जिऊ महालियाजवळ आपला हुद्दियाचा पट्टा [होता तो] घेऊन, पट्टा व बिचवा असे कातर[३१] करून सैदबंडा याचे चार वार ओढिले.[३२] पांचवे हातानें राजियास मारावें* तों इतकियांत जिऊ महाला याणें फिरंगेनें खांद्यावरि सैदबंडियासि वार केला. तो पट्टियाचा हात हत्यारा-समेत तोडिला. आणि खानाचें शीर घेऊन राजे सिताब गडावरि जिऊ महाला व संभाजी कावजी महालदार असे गेले.[३३]

गडावरि जातांच एक भांड्यांचा[३४] आवाज केला. तेच† गडाखालील लोक व घाटावरील लोक व लष्कर व कोंकणांतून मोरोपंत व मावळे अस चौतर्फी चोहोंकडून चालोन खानाचे गोटावरि‡ आले. आणि खान मारून, शीर कापून राजे गडावरि गेले, ही खबर कळोन कुल खानाचें बारा हजार लष्कर धास्त घेऊन अवसान खस्त[३५] जाहालें. इतकियांत राजियाच्या फौजा चौतर्फा मारीत चालले. मोठें घोरांदर युद्ध जाहालें. दोन प्रहर घोरांदर

३०. पाय मारिले=पाय तोडले. ३१. कातर=एक प्रकारचा पट्याचा हात. ३२. " चुकविलें " म० प्रत. * ' पाचवे वारानें राजियानें सैदबंडा मारावा तों ' पाठभेद. पण वरील पाठच शुद्ध दिसतो. कारण, 'होता जिवा म्हणून वांचला शिवा' ही ऐतिहासिक म्हण प्रसिद्ध आहे. ह्या कामगिरीबद्दल जिऊच्या वंशजांस एक गांव इनामही दिला आहे. वरील पाठ महाड प्रतीचा होय. ३३. अफझलखानास मार्ग शीर्ष शुद्ध ७ स मारिलें. शके १५८१. ३४. भांडें=तोफ. †तेच=त्या आवाजाबरोबर, आवाज होतांच. ‡ पंधराशें लोकांची टोळी खानाबरोबर प्रतापगडानजीक आली होती तिजवर नेताजीनें व जावली येथील सर्व सैन्यावर मोरोपंतानें हल्ला करावा असें ठरवून शिंगाचा आवाज होतांच नेताजीनें व तोफेचा आवाज होतांच मोरोपंतानें आपआपल्या सैन्यानिशीं शत्रूंवर तुटून पडावें असा संकेत पूर्वींच केला होता. ग्रां० ड०. ३५. खस्त=नाहींसें, नष्ट.

नगर वाचनालय सातारा
संग्रहातील ग्रंथ

युद्ध जाहालें. खानाकडील मोठमोठे वजीर व लष्करी महंदीन[३६] व उजदीन, पठाण, रोहिले, सुरनीस [?] व आरबी वगैरे मुसलमान आणि जातिवंत मराठे, धनगर व ब्राह्मण तसेच तोफाची, बैले व कर्नाटकी प्यादे बंदुखी, आड-हत्यारी रो चे वा र [?] व लो क वा र [?] ये लं गे वा र [?] बाजे जैंतचे[३७] इटेकरी ह तु ल वे [?] तिरंदाज व छडीवाले व पटाईत व बंकाईत[३८] व बाणाईत[३९] व तोफखाना ऐसे एकंदर जम निदान करून भांडण दिधलें. मोठें क्षेत्र[४०] जाहालें. राजियाचे लष्करी लोकांनीं व मावळे लोकांनीं पायउतारा होऊन मारामारी केल्या. हत्ती तोडिले, ते जागां ठार जाले. कित्येक हत्तींचीं पुच्छें तोडिलीं. कित्येक हत्तींचे दांत तोडिले. कित्येक हत्तींचे पाय तोडिले. तसेच घोडे एकच वारानें जिवें मारिले. तसेच खानाचे लष्करी कित्येक ठार मारिले. कित्येकांचे पाय तोडून पाडिले. कित्येकांचे दांत उडविले. कित्येकांचीं डोचकीं फोडिलीं. कित्येक मेले. युद्धास आले ते मारून पाडून भुईस रगडिले. तसेंच उंटें मारिलीं. मारीत असतां रण अपार पडलें. संख्या न करवे. रक्ताच्या नद्या चालल्या. रणकंदन जालें. ऐसे मारामारी करून हत्ती, घोडे, उंट व मालमत्ता व पालख्या वजीर पाडाव करून आणिले—बितपशील.

| | |
|---|---|
| ६५ हत्ती व हत्तिणी सुमार. | ४००० घोडे सुमार. |
| ३००००० जडजवाहीर. | १२०० उंटें सुमार. |
| २००० कापड वोझीं. | ७०००० नगद व मोहोरा व होन सोनें रुपये. |
| भांडीं तोफखाना सर्वही घेतलें. | |

कलम १. वजीर पाडाव जाहाले बितपशीलः—

---

३६. "महंमददीन व रुजेदीन पठाण व रोहिले सुनी व शूर वजीर फजी मुसलमान व जातिवंत मराठे" म० प्रत. ३७. बाजे जातचे=इतर जातींचे. इटेकरी=इटा म्हणजे एक प्रकारची बर्ची ती वापरणारा तो 'इटेकरी.' ३८. 'बांकाईत' असेंही होईल. बांकाईत=बांकेकरी=शिंगवाले. बंकाईत=खानाच्या तंबूभोंवतालचे पहारेकरी. ३९. बाणाईत=दारूचे बाण सोडणारे. ४०. क्षेत्र=खेत, रण.

…वर वाचनालय, …



१ सरदार व वजीर मातबर. १ लां [कं?] बाजी भोंसले. १ अफजलखानाचे पुत्र.[४१] १ नाटकशाळेचे[४२] पुत्र. १ राजेश्री झुंजारराव घाडगे. १ यांखेरीज लोक. कलम १.

येणेंप्रमाणें पाडाव[४३] केले. याखेरीजही जिन्नस, मालमत्ता, गुरेंढोरें, बैल, मबलग मत्ता पाडाव केलें. भांडते लोकांनीं तोंडीं तृण धरून शरण आले त्यांसि व बायकामुलें, भटब्राह्मण, गोरगरीब असे अनाथ करून सोडिले. राजा पुण्यश्लोक, शरणागतास मारीत नाहीं, याजकरितां त्याचे लोकांनींही कित्येक अनाथ सोडिले. अफजलखानाचा लेंक फजल हा पायीं चिरगुटें बांधून झाडींत पळोन गेला. तसेच कित्येक भले लोक पळोन गेले. संख्या न करवे.

ऐसी फत्ते करून जय जाहाला. मग राजे यांणीं खानाचे पुत्रास व सरदार पळून गेले होते त्यांस धरून[४४] आणिलें. राजा खासा प्रतापगडाखालीं उतरोन कुल आपले लोक व अफजलखानाचे लोक व त्यांचे पुत्र भांडते माणूस होते तिताकियांस भेटून, पोटाशीं धरून, दिलासा करून, भांडते लोक जे पडले होते त्यांच्या लेंकांस चालविलें.[४५] पुत्र नाहीं त्यांच्या बायकांस निमे वेतन करून चालवावें असें केलें. जखमी जाहाले त्यांस दोनशें होन व शंभर होन, पंचवीस होन, पन्नास होन, दर असामीस जखम पाहून दिधले. मोठमोठे लोक धारकरी जुमले होते, त्यांस बक्षीस हत्ती, घोडे दिधले. हस्तकडीं, कंठमाला, तुरे, पदकें, चौकडे, मोत्याचे तुरे, कित्येकांस बक्षीस फार दिलें. ऐसें देणें लोकांस दिधलें. कित्येकांस गांवमोकासे बक्षीस दिधले. लोक नांवाजिले. दिलासा§ केला.

---

४१. फजल महमद बिन अफजल. ४२. नाटकशाळा=उपस्त्री, राख. ४३. पाडाव केले=जिवंत धरिले. ४४. खोपडे आडनांवाच्या एका सरदारानें फजलखानास प्रथम छपवून ठेविलें होतें, त्याबद्दल शिवाजीनें त्याचें डोकें मारिलें. हा मावळा सरदार अफजलखानाकडे मिळाला होता. 'कांकडे' ग्रां० ड०. म्हणतो तें चुकीचें होय. ४५. त्यांचें चालविलें=त्यांचा परामर्ष घेतला. त्यांसही अधिकार, नौकरी वगैरे दिलें. § दिलासा=विश्वास, आश्वासन.

मागें कौरवांचा क्षय पांडवीं केला, [ तेव्हां ] असा वीरावीरांस झगडा जाहाला. खांसा खान राजियानें एकांगी* करून मारिला. अफजलखान सामान्य नव्हे. केवळ दुर्योधनच जातीनें होता. आंगाचा, बळाचाही तैसाच आणि दुष्टबुद्धीनें तैसाच. त्यांस एकलें भीमानें मारिला. त्याचप्रमाणें [ येथें राजानें ] केलें. शिवाजी राजाही भीमच. त्यानींच अफजल मारिला. हें कर्म मनुष्याचें नव्हे. अवतारीच होता. तरीच हें कर्म केलें. यश आलें. असें जाहालें. खानाकडील वजीर पाडाव केले होते त्यांस वस्त्रें, भूषणें, अश्व देऊन अनाथ[४६] करून [४७]सोडिलें. त्याउपरि राजश्री पंताजीपंतासही उदंड वस्त्रें, अश्व, अलंकार दिधले. अपार द्रव्यही‡ दिधलें. खुशाली केली. राजगडास मातुश्रीस व सर्वांसही फत्तेची खबर लिहून पाठविली. त्यांनींही वर्तमान ऐकून साखरा वांटून, नगारे-करणे केले, भांडीं मारिलीं. मोठी खुशाली केली. येणें रितीनें राजियाकडील वर्तमान जाहालें.

त्याउपरि विजापुरास चवथे दिवशीं जासूद, हरकारे यांणीं खबर पादशाहास व पादशाहा-जादीस जाहीर केली कीं, "अफजलखान खांसा मारून शीर कापून नेलें. कुल लष्कर लुटून फस्त केलें." ऐसें सांगतांच अली अदलशाहा तक्तावरून उतरोन, महालांत जाऊन, पलंगावरि निजला. [ त्याणें ] बहूत खेद केला. असेंच पादशाहा-जादीस खबर लागतांच पलंगावरि बैसली होती तेथेंच "अल्ला अल्ला ! खुदा खुदा !" म्हणून आंग पलंगावरि टाकून रडत पडली. "मुसलमानाची पादशाही खुदानें बुडविली," ऐसा कित्येक विलाप करून बहूत शोक केला. पादशाहा-जादीनें तीन

---

* एकांगी करून=स्वतांचे बळानें, एकट्यानेंच. ४६. जेथें जेथें हा शब्द आला आहे तेथें तेथें मूळांत 'अनात' (अजात ?) असें दिसतें. ४७. झुंजारराव घाडगा हा शाहाजीचा स्नेही होता. त्यास शिवाजीनें आपणाकडे राहण्याचा फार आग्रह केला; परंतु तो तें ऐकेना, तेव्हां त्यास पोषाख देऊन निरोप दिला. पाडाव सांपडलेल्या सरदारांचा शिवाजी नेहमीं चांगला मानमरातब ठेवी. ‡ येथें ग्रां० ड० म्हणतो त्याप्रमाणें हिवरें गांव इनाम दिल्याबद्दल उल्लेख नाहीं.

दिवस अन्न-उदक [ घेतलें ] नाहीं. तसेच कुल मोठमोठे वजीर व लष्कर व कुल शहर दिलगीर जाहालें. म्हणूं लागले कीं, " उद्यां राजा येऊन शहर मारील व कोट घेईल." ऐसे घाबरे जाहाले. " खुदानें मुसलमानाची पातशाही दूर करून मराठ्यांसि दिली असें वाटतें," असें म्हणों लागलें.

त्या उपरांत मग राजियासि स्वप्नास श्रीभवानी तुळजापूरची येऊन बोलूं लागली कीं, "आपण अफजल तुझ्या हातें मारविला व कित्येक पुढेंही आले त्यांस पराभवांत नेलें. पुढेंही कर्तव्य उदंड[48] कारण करणें आहे. आपण तुझ्या राज्यांत वास्तव्य करावें. आपली स्थापना करून पूजा-पूजन-प्रकार चालविणें." त्याउपरि राजियानें गंडकी[49] नदीस द्रव्य गाडियावरि घालून, गंडकी पाषाण आणून, श्रीभवानी सिद्ध करून, प्रतापगडा [वर] देवीची स्थापना केली. धर्मदान उदंड केला. देवीस रत्नखचित अलंकार भूषणें नानाप्रकारें करून दिलीं. महालमोकाशे देऊन सचंतर[50] हवालदार व मुजुमदार व पेशवे देवीचे करून महोत्साव चालविला. नवस यात्रा सर्व्रदां तुळजापूरच्या प्रमाणें तेथें चालती जाली. आणि तुळजापूरचे यात्रेस लोक जातात त्यांस दृष्टांत स्वप्नें होतात कीं, " आपण प्रतापगडास आहें. तेथें तुम्हीं जाऊन दर्शन घेणें व नवस फेडणें. " असें [ देवी ] बोलूं लागली. मोठें जागृत स्थान जाहालें.

या नंतरि, विजापूरचा मातबर वजीर अफजलखान होता तो बुडविला, तेव्हां पातशाही कमतर पडली, असें समजून राजियानें विजापूरचे किल्ले तळ-कोंकणांत होते ते सर्व घेतले. पन्नास साठ गड घेतले. तळकोंकण काबीज केलें. वर-घाटही घेतला. तेव्हां लष्कर पागा सात हजार व शिलेदार आठ हजार, एकूण पंधरा हजार व हशम लोक बारा हजार ऐसी तोलेंदार[51]

---

४८. उदंड=पुष्कळ, मोठें. ४९. गंडकी, नारायणी ऊर्फ शाळिग्रामी–ही नदी नेपाळांतून वाहात येऊन भागीरथीस मिळते. ५०. सचंतर=स्वतंत्र, निराळे. तळकोंकण, घाटमाथा व देश हे महाराष्ट्राचे तीन भाग. ५१. तोलदार=मोठी, विशाळ ह्या अर्थी.

फौज जमा जाहाली. लष्कर कुल जमाव घेऊन नेताजी पालकर सरनोबत मोंगलाईत स्वाऱ्या करून, बालेघाट, परांडे, हवेली, कल्याण[52], कलबुर्गे, आवसें, उदगीर, गंगातीर[53] पावेतों मुलूख मारीत चालले. खंडण्या घेतल्या. मुलूख जप्त केला. औरंगाबादचे पुरे मारिले. मोंगलाकडील फौजदार[54] औरंगाबादेंत होता, तो चालून आला. त्याशीं युद्ध जाहालें[55]. हत्ती घोडे पाडाव केले. मोंगलाईत धुंद उठविली. ऐसा पराक्रम करीत चालले[56].

जे जे गड घेतले त्या गडांवर राजियानें कारभारी बंदोबस्ती ऐसी पद्धत घातली कीं, गडावरि हवालदार एक व सबनीस एक व सरनोबत एक, असे तिघेजण एका प्रतीचे. जो कारभार करणें तो तिघांनीं एका प्रतीचा करावा. गडावरि गल्ल्याचें, सामानाचें अंबर[57] करावें. त्यास कारखाननीस म्हणून कारभारी केला. त्याचे विद्यमानें सर्व कारखाने यांस जमाखर्च लिहावा. गड तोलदार आहे तेथें, त्या गडाचा घेरा थोर, त्या जागां सात पांच तट-

---

५२. देशावरील कल्याणी. ५३. गंगातीर=गोदातीर. ५४. ' सुभेदार ' म० प्रत. ५५. " त्यासि जिवें मारिलें " म० प्रत. ५६. नोवेंबर १६५९ मध्यें अफजलखानास मारिलें. दिसेंबरमध्यें विजापूरचा हस्तक रुस्तुम झुमान याचा पन्हाळा किल्ला घेतला. मे महिन्यांत सिद्दी जोहरचा पन्हाळ्यास वेढा पडला. तेथून शिवाजीचें निसटणें, बाजी परभूचें शौर्य, सावंताशीं बाजी पासलकराचें युद्ध व त्याचा मृत्यू, सिद्दीचें पारिपत्य, विजापुरापर्यंत लुटालूट, बाजी घोरपड्याचा वध, शाहाजीची भेट, विजापूरकरांशीं शिवाजीचा गुप्त रितीनें झालेला सल्ला, वगैरे दोन वर्षांची हकीकत येथें दिलेली नाहीं. विजापुराशीं आंतून सल्ला झाल्यावर व मोंगलांनीं कल्याणभिवंडी परत घेतल्यानंतर सन १६६२ मध्यें वर लिहिल्याप्रमाणें मोरोपंत व नेताजी यांनीं मोंगलांचे मुलुखांत धामधूम उडविली. या वेळीं (१६६२) शिवाजी जवळ निदान ५० हजार पायदळ व ७ हजार स्वार अशी फौज होती. त्याचा मुलूख कोंकणांत कल्याणभिवंडीपासून गोंव्यापर्यंत सुमारें २०० मैल व देशावर भीमा व वारणा या नद्यांच्यामधील १६० मैल इतका होता. ह्या मुलुखाची रुंदी कोठें कोठें १०० मैल होती. ग्रांट डफ. ५७. अंबर=कोठार.

सरनोबत ठेवावे. त्यांस तट वांटून द्यावे. हुशारी-खबरदारीस त्यांनीं सावध असावें. गडावरि लोक ठेवावे, त्यांस दाहा लोकांस एक नाईक करावा. 'नऊ पाईक दाहावा नाईक[५८]', येणेंप्रमाणें जातीचे[५९] लोक ठेवावे. लोकांत बंदुखी व इटेकरी[६०] व तिरंदाज व आडहत्यारी* असे लोक मर्दाने चौकशीनें आपण राजियांनीं नजरगुजर[६१] [ करून ] एक एक माणूस पाहून ठेवावें. गडावरि लोक हवालदार व सरनोबत मराठे जातिवंत ठेवावे. त्यांस जामीन आपले हुजरातीस लोक असतील त्यांपैकीं घेऊन मग ठेवावे. सबनीस ब्राह्मण हुजरातीचे ओळखीचे ठेवावे व कारखाननीस परभू ठेवावे. असे एकास एक प्रतिमेळ ठेवावे. एक हवालदाराचे हातीं किल्ला नाहीं. हरऐक[६२] फितवा-फांदा यास किल्ला कोणाच्यानें देववेना. ये रितीनें बंदोबस्तीनें गड-कोटाचे मामले केले. नवी पद्धत घातली.

तसेंच लष्करांत पागा केली. पागेचें बळ तोलदार केलें. पागांच्या तोल[६३]-दारीखालीं शिलेदार ठेविले. स्वतंत्र बंड कोणाचें चालेना. पागेमध्यें दर घोड्यासि बारगीर एक. [असे] पंचवीस बारगिरांस मराठा धारकरी हवालदार एक केला. पांच हवाल्यांचा एक जुमला म्हणून नांव ठेविलें. जुमालदारास पांचशें होन तैनात व पालखी त्यास एक, व [ त्याच्या ] मजमुदारास शें सवाशें होनांची [तैनात] करावी. पंचवीस घोड्यांस एक पखालजी व एक नालबंद. असे दाहा जुमले म्हणजे एक हजारी[६४]. यास एक हजार होन तैनात, एक मजुमदार व एक मराठा कारभारी व एक जमनीस[६५] परभू कायस्थ. त्यांस पांचशें होन. याप्रमाणें असामींस तैनात [व] पालखी द्यावी.

---

५८. पाईक=पायींचा शिपाई, घोडेस्वार नव्हे. ५९. जातीचे=जातिवंत, चांगल्या कुळांतील. ६०- ' हेटकरी ' म० प्रत. * आडहत्यारी=सुरे, कोयते, माडू, कटार वापरणारे. ६१. नजरगुजर=नजर-गुजारत= पाहाणी. ६२. हरएक=कोणताही. ६३. तोलदारी=दरारा, अंमल ६४. " पांच जुमल्यांचा ( १२५ ) एक सुभा, व दहा सुभ्यांचा ( १२५० ) एक पंचहजारी " असें ग्रांट डफ म्हणतो. ६५. जमनीस=मुलखी कामगार.

आला जमाखर्च चौघांचे विद्यमानें करावा. अशा पांचा हजारिया मिळोन एक पांचहजारी करावा. त्यास दोन हजार होन तैनात. तसेच मजुमदार, कारभारी, जमनीस करावे. अशा पांच हजारिया सरनोबताच्या हुकुमांत. ये जातीचा मामला पागेचा. तसे शिलेदाराकडे सुभे वेगळाले, तेही सरनोबताचे आज्ञेंत. पागा [ व ] शिलेदार मिळोन सरनोबत याचे आज्ञेंत वर्तावें. दर हजारी, पंचहजारी, सरनोबत यांजवळून वाकानिसीचे कारकून व हरकारे व जासूद ठेवावे. सरनोबताजवळ बहिरजी जाधव नाईक, मोठा शाहाणा, जासुदांचा नाईक केला. तो बहूत हुशार चौकस करून ठेविला.

लष्कर पावसाळिया दिवशीं छावणीस आपले देशांत यावें. त्यास दाणा, रतीब, औषधें, घोडियांस [व] लोकांस घरें, गवतानें शाकारून ठेवविलीं असावीं. दसरा होतांच छावणीहून लष्कर कूच करून जावें. जातेसमयीं कुल लष्करचे लहान थोर लोकांचे बिशादीचे[६६] जाबते[६७] करावे, आणि मुलुख-गिरीस जावें. आठ महिने बाहेर लष्करांनीं परमुलखांत पोट भरावें. खंडण्या घ्याव्या. लष्करांत बायको व बटकी व कलावंतीण नसावी. जो बाळगील त्याची गर्दन मारावी. पर मुलखांत पोर बायका न धरावीं. मर्दाना सांपडला तरि धरावा. गाई न धरावी. बईल ओझ्यास मात्र धरावा. ब्राह्मणांस उपद्रव न द्यावा. खंडणी केल्या जागां ओळखियासि ब्राह्मण न घ्यावा. कोणी बदअमॅल[६८] न करावा. आठ महिने परमुलखांत स्वारी करावी. वैशाख-मासीं परतोन छावणीस येतांच आपले मुलखाचे सरदेश[६९] कुल लष्कराचा झाडा घ्यावा. पूर्वील बिशादीचे जाबते रुजू घालावे. ज्याजती होईल तितकी किंमत करून त्याच्या हक्कांत[७०] धरावी. थोर किंमतीची वस्तभाव असलियास दिवाणांत[७१] द्यावी. कोणी चोरून ठेवील आणि दाखल सरदारास जाहलियानें शासन करावें. लष्कर छावणीस अलियावर हिशेब करून सोनेंरूपें, जड-

६६. बिशाद=मालमत्ता, चीजवस्त. ६७. जाबता=यादी, टिप्पण. ६८. बद अमल=बदकर्म, जुलूम. ' बदमामला ' पाठांतर. ६९. सरद=सरहद्द, शींव. ७०. " तैनातींत " पाठांतर. ७१. दिवाणांत=सरकारांत.

जवाहीर व कापड वस्तभाव कुल सरदारांनीं बराबर घेऊन राजाचे दर्शनास जावें. तेथें अवघे हिशेब समजावून माल हुजूर द्यावा आणि लष्करच्या लोकांचे हिशेब देणें, [व] फाजील समजावीस जो ऐवज जो मागणें तो हुजूर मागावा. मग छावणीस यावें. काम कष्ट मशागत[७२] केलिया लोकांस सरंजाम करून द्यावा. बेकैद वर्तणूक कोणीं केली असेल आणि नामर्दी केली असेल त्यांची चौकशी करून, बहुतां मतें शोध करून, त्यास दूर करून शासन करावें. वरचेवर शोध करावा. चार मास छावणी करावी आणि राजाचे भेटीस दसऱ्यास जावें. राजियाच्या आज्ञेनें ज्या प्रांतीं स्वारी जावयाची होईल त्या प्रांतीं जावें. अशी लष्करची* रीत.

तसेंच मावळे लोकांत दाहा लोकांत एक नाईक. पन्नास लोक म्हणजे पंच-नायकी थांस एक हवालदार. दोन तीन हवाले मिळन एक जुमलेदार. दाहा जुमले मिळून एक हजारी. जुमलेदारांस शंभर होन तैनात सालीना. एक सबनीस, त्यास चाळीस होन तैनात. हजारी यास पांचशें होन तैनात. [त्याच्या] सबनिसास शंभर सवाशें होन पर्यंत. ऐशा हजारियांस [नेमणुका केल्या.] सात हजारिया[७३] मिळोन एक सरनौबत येसजी कंक म्हणून केला. याचे आज्ञेंत सर्वांनीं असावें.

सरनौबतास व मजुमदारास व कारकुनांस व हुजुरांतील लोकांस तनखे वराता[७४] देत होते. शेत करीत होते त्याचा आकार रयतेप्रमाणें त्यांच्या हक्कांत धरीत होते. वरकड वांटणी हुजूर व मुलुकावरि वराता. येणेंप्रमाणें सालझाडा वरचेवर करीत होते. लष्करांत व हशमास व गडास एकंदर मोकाशे महाल गांव दरोबस्त देणें नाहीं[७५]. जें देणें तें वरातेनें[७५] द्यावें. अगर पोत्याहून[७६] रोख ऐवज द्यावा. मुलखांत साहेबी[७७] कारकुनाखेरीज कोणाची नाहीं. लष्करास व हशमास व गडास देणें तें कारकुनांनीं द्यावें. मोकाशी जाहालियानें रयत

---

७२. मशागत=श्रम, मेहनत. *लष्करची=घोडदळाची. ७३. "असे सर्व हजारी" पाठांतर. ७४. वरात=पैसा देण्याविषयीं चिट्ठी. ७५. मोकाशे महाल इ०—प्रांताचे उत्पन्नावर हक्क अगर जाहगीर बिलकुल द्यावयाची नाहीं. ७६. पोतें=सरकारी खजीना. ७७. साहेबी=अंमल, मुखत्यारी.

अँफरा होईल आणि बळावेल. कँमाविशीची कैद चालणार नाहीं. रयत बळावली म्हणजे जागां जागां बंडें होतील. ज्यास मोकासे द्यावे तो व जमीदार एक जाहालियानें बेकैद होतील. म्हणून मोकाशे कोणास देणेचे नाहींत.

मुलूख काबीज होतो त्यास मुलखास सरबरा* चौकशीस कारकून ठेवावा. आधीं लिहिणार चौकस दप्तरदारी करून, कागदघडणी [ ? ] करून, मोकाँसबा दिला म्हणजे दप्तरदारीमध्यें शाहाणा पाहून मुलुखांत ठेवावा आणि माहालची मजमू सांगावी. कोणास माहालचा हवाला सांगावा. कोणास सुभ्याची मजमू सांगावी. पुढें होतां होतां शाहाणा पाहून हवालदार चौकस पाहून सुभा द्यावा. सुभ्याचा मजमुदार लिहिणार, चौकस, हिशेब जाणता त्यासच मामला माहालाचा सांगावा. केवळ लिहिणें येईना, कमाविशी न केली, त्यास मुलकीचा हुद्दा न सांगावा आणि पादशाहींत चाकरी करणें अगर घोडें घेऊन शिलेदारी करणें, असें सांगोन निरोप द्यावा. मुलखास कारकून ठेवावे, त्यांस माहाल पाहून हवालदारास तीन होन तैनात अगर चार पांच होन इतकी तैनात; मजमुदारास तीन चार पांच, पन्नास पाऊणशें होन, येणेंप्रमाणें करावें. दोन माहाल मिळोन लाख, सव्वा लाख, पाऊण लाख होन पाहून एक सुभेदार व एक कारकून करावा. त्यास दर असामीस चारशें होन तैनात करावी. मजमुदार सुभ्याचा करावा त्यास शंभर सवाशें होन करावे. सुभेदारास पालखी चारशें होनांत करार करवावी. मजमुदारास अबदागिरी द्यावी. तैनात सरकारची द्यावी. पादशाहींत छत्री वजिरी उमराव मातबर लोकांस होती, तो शिरस्ता मोडून टाकिला; कीं पादशाहावर छत्र आणि चाकर लोकांवरही छत्र, ही गैर-पद्धत. याकरितां पादशाही कायदा छत्रीचा मोडून अबदागिरीचा घातला. सर्वत्र लष्कर, हशम मुलुखगिरीस [जातील] त्यांत भर सवाशें होन तैनात असेल त्यानें अबदागिरी बाळगावी.

---

७८. अफरा—अव्यवस्थित. ७९. कमाविशीची कैद=राजाच्या मुलकी कामगारांचा अधिकार अथवा अंमल. *सरबरा=वहिवाटदार, अंमल करणारा. ८०. " हिशेब " पाठांतर. ' मोसबा ' असें वरील पाठांत असावेंसें वाटतें.

मुलुखांत देश पाहून लाख रुपयास सुभा ठेविला. धामधुमीचा मुलूख सरदेचा पाहून मुलुखगिरीच्या कारकुनासमागमें लष्कर, स्वार, हशम जे जागां जितकी तोलदारी पाहिजे तितकी करून द्यावी.

[ तशीच ] मुलखाची जमीन मोजणी करून धुरंगें[८१], झाड, चावर करून आकार केला. पांच हात व पांच मुठींची काठी. हात चवदा तसूंचा असावा. हात व मुठी मिळून बैंशी तसूंची लांबी काठीची. वीस काठ्या औरस चौरस त्यांचा बिघा एक. बिघे एकशें वीस त्यांचा एक चावर. अशी जमीन मोजून, आकारून गांवची गांवास मोजून चौकशी केली. बिघेयास पिकाचा आकार करून पांच तक्षिमा[८२] पिकाच्या करून तीन तक्षिमा रयतेस द्याव्या. दोन तक्षिमा दिवाणांत घ्याव्या. येणेंप्रमाणें रयतेपासून घ्यावें. नवी रयत येईल त्यास गुरेंढोरें द्यावीं[८३]. बीजास दाणा पैका द्यावा. भक्षावयासि दाणे पैका द्यावा तो ऐवज दोहों चोहों वर्षांनीं आयुर्दाव पाहून उगवून घ्यावा. ये जातीचें रयतेचें पालग्रहण करावें. गांवचा गांव रयतेची रयत कारकुनानें कमावीस पाहून रयतेपासून वसूल पिकाचे पिकावर घ्यावा. मुलखांत जमीदार, देशमुख व देसाई यांचे जप्तीखालीं कैदेंत[८४] रयत नाहीं. यांणीं साहेबी करून नागवीन म्हटलियानें त्यांचे हातीं नाहीं. इदलशाही, निजामशाही, मोंगलाई देश कबज केला, त्या देशांत मुलकांचे पाटील कुळकर्णी यांचे हातीं [व] देशमुखांचे हातीं कुल रयत. यांणीं कमाविसी करावी आणि मोघम टक्का द्यावा. हजार दोन हजार जे गांवीं मिरासदारांनीं घ्यावे, ते गांवीं दोनशें तीनशें दिवाणांत खंडमक्ता द्यावा. त्यामुळें मिरासदार पैकेकरी होऊन गांवास हुंडे[८५], वाडे, कोट बांधून प्यादे बंदुखी ठेवून बळावले. दिवाणास भेटणें नाहीं.

---

८१. धुरंग, झाड वगैरे जमीनीचीं चौरस मापें. " दुरंग, जाड " पाठांतर. ८२. तक्षिमा=वांटे, विभाग. " पांचवी तक्षीम दिवाणांत द्यावी." " पांच रयतेस द्याव्या व दोन दिवाणांत " पाठांतरें. ८३. " नसल्यास द्यावीं " महाड प्रत. मिरासदार=देशक ( देशमुख, देसाई ). ८४. कैदेंत=ताब्यांत, अमलांत. ८५. हुडे=बुरूज.

दिवाणानें गुंजाईस अधिक सांगितल्यानें भांडावयास उभे राहातींत. ये जातीनें पुंड होऊन देश बळाविले. त्यांस राजियानें देश काबीज करून हुडे, वाडे, कोट पाडिले. नामांकित कोट जाहाला तेथें [आपलें] ठाणें ठेविलें. आणि मिरासदाराचे हातीं नाहींसें ठेविलें. असें करून मिरासदार इनाम इजारतीनें मनास मानेसारखें आपण घेत होते तें सर्व अमीनत करून जमीदारास गल्ला व नख्त गांव पाहून देशमुखास व देशकुळकर्णी यांस व पाटील कुळकर्णी यांसि हक्क बांधून दिला. जमीदारांनीं वाडा बुरजांचा बांधूं नये. घर बांधून राहावें. ऐसा मुलकाचा बंद केला.

मुलखांत देव देवस्थानें जागजागां होतीं त्यांस दिवाबत्ती, नैवेद्य, अभिषेक, स्थान पाहून यथायोग्य चालविलें. मुसलमानांचे पीर, मसिदी, त्यांचे दिवाबत्ती नैवेद्य स्थान पाहून चालविलें. वैदिक ब्राह्मण यांसि योगक्षेम ब्राह्मण विद्यावंत, वेदशास्त्रसंपन्न, ज्योतिषी, अनुष्ठानी, तपस्वी गांवोगांवीं सत्पुरुष पाहून त्यांचें कुटुंब पाहून अन्नवस्त्र ज्यांस लागेल त्याप्रमाणें, धान्य द्रव्य त्यांस गांवचे गांवीं माहालीं नेमून देऊन, साल दरसाल त्यांस कारकुनांनीं पाववावें. ब्राह्मणांनीं तें अन्न भक्षून, स्नानसंध्या करून, राजियासि कल्याण चिंतून सुखरूप असावें. असे गड, कोट, लष्कर, हशम, मुलूख हुजरातीची चौकशी करून राज्य करीत चाललें.

मोंगलाईत धुंद उठविली ही खबर दिल्लीस औरंगजेब पादशाहास कळोन, मनांत बहूत चिंतातुर होऊन, "शिवाजी बळाविला; विजापूरच्या अफजलखानासारखी फौज, बारा हजार स्वार, बुडविले; गडकोट पादशाहाचे घेत चालिला; त्याची तरतूद काय करावी?" म्हणून विचार करून, कुल वजीर

---

८६. गुंजाईस, गुंजावीस=चुकी, कसर. गुंजाईस अधिक=कमजास्त. ८७. दिवाणानें भेटीस बोलाविलें तर झुंजास उभें राहावें." पाठांतर. ८८. त्यास=त्याजकरितां. ८९. अमानत=मना, तकूब. ९०. हा मुलुखाचा बंदोबस्त व इतर नियम करण्यास शिवाजीस १६६८ पर्यंत नीट फावलेंच नाहीं. त्या सालीं त्याणें कायदेकानू करून सर्व प्रकारचे नेम बांधिले, असें ग्रां० ड० म्हणतो.

उमराव बोलावून आणून एक लाख सुभा फौज घोडा राजियावर दक्षणेस रवाना करावा म्हणून विचार करितां, नबाब शास्ताखान म्हणजे पादशाहाची प्रतिमाच[११] दुसरी, आणि नातलग, याची रवानगी करावी असा मजकूर करून नबाबास बोलावून आणून विचार केला. नबाब बोलला जे, "शिवाजी म्हणजे काय? त्यासि जातांच कैद करतों. गड कोट मुलूख घेऊन फत्ते करितों." अशा कित्येक गोष्टी बोलून सिद्ध जाहाले. उपरांत पादशाहा बहूत संतोष* होऊन शिरची कलगी व पोशागी सनगें व घोडे, हत्ती, अलंकार देऊन खुशाली केली. बराबरि पाऊण लाख घोडा व हत्ती, यांखेरीज कित्येक लोक मुच्छदी वगैरे, तिरंदाज, बरखंदाज[१२], रजपूत व स ती ली वाले [?] तसेच हत्तीचा तोफखाना, उंटाचा तोफखाना, घोडियावरील तोफखाना, बरचीवाले, आडहत्यारी, पाईच्यांची गणतीच नाहीं. बराबरि फरासखाना त्यासि शंभर हत्ती, तसेच भांडते हत्ती चारशें, असे पांच साहाशें हत्ती. तैसेच अगणित उंट. याखेरीज बाजारबुणगे, दारूगोळी, बाणांच्या भांडत्या गाड्या, आराबा. असें अमर्याद सैन्य दिलें. स्वारी म्हणजे कलयुगींचा रावणच! जैशी रावणाची संपत्तीची गणना न करवे, तैसाच बरोबरी खजीना बेमोहिंन[१३] हत्ती, उंटें, खेचरें, गाडियावर भरून नख्त व सोनें, रुपें, मोहरा, होन, रुपये असे बत्तीस कोटी द्रव्य घेऊन दिल्लीहून निघाला. नबाब शास्ताखान म्हणजे पादशाहाची प्रतिमाच दुसरी. ऐसा सेनासमुद्र सर्व संपत्ती-निशीं दक्षणेस राजियावर चाल करून आला. लष्कर मुकाम करीत तेव्हां दोन गांवें लांब व गांव‡ दीड गांव रुंद लष्कर राहात असे. मजल दरमजल चालून येऊन तीन महिन्यांनीं पुणियास आला.

---

११. "शास्ताखान औरंगजेब याचा मावसा, मोठा तोलदार, यासभागमें वजीर उमराव थोर थोर निवडक मर्दाने एक लक्ष स्वार देऊन रवाना केलें, आणि त्यास बुद्धिवाद सांगितला कीं, "तुम्हीं जाऊन शिवाजीराजे यांस मारून गर्दीस मेळविणें. गडकोट घेऊन जप्त करणें." पाठांतर. *संतोष=संतुष्ट. १२. बरखंदाज=बंदूकवाले. १३. बेमोहीन=बेमोयिन=असंख्य, अगणित. ‡ गांव=चारकोस=दहा मैल.

हें वर्तमान दिल्लीहून रवाना होतांच राजियासि कळलें. राजे राजगडास होते. कुल सरकारकून व मोठे मोठे लोक सरनोबत बोलावून विचार केला. सर्वांचे मतें कीं, " सला करावा. भेटावें. युद्ध करितां गांठ[९४] न पडे. आपली फौज काय, दिल्लीची फौज काय ! " असा [विचार] जाला. राजियाच्या मतें सला करावा तरि कोणी मातबर रजपूत नाहीं, जे आपणही रजपूत, तेही रजपूत, हिंदूधर्म रक्षून आपलें संरक्षण करील. शास्ताखान म्हणजे मुसलमान, पातशाहाचा नातलग, येथें लांचलुचपत चालेना. अगर आपणास रक्षीना. सल्यानें भेटल्यानें नाश करील. आपणास अपायच आहे. ऐशी तँजवीज[९५] केली. तेव्हां निदानीं मारतां जें होईल तें करावें अशी हिम्मत राजियानें धरिली. तों ते दिवशीं रात्रीं श्रीभवानी राजियाचे आंगांतं[९६] बोलूं लागली कीं, " लेंकरास म्हणावें कीं, शास्ताखान येतो त्याची फिकीर न करणें. जैसा अफजलखान मारिला तैसा शास्ताखान येऊन उतरल्यावरि त्याचे गोटांत शिरून मारामारी करणें. पराभवातें पाववित्यें. " असें श्रीनें सांगोन मागती राजे सावध जाहाले. जवळ कारकून होते त्यांनीं श्रीचीं वाक्यें लेहून ठेविलीं होतीं तीं राजियास सांगितलीं. राजियांनीं श्री प्रसन्न जाहाली हें कळोन हिम्मत धरली. आणि आपले लष्करांत व मावळे व हुजूर लोकांत निवड करून, चँखोट[९७] धारकरी माणूस निवडिले. निवडक हजार माणूस काढिले. वरकड लष्करामध्यें हजार दोन हजार सडे सडे राऊत फौजेंत निवडिले. शास्ताखान पुणियास आला ही खबर तँहकीक[९८] आणविली, आणि राजे राजगँडावरून[९९] सडे[१] होऊन खालीं उतरून, निवडक लोक व लष्कर घेऊन चालिले. बाबाजी बापूजी व चिमणाजी बापूजी

---

९४. गांठ न पडे=दाद, टिकाव लागणार नाहीं. ९५. तजवीज=योजना, विचार. ९६. शिवाजीच्या आंगांत देवीचा संचार होत असे. संचार झाला म्हणजे चिटणीस व वाकनीस जवळ बसून त्या वेळा राजाच्या तोंडांतून जे शब्द निघत ते टिपून घेत असत. ते शब्द वारें गेल्यानंतर राजास दाखवीत, व त्याचा अर्थ होईल त्या प्रमाणें तो पुढें वर्तन करी. ९७. " उत्तम. " पाठांतर. ९८. तहकीक= पक्की, निश्चित. ९९. ' सिंहगडावरून ' ग्रां० ड० १. ' मुस्तेद ' पाठांतर.

देशकुळकर्णी, तर्फ खेडें, हे दोघे बहूत शाहाणे व शूर, राजियाचे प्रीतिपात्र. हे दोघे बंधू बरोबरी घेतले. राजियांनीं नेताजी पालकर व मोरोपंत पेशवे, यांच्या दोन फौजा केल्या. नेताजी पालकर पागा देखील[३] एक फौज केली. शिलेदार व हशम मावळे मिळोन एक फौज पेशवे [यांची.] अशा दोन फौजा शास्ताखानाच्या गोटाबाहेर अर्ध कोशावर दोन तर्फा उभ्या केल्या. आणि खासा राजियांनीं ढाल तरवार हातीं घेऊन, तयार होऊन, हजार माणूस पायउतारा बरोबर घेतले. आणि नबाबाचे गोटांत चालिले. बाबाजी बापूजी व चिमणाजी बापूजी खेडकर पुढें चालिले. त्यांचे पाठीवर कुल लोक व राजे चालिले. तांब्रांचें[४] दळ थोर, जागां जागां लष्करांत राजियासि कोणाचे लोक ? कोण ? कोठें गेले होते ? म्हणून पुसतात. "कटकांतील लोक, चौकी पहाऱ्यांस गेलों होतों," असें भाषण बाबाजी बापूजी व चिमणाजी बापूजी बोलत चालिले. इतकियांत मध्यान्ह[६]-रात्र जाहाली. नबाबाच्या डेऱ्याजवळ गेले. हजार माणसांच्या फौजा केल्या. डेऱ्यास जाऊन दोन तर्फांनीं उभे राहिले. दोनशें माणूस त्यामध्यें निवडून खासा राजियानें आंगेंचें[७] चिमणाजी बापूजीस सांगोन बाड[८] कटारीनें चिरून आंत शिरले. तों डेरियांत डेरे, सात बाडांचे फेरे, तितकेही फोडून चिरून आंत गेले. लोक चौकीचे निजले होते. त्यांस कळों दिलें नाहीं. तेव्हां राजा खासा नबाबाचे डेरियासि पावले. डेरियांत डेरे सात व दाया असा समुदाय बायका होत्या, त्यांस कळलें कीं गनीम डेरियांत आला. हें

२. 'खेडबारकर' म० प्रत. 'खेडेंबारें' असें शिवापुराजवळील खेडास म्हणतात. त्या खेडचे हे देशपांडे. ३. देखील=सुद्धां, सहित, ४. तांब्र=यवन. ५. 'छबिन्यास'. पाठांतर. ६. येथ 'मध्यरात्र' असें असावें. 'मध्यान्ह रात्र' असें वामन पंडितही लिहितो। 'तिला शोधितां रात्र मध्यान्ह जाली.' ७. 'समागमें.' पाठांतर. ८. 'बाड'=कनाथ, पडदा. ९-९. "तो डेरियांत बायका व खान असे होते. त्यांमध्यें कित्येक समया व मेणबत्त्या लाऊन जागत होते. हे परके लोक देखोन त्यांणीं गिल्ला केला. इतक्यांत चिमणाजी बापूजी याणें

( पुढें चालू. )

कळोन नबाब शास्ताखान घाबिरा होऊन, मेणबत्या समया विझवून बायकांत लपून राहिला. राजा बायकांवर हात न करी. असे दोन घटका होते. इतक्यांत सवड पाहून नबाब बायकांतून एकीकडे होऊन तरवारीस हात घालावयासि गेला. ती नदर राजियानें धरून वार केला. खानाचीं बोटें तीन उडालीं. तेव्हां गलबा थोर जाहाला. गनीम आला असें कळून चौतर्फांनीं लष्कर तयार जालें. मग राजे बाहेर निघाले. चौकीचे लोक व लष्करचे लोक गनीम कोठें म्हणून धाऊं लागले. त्यांजबरोबर हेही गनीम कोठें म्हणोन धांवत धांवत बाहेर निघाले ! आणि आपली फौज सरनौबत व पेशवे होते त्यांत मिळून चालिले. गनिमाची[10] फौज कुल तयार होऊन आपले गोटांतच शोध करूं लागले. यांचा मार्ग लागत नाहीं म्हणून नीट वाटेनें निघोन ठिकाणीं पावली[11].

दिवस उगवलियावर उपरांत नबाबाच्या परामृषांस[12] कुल वजीर आले. पाहातात तों नबाबाचीं तीन बोटें तुटून गेलीं. वरकड कित्येक लोकांचा नाश व बायकांस व खोजेयांसि जखमा जाहाल्या. कित्येक लोक मेले. असें कळून नबाब बोलिला जे, "गनीम इतका खाशा डेऱ्यापर्यंत येई तों कोणी वजीर हुशार जाले नाहींत, खबरदार कोणी नाहीं. अवघे फितव्यांत मिळाले. आतां इतबार[13] कोणाचा येत नाहीं. आज राजा येऊन आपलीं बोटें तोडिलीं. उद्यां मागती येऊन आपलें शीर कापून नेईल. शिवाजी मोठा दगेखोर आहे.

---

( मागील पृष्ठावरून पुढें चालू. )

खोजे पांच पुढें पांचजण होते त्यांस मारिलें. वरकड बायका पळविल्या. त्यांमध्यें उरदाबेगीन बेवीस पंचवीस होत्या, त्या गुरगू घेऊन मारीत चालल्या. तेव्हां राजे यांचे लोकांनीं उरदाबेगीन पांच सात मारिल्या. त्याही दबून राहिल्या. इतका गलबला होतांच नबाबास कळलें कीं, गलिमाचे लोक आले. त्याजवरून खासा राहुटींतून उठून बायकांत शिरला" महाड प्रत. उरदाबेगीन=उडदाबेगीन=लढाऊ बायका, बायका-शिपायी. गुरगू, गुरगूज=शस्त्रविशेष, गदा. १०. गनीम=शत्रु. येथें मोंगल. ११. "लग्नाच्या वराढी लोकांबरोबर शिवाजी आपल्या मावळ्यांसह शिरला, खान शिवाजीच्या वाड्यांत राहिला होता," असें ग्रांट डफ म्हणतात. १२. परामृष=परामर्ष=समाचार. १३. इतबार=विश्वास.

दगा दिधला. आणखी दगा देईल. आमच्या लष्करचा इतबार येत नाहीं. आतां येथून कूच करून माघारां दिल्लीस जावें. या लोकांबरोबर आपणास राहावत नाहीं." असा तूट विचार करून तिसरे दिवशीं कूच करून माघारा दिल्लीस चालला.

राजे राजगडास आले होते. बातमी खबर शत्रूच्या सैन्यांतून आणली कीं, "शास्ताखानाचीं तीन बोटें तुटोन गेलीं. उजवा हात थोटा जाहाला. वरकडही कित्येक लोक मेले. नबाब दहशत खाऊन पळोन दिल्लीस चालिला." हें वर्तमान आलें. त्याजवरून राजे बहूत खुशाल जाले कीं, "फत्ते होऊन आलों. शास्ताखानास शास्त केली. पातशाहानें नांव ठेविलें परंतु नांव यथार्थ ठेविलें नाहीं.[14] तें नांव आपण शास्त करून नांव रुजू[15] केलें!" अशी खुशाली करून साखरा वांटल्या. भांडीं मारलीं.

अशी फत्तेची खबर दिल्लीस पादशाहास अगोदरच जाहीर जाहाली होती. पातशाहा मनांत आश्चर्य करून मनांत बेदील जाले. "नबाबाची फौज म्हणजे काय, आणि फौजेंत राजा आंगें शिरून [ त्यानें ] मारामारी केली म्हणजे काय! शिवाजी अदमी नव्हे, बडा सैतान होय." ऐशा कित्येक गोष्टी बोलून राहिला. पुढें नबाब आला ऐसें कळोन दर्शन वर्ज्य केलें. एक तर मसलत नामोहरम जाहाली, दुसरी शास्त केली. या दोन गोष्टींवरून भेटीस येऊं न दिलें. आपले हवेलींत जाऊन राहाणें म्हणून सांगितलें. त्याजबरोबरि वजीर गेले होते त्यांस आणून अपमान केला आणि दौलतीं[16] मना केल्या. त्यांहीं उत्तर दिलें जे, "सरदार पादशाहांनीं दिला त्याच्या हुकमांत राहाणें म्हणून हुकूम केला. त्या कारितां सरदार नामोहरम होऊन आला, आम्हीं काय करावें? आतां मर्दांना सरदार देणें. त्याजबरोबरि जाऊन जुंज करून कस्त मशागत[17] करूं." असें उत्तर देतांच मागती सर्वांचा दिलासा[18] करून मनसबा करार केल्या. पुढें कोण

---

१४. 'हें व्यथ ठेविलें नाहीं.' 'नांवाप्रमाणें करामत केली नाहीं.' पाठांतरें. १५. रुजू=यथायोग्य, यथार्थ. १६. दौलता=सरंजाम, जागिरी. १७. कस्त, मशागत=मेहनत, श्रम. १८. दिलासा=आश्वासन.

सरदार पाठवावा ? कोण फत्ते करून येईल ? असा विचार करून सरदार निवडितां मिरजाराजा जयसिंग रजपूत निवडिला. त्यास आणून, घुशालखान्यांत[१९] बसोन पादशाहांनीं नानाप्रकारें सांगितलें कीं, " शिवाजीवर तुम्हीं जाणें. आपण पादशाहांनीं जावें किंवा तुम्हीं जावें. असें जाणोन तुम्हांस रवाना करितों. बरोबरि फौज देतों. नाना हुन्नरें शिवाजी हस्तगत करून बरोबरि घेऊन येणें." म्हणोन हत्ती, घोडे, ढाला, फिरंगा, तर्कशकमान, दौलत, इजाफीं[२०] देऊन, नांवाजून, तैसेच बरोबरि लढाईच्या तश्रीफा[२१] देऊन रवाना केले. दिलेलखान पठाण उमराव वजीर मोठा जोरावर त्यास पादशाहांनीं कुल फौजेची हौरोळी[२२] देऊन, पांच हजार पठाण बरोबरि दिले. दिलेलखानासही हत्ती, घोडे, वस्त्रें दिलीं. ऐशीं हजार स्वार बरोबरि दिले. याखेरीज जेजाला व तोफखाना असें नाना जातीचें दिलें. स्वार पठाण उन्माद रजपूत रवाना केले. पादशाहांनीं दिलेलखानास वेगळे वाटेनें अंतस्थीं बोलावून आणून सांगितलें कीं, " मिरजाराजा रजपूत आहे व शिवाजी हा हिंदू आहे. कांहीं फितवा करतील. त्यास तुम्ही आपले इतबारी, पादशाहाचे खानाजाद[२३] आहां. अशी बातमी राखोन दगा न खाणें." असें सांगितलें आणि पाठविलें.

ते दिल्लीहून निघाले तेव्हां पूर्वी शास्ताखान चालिला त्याप्रमाणें दळभार निघाला. पृथ्वी-आकाशपर्यंत एकच धुरळा उठला. ऐसा सेनासमुद्र दक्षिणेस चालिला. मजल-दर-मजल चालिले. मुकाम होय तेथें दीड गांव लांब, गांवभर रुंद, लष्कर राहात असे. तेव्हां जयसिंग राजियांनीं मनांत विचार केला कीं, " शिवाजी मोठा दगेखोर, मोठा हुन्नरवंत आणि मर्दाना शिपाई आंगाचा खासा आहे. अफजलखान आंगें मारिला. शास्ताखानाच्या डेऱ्यांत शिरोन मारामारी केली. आपणास यश कसें येईल ?"

---

१९. घुशालखाना= (स्नानमंदिर) =खलबतखाना. २०. इजाफा=अधीक. २१. तश्रीफा,=तशरिफा=पोषाक, वस्त्रें. २२. हारोळी=बिनी, अघाडी. २३. खानाजाद= ( आमच्या ) घरीं वाढलेले.

म्हणून चिंता केली. तेव्हां मोठमोठे ब्राह्मण पुरोहित यांनीं उपाय सांगितला. " देवी-प्रयोगीं अनुष्ठानें करावीं म्हणजे यश येईल ! " असें सांगितलें. मग मिरजा बोलिला जे, " कोटचंडी करावी आणि अकरा कोट लिंगें करावीं. कामनार्थ[२४] बगळामुखी[२५] कालरात्री प्रीत्यर्थ जप करावा. असें अनुष्ठान करावें." चारशें ब्राह्मण अनुष्ठानास घातले. प्रत्यहीं अनुष्ठान चालिलें. अनुष्ठानास दोन कोट रुपये अलाहिदा काढून ठेविले. आणि तीन मास अनुष्ठान चालून सिद्ध केलें. अनुष्ठानाची पूर्णाहुती करून, ब्राह्मणांस दान दक्षणा देऊन संतर्पण केलें. मग मजल-दरमजल चालिले.

या उपरि महाराज राजगडीं[२६] होते तों जासूद हलकारे आले. त्यांनीं खबर सांगितली कीं, " जयसिंग मिरजाराजा ऐशीं हजार स्वार बरोबरि दिलेलखान पांच हजार पठाण ऐशी फौज येत आहे." ऐसें ऐकून राजश्री विचारांत पडले. आपले कारकून हुजूर आणून विचार केला. त्यांणीं सर्वांनीं सांगितलें कीं, " अफजलखान मारिला आणि शास्ताखानास दगा दिला. ते गैरहुशार मुसलमान होते. हुन्नरही[२७] नवाच केला. [ तें ] सर्वही रजपुतास जाहीर आहे. दगा करूं देणार नाहीं. याशीं सला करावा." ऐसें बोलिले. राजे बोलिले जे, " रजपूत कैसा तरी वळला जाईल, परंतु हा दिलेलखान मोठा हरामजादा, बेमान आहे. पादशाहाचा मेहेरबानीचा अंतर्गत आहे. तो कांहीं भला नाहीं. तोच काय करील तें न कळे. तो बराबरि नसता तरि आमचा मनोरथ पूर्ण होता. बरें आतांच काय आहे! श्रीचें राज्य ! श्रीवर भार घातला आहे. तिचे चित्तास येईल तें ती करील," असें बोलिले. त्यावर तो दिवस गेला. दुसरे दिवशीं श्रीभवानी येऊन बोलूं लागली कीं, " अरे मुला, या वेळेचा प्रसंग कठीण आहे. जयसिंगास

---

२४. कामनार्थ=इष्ट गोष्टीचे सिद्धीसाठीं. २५. 'बगळामुखी कालरात्री' ही देवी कोण ? २६. रायगड येथें शिवाजी या वेळीं होता, असें ग्रांट डफचें म्हणणें आहे. जयसिंग येण्याच्या पूर्वीं नुकतेंच त्याणें आपलें आरमार गोंव्याच्या पलीकडे नेऊन बार्सीलोर ( बसनूर ? ) येथून अमूप लूट आणिली होती. २७. हुन्नर=युक्ती.

मारवत नाहीं. तो सला करीत नाहीं, भेटावें लागतें. भेटून दिल्लीस जावें[२८] लागेल. तेथें कठीण प्रसंग होईल. परंतु आपण बराबर येईन. लेंकरास नाना यत्नें करून रक्षून, घेऊन येईन. यशस्वी करीन. चिंता न करणें. म्हणोन लेंकरास सांगणें. लेंकरास आपलें राज्य आपण वरदान दिलें तें आपण कांहीं एक पिढी दिलें नाहीं, सत्तावीस पिढी दिलें. दक्षणेचें [राज्य] नर्मदापर्यंत दिलें असे. राज्याची चिंता मला आहे. पूर्ण समजणें. लेंकरूं वेडीवांकडी वर्तणूक करील तें सर्व आपणास सावरणें लागतें. कोणेविशीं चिंता न करणें." असें सांगोन श्री अदृश्य जाहाली. तीं वाक्यें लिहिणारांनीं लिहून ठेऊन ठेविलीं होतीं. त्याउपर राजे सावध जाहाले. मग श्रीचीं वाक्यें सर्वांनीं निवेदन केलीं. त्याजवरून राजे बहूत संतोष* होऊन, हिंमत धरली.

ऐशियांत जयसिंग [यानें] पुरंधर, कोंढाणा या दोहों गडांचे दरम्यान येऊन मुकाम केला. आणि राजियाकडे जासूद पत्रें पाठविलीं कीं, "तुम्ही शिसोदे रजपूत. आम्ही तुम्ही एकाचे एकच आहों. तुम्हीं भेटीस येणें. तुमचें सर्व प्रकारें बरें[२९] करूं." म्हणोन पत्रें पाठविलीं. तीं पत्रें राजगडास आलीं. राजियांनीं वाचून हेजीब कोण पाठवावा ही तजवीज करून विचार करितां रघुनाथपंडित थोर संनिध होते त्यांस पाठवावें. "रजपुताजवळ प्रसंग पडला तर हे थोर शास्त्रज्ञ आहेत. रजपूतही शास्त्र जाणतो. त्याशीं व यांशीं गांठ बरी पडेल[३०]." असा विचार करून रघुनाथपंडितांस पंडितराव म्हणून किताब दिला. आणि त्यांबरोबर वस्त्रें, अलंकार देऊन मिरजाराजियापाशीं पाठविलें. ते शत्रुसैन्यांत गेले.

राजियाचा हेजीब[३१] आला हें वर्तमान कळून मिरजाराजियांनीं बहूत सन्मान करून भेट घेतली. बोलणें जालें. जयसिंग बोलिला जे, "दिल्लीचा पादशाहा बहूत जोरावर, याशीं शत्रुत्व लावालियानें शेवट लागणार नाहीं.

---

२८. मागें पृष्ठ ३२ टीप ९६ पाहा. * संतुष्ट ह्या अर्थी. २९. 'गोमटें' महाड प्रत. ३०. "रजपुताजवळ पंडिताचा प्रसंग फार. रजपूत शाहाणा शास्त्र जाणता." पाठांतर. ३१. हेजीब=वकील.

राजियांनीं आपले भेटीस यावें. आपण बराबर घेऊन जाऊन पादशाहाचीं भेट करवूं. जैसा रामसिंग आपला पुत्र, तैसे तुम्ही आपले आहां. आपण तुमचें वाईट करणार नाहीं." येविशीं श्रीकर्पूरगौराची पूजा करून बेल तुळशीं दिल्या[३२]. आणि पंडितरायासि वस्त्रें दिलीं व राजियासि वस्त्रें, अलंकार पाठविले. आणि सांगोन पाठविलें कीं, "भेटीस येणें. साहा चार महिने गड, कोट भांडवणें. तोलदारी दाखवणें. मग भेटीस[३३] येणें." असें सांगून रघुनाथ पंडितराऊ यांस गुप्तरूपें निरोप दिला. ते परतोन राजगडास राजियाजवळ येऊन वर्तमान सांगितलें. त्याजवरून राजे संतुष्ट जाहाले. जागां जागां गड, कोट यांसि ताकीद करून तमाम मजबुदी करविली. आणि गड भांडवणें म्हणून स्थळास्थळास सांगोन पाठविलें.

पुढें जयसिंगाच्या लष्करांत राजियाचा हेजीब आला होता हें वर्तमान दिलेलखानास कळून मनांत कष्टी जाहाला. "शेवटीं हिंदूस हिंदू मिळून काम जायां करतील." ऐसें म्हणून दुसरे दिवशीं दिलेलखान मिरजाराजियाच्या भेटीस आला. आणि बोलूं लागला कीं, " उगेच काय म्हणून बैसलेत ? गोटाजवळ कोंढाणा व पुरंधर हे दोन किल्ले आहेत. पुरंधरास आपण सुलतानढवा[३४] करितों, आणि गड घेतों. तुम्हीं कोंढाणा गड घेणें. गड घेत चाललां म्हणजे शिवाजी येईल." असें बोलतां, मिरजाराजा बोलला जे, " गड आले तरि बरें. नाहीं तर नामोश[३५] जाईल. याजकरितां गडास न लागावें. मुलूक काबीज करावा. गडास सामान चालों न द्यावें म्हणजे गड आपाप येतील." असें बोलतां, दिलेलखान रागें उठून चालिला. " आपण आतांच जाऊन पुरंधर घेतों. तुम्हीं कोंढाणा घ्याल तरि घेणें." असें म्हणून उठोन, गोटास येऊन, नगारा करून, ढाल फिरंग घेऊन, पुरंधराखालें येऊन,

---

३२. " येविशीं ठाकूरजीची पूजा करून तुळशी काढून हातीं दिधल्या." पाठांतर. कर्पूरगौर=शंकर. ३३. "साहाचार महिने" वगैरे शब्द महाड प्रतींत नाहींत. ३४. सुलतानढवा=साहसाधिरोह, जिवावर उदार होऊन किल्ल्यावर हल्ला करीत चढणें. ३५. नामोश=लौकिक, आब, कीर्ती.

मुकाम करून गडावरि येलगार[३६] केला. पायउतारा होऊन पांच हजार पठाण व दहा हाजार बैले[३७] तोफाची पायउतारा जाहाले. पें ढा री [ ? ] व आडहत्यारी[३८] व खलाशी लोक वीस हजार लहान थोर पायउतारा होऊन लगट करीत चालले.

तेव्हां पुरंधरावरि नामजाद[३९] लोकांचा सरदार राजियाचा मुरार बाजी परभू म्हणोन होता. त्याजबरोबर हजार माणूस होते. याखेरीज किल्याचे एक हजार होते. असे दोन हजार लोक होते. त्यांत निवड करून मुरार बाजी यांनीं सातशें माणूस घेऊन [ते] गडाखालें दिलेलखानावरि आले. दिलेलखान तोलदार, जोरावर पठाण पांच हजार, यांखेरीज बैले वगैरे लोक ऐशी फौज गडास चौतर्फा चढत होती, त्यांत जाऊन सरमिसळ जाहाले. मोठें घोरांदर युद्ध जाहालें. मावळे लोकांनीं व खासा मुरार बाजी यांनीं निदान[४०] करून भांडण केलें. पांचशें पठाण लष्कर ठार जाहाले. तसेच बैहिले[४१] मारिले. खासा मुरार बाजी परभू दिलेलखानाच्या देवडी[४२] पावेतों *साठी माणसांनिशीं मारीत शिरले. दिलेलखान देवडी सोडून माघारा जाहाला. आणि लोकांस सांगून तोफखाना व तिरंदाज बरच्या व आडहत्यारी एक हजार लोक यांजकडून मार करविला. त्यामध्यें *साठी लोक पडिले. मुरार बाजी परभू यांनीं ढाल फिरंगी घेऊन दिलेलखानावरि चालोन आले. महाराजांचे नांवाजलेले लोक ते खर्च जाहाले. आतां काय मुख दाखवावें ! म्हणोन नीट चालोन जावें असें मनांत आणोन खानाशीं गांठ घातली.

---

३६. येलगार=हल्ला. ३७. बहिले, बैले='पादचारी शिपाई' प्रो० सुरेंद्रनाथ सेन. "खासा पायउतारा होऊन...आठ हजार रोहिले." सा० प्रत. तोफाची=तोफखान्याकडील लोक. ३८. आडहत्यारी=तरवार, बंदूक शिवाय करून इतर हत्यारें बाळगणारे. ३९. नामजाद=लौकिकाचे,विख्यात; नेमिलेले. ग्रां० ड० म्हणतो "बाजीराव देशपांडे हा महाडचा देशपांड्या." ४०. निदान करून=निकरावर येऊन. ४१. कांहीं प्रतींत 'रोहिले' व कांहींत 'बैले' असेंही आहे. दुसरा पाठ ठीक दिसतो. याच पृष्ठावरील टीप ३७ पाहा. ४२. "गोटापावेतों" पाठांतर. *साठीलोक=साठ लोकांचें पथक शिवाजीच्या खास पदकांपैकीं दुसरीं 'चाळीस लोक.' 'शंभरलोक' वगैरे पथकें होतीं.

तेव्हां दिलेलखान बोलिला जे, "अरे तूं कौल[४३] घे. मोठा मर्दाना शिपाई तुज नांवाजितों." ऐसें बोलतां मुरार बाजी बोलिला जे, "तुझा कौल म्हणजे काय ! मी शिवाजी राजाचा शिपाई, तुझा कौल घेतों कीं काय ?" म्हणून नीट खानावरि चालिला. खानावर तरवारीचा वार करावा तों खानानें आपले आंगें कमाण घेऊन, तीर मारून, पुरा केला. तो पडला. मग खानानें तोंडांत अंगोळी घातली कीं, "असा शिपाई खुदानें पैदा[४४] केला." ऐसें आश्चर्य केलें. मुरार बाजीबरोबर तीनशें माणूस ठार जाहाले. वरकड चारशें माणूस गडावर गेले. दिलेलखानानें शीरची पगडी उतरली. आणि गडावर चालून घेतलें कीं, "गड घेईन तेव्हां पगडी बांधीन." ऐसा नेम करून चालिला तो दरवाज्याखालें येऊन, ढालेचा कोट करून बसला. किल्याचे लोक मुरारबाजी पडला म्हणोन गणना न करितां शरतीनें भांडूं लागले. "एक मुरार बाजी पडला तरि काय जालें ? आम्ही तैसेच शूर आहों. ऐशी हिंमत धरून भांडतों."

हें वर्तमान राजियासि राजगडीं कळलें कीं, "दिलेलखानानें पुरंधरास लगट केला. मुरार बाजी परभू पडला. तीनशें माणूस रणास आले." हें कळोन मनांत चिंतातूर जाहाले कीं, "गड दिलेलखान जेव्हां घेतो, तेव्हां वरकड किल्ले आपाप जातात. मग आपण भेटल्यानें रूप नाहीं. जोंवर गड आहेत तोंवर भेटोन आपले होतें जे गड देणें ते देऊन सला करावा, हें उचित." म्हणोन रघुनाथभट पंडितराऊ मिरजाराजियाजवळ पाठविले कीं, "आपण तूर्तच भेटीस येतों. दिलेलखानानें गड घेतला, मग भेट जाहाल्यानें ह ल वा री* [?] आहे." असें सांगोन पाठवून भेटीस जावेंसें केलें. पंडितराऊ जाऊन जयसिंगास भेटले. वर्तमान श्रुत केलें. मग त्याणेंही उत्तम म्हणून मागती शफत क्रिया बळकटी केली. आणि पंडितराव राजगडास आले. येतांच खासा राजा हजार माणूस निवडक करून बरोबर

---

४३. कौल घे=(आमच्या) स्वाधीन हो. ४४. खुदानें पैदा केला=परमेश्वरानें उत्पन्न केला, घडला. * हळुवारी तर नव्हे ! हळुवारी=हलकेपणा.

घेतले. श्री शंभूस व भवानीस नमस्कार केला व मातोश्रीस नमस्कार केला. भेटले. शिष्ट, तपस्वी ब्राह्मणांस नमस्कार केला. सर्वांचा आशीर्वाद घेऊन गडाखालीं उतरोन चालले. ते एकाएकीं मिरजाराजियाचे गोटांत गेले. पुढें पंडितराव जाऊन सांगितलें कीं, राजे आले. ही खबर कळतांच जयसिंग देवडीबाहेर पायउतारा खासा आला. राजे पालखींतून उतरून भेटले. उभयतां जाऊन एकासनीं बैसले. आणि राजे मिरजाराजियासि बोलूं लागले कीं, "आपण जैसा रामसिंग तैसेच तुम्हांस, त्याचें रक्षण कराल तैसें आपलें करणें." असें बोलून बैसले. मग जयसिंग बोलला जे, "हीच गोष्ट खरी. आपण रजपूत, तुम्ही व आम्ही एकजाती आहों. अगोदर आपलें शीर जाईल, मग तुम्हांस काय होणें तें होईल." असा भरंवसा बोलून शपत वाहिली. मग राजे बोलले जे, "तुम्हांस जे गड पाहिजेत ते आपण देतों. दिलेलखानास बोलावून आणवणें. पुरंधर तुम्हांस देतों. निशाण तुमचें चढवितों. परंतु मुसलमानास यश देत नाहीं." अशी गोष्ट बोलल्यावर जयसिंग खुशाल जाहाला. आणि बोलिला जे, "दिलेलखान फामिंदा[४५] आहे, बादशाहाचे मेहेरबानीचा आहे. त्यास मुजरा हातीं करून* लागतो. तुम्हींच दिलेलखानाचे भेटीस जावें लागतें. आपण रजपूत आप्तविषयी तुम्हांबरोबरि देतों, ते तुमची भेट करून आणतील, फिकीर न करावी. तुमचे [४६]लँवेस जडभारी तरि आपण पन्नास हजार फौज रजपूत [ सुद्धां ] [४७]खँस्त होतों." ऐकून राजे म्हणों लागले जे, "[ मी ] शिवाजी आहें. दिलेलखानाचा [४८]गुँमान धरितों कीं काय? तुमचे आज्ञेनें जातों. भेटतों." म्हणून निरोप घेऊन मिरजाराजियांनीं सुभानसिंग, आपला मामा, थोर योद्धा मोठा बळाचा शूर, दिलेलखानाचे [४९]सँवाईनें तोलदार, दिलेलखानही त्यास जाणे, असा बराबर दिला. आणि "राजा सांभाळोन घेऊन येणें. तुझे भरंवशावर पाठवितों," असें बोलून पाठविला. सुभानसिंग पन्नास रजपूत आपले

४५. फामिंदा=डौली, गर्विष्ठ. ४६. 'केसास' पाठांतर. ४७. खस्त होतों=मरून जातों. ४८. गुमान=पर्वा, हिशेब. ४९. 'दुप्पट' पाठांतर. *करून=करूं.

जोडींचे समागमें घेऊन चालिला. जेथें दिलेलखान पुरंधरचे दरवाज्याजवळ होता तेथें राजे गेले. पुढें दिलेलखानास खबर पाठविली कीं, "शिवाजी-राजे येऊन मिरजाराजियासि भेटले, तुमचे भेटीस येतात." हें कळोन दिलेलखान मनांत जळला. मनगटें चाविलीं कीं, पुरंधर किल्ल्याचें यश आपणास आलें नाहीं, आपले विद्यमानें बोलणेंही नाहीं. यश रजपुतासि आलें. म्हणून श्रमी होऊन, पुढें सामोरा येऊन, रागें रागें राजियासि जोरानें आंवळोन धरून घडीभर भेटला. दिलेलखान म्हणजे मोठा बळकट. एका हत्तीचें बळ किंवा जास्तीच होईल. आणि हत्ती बराबरि खाणें. दररोज हत्ती खातो तेणेंप्रमाणें वजनें खाणें. शरीर तरि दुसरा हेडंब राक्षसच ! ऐसा थोर. त्याणें रागें भरून एक घटकाभर रागें, जोरानें राजियास आंवळून धरिलें. परंतु सरदार जोरावर, बळकट तैसाच. त्याणें खातरेस आणिलें नाहीं. मग भेटीची मिठी सुटून एकीकडे लोडाजवळ उभयतां बैसले. दुसरे बाजूस लोडाशीं सुभानसिंग बैसले. दिलेलखान कटारी जवळ करून, वर हात ठेऊन बैसला. आणि क्रोधें करून सुभानसिंग यासि पुसिलें[५०] कीं "राजाबरोबरि तुम्ही आलां आहां ?" असें पुसिलें. तेव्हां मनामध्यें हा का रा धरून सुभानसिंग बोलिला जे, "खानजी, तुम्हांकडे राजे आले. आतां उद्यां तुम्हांस जे गड पाहिजेत ते देऊं. तुम्हीं उतरून गोटास येणें. असा मिरजाराजियांचा हुकूम आहे." असें बोलिल्यावरि बहूत कष्टी जाहाला जे, आपला मनोरथ सिद्धीस गेला नाहीं. "तुम्हीं साहेब* लोक आहां. तुमच्या हुकुमानें येऊं. परंतु हा किल्ला उदईक आपणास घेऊन देणें. निशाण चढवून येतों." असें बोलतां सुभानसिंग म्हणूं लागला कीं, "गड आपणाकडे आला, तुम्हीं चलावें." त्यावरून दिलेलखान उतरोन खासा गोटांत आला. चौकी किल्ल्यास ठेविली. राजियासि पानविडे देऊन रवाना केलें. "तुम्हीं

---

५०. "व सुभानसिंग यासि पुसिले कीं केव्हां आलां ? ते म्हणो लागले कीं, 'आतांच आलों. मिरजाराजियासि भेट जाली. तुमचे भेटीस आलों'" म० प्रत. * साहेब=स्वामी, वरिष्ठ.

मिळोन मिरजाराजियाजवळ जाणें, ते वडील आहेत. ते करतील त्यांत आपण आहों." [ असें बोलला. ]

असें बोलतांच राजे व सुभानसिंग मिरजाराजियाकडे आले. वर्तमान सांगितलें. मग जयसिंगांनीं व राजियांनीं एकपंक्ती भोजन केलें. राजियास राहावयास डेरा दिला. रात्रीं उभयतांचें बोलणें जालें. "किल्ले अवघे पादशाहास द्यावे आणि दिल्लीस चलावें." असें बोलतांच राजे म्हणूं लागले जे, "आपल्यापैकीं सत्तावीस गड देतों आणि आपण व आपला पुत्र संभाजी ऐसे पातशाहाचे भेटीस येतों. भेट करून इकडील दक्षणेच्या बादशाही इदलशाही व कुतुबशाही व निजामशाही वरि आपणास नामजौद करणें. तीन पादशाही फत्ते करूं. एक पादशाही निजामशाही त्यांहीं फत्ते केलीच आहे. दोन पादशाही तुम्हांस घेऊन देतों." म्हणून बोलिले. मिरजाराजियांनीं कबूल केलें. आणि पुण्याहून कूच केलें. राजियांनीं संभाजीराजेही आणविले. सत्तावीस किल्ले तांब्रास दिले. निशाणें चढविलीं. वरकड राजगड व कोट मोरोपंत पेशवे व निळोपंत मजमदार व नेताजी पालकर सरनोबत असे मातुश्रीच्या हवालें केले. आणि आपणही दिल्लीस जावें, पादशाहाची भेट घ्यावी असा करार केला. पुढें पादशाहास कळावें म्हणून जयसिंग राजियांनीं आपला वकील रवाना केला. त्याजबराबरि राजाचा जावा, त्यास सोनाजीपंत डबीर याचा मेहुणा रघुनाथपंत कोरडे यांस दिलें. हे उभयतां पुढें दिल्लीस रवाना केले. राजियांनीं अर्जदस्त पादशाहास दिली कीं, "आपण भेटीस येतों." म्हणून पत्र लिहून दिलें.

याउपरि मिरजाराजियाबरोबरि आपली फौज घेऊन राजे विजापुराकडे चालले. मार्ग चालतां मिरजाराजे व शिवाजीराजे एका हवद्यांत बैसले आणि चालिले. कुल वजीर येऊन सलाम करीत. दिलेलखान जोहार न करी. निमित्य कीं, राजे [ व ] ते एके जागां, आणि आपण जोहार कैसा करावा ? ये गोष्टीनें सलाम न करी. पुढें विजापूरासही सला

५१. नामजाद करणें=नेमणें.

केलों[५२]. उपरि उभयतांनीं दिल्लीस जावें, त्यास मिरजा बोलिला जे, "पादशाहा वहूत हुन्नरवंत[५३] आहे, बेइमान आहे. आम्ही तुम्ही बरोबरि गेल्यानें दगा दोघांसि केलियानें कसें करावें? आपण मागाहून येतों. औरंगाबादेंत राहातों. तुम्हीं दिल्लीस जाणें. आपला पुत्र रामसिंग हुजूर आहे. तोही तोलदार, भिडेचा आहे. त्यांस सांगोन पाठवितों. त्याचे हातें भेट घेणें. सरंजाम करून दक्षणेस येणें. तुम्हीं दिल्लीहून निघालां म्हणजे आपण दिल्लीस जाऊं. तोंपर्यंत आपण बाहेर आहों." पादशाहास भेटल्यावर तो तुम्हांशीं बेइमानी न करी म्हणवून तजवीज सांगून रामसिंगास पुढें पत्रें पाठऊन, ठीक करून, राजियांसि रवाना केलें. राजियानीं बरोबरि घेतले कारकून व हुजुरे तपशील :—

निराजी राऊजी शाहाणा १. त्रिंबकजी सोनदेव, सोनाजीपंताचे पुत्र, कलम १. माणको हरी सबनीस १. दत्ताजी त्रिंबक १. हिरोजी फरजंद १. राघोजी मित्रा १. दावलजी गाडगे १.

मावळे लोक १००० एक हजार, लष्कर[५४] ३००० तीन हजार.

येणें प्रमाणें. या-सहवर्तमान राजे राजगडास येऊन, सर्वांच्या भेटी घेऊन, सदहूप्रमाणें बरोबर घेऊन, राजे व पुत्र असे उभयतां मजल दरमजल दिल्लीस चालिले. पादशाहास राजे भेटीस येतात हें कळोन आपले कुल फौजदार व महालमोकासे यांसि ताकीदपत्रें पाठविलीं कीं, "शिवाजी राजे मुलाजमतीस येतात. जे जागां मुकामास राहातील तेथील फौजदारांनीं येऊन भेटावें. दाणापाणी जो लागेल तो द्यावा. शाहाजादे यांचेप्रमाणें आदबें[५५] चालवावी. ऐसे रोखे[५६] पाठविले. त्यावरून राजे मजलीस जात तेथें फौजदार[५७] भेटून दाणापाणी जो खर्च लागेल, तो द्यावा. असे दोन महिन्यांनीं दिल्लीस* पावले.

---

५२. विजापूरकरांचे किल्ले सर करण्यांत शिवाजीनें यावेळीं फार मदत केली, त्याबद्दल औरंगजेबानें त्यास पत्रें लिहून त्याची तारीफ केली. ५३. हुन्नरवंत=युक्तिवंत. ५४. 'स्वार' पाठांतर. ५५. आदब=सन्मान. ५६. रोखे=पत्रें, हुकूम. ५७. 'ठाणेदार' पाठांतर. * दिल्लीस जाण्यास शिवाजी निघाला पण आगरा येथेंच बादशाहा होता तेथें तो गेला व तेथूनच तो पुढें निसटला.

राजे आले ही खबर पादशाहास समजून रामसिंग पुढें भेटीस पाठविले. रामसिंग येऊन भेटले. रघुनाथपंत कोरडे *पहिले हेजीब पाठविले तेही येऊन भेटले. पादशाहाचें सर्व वर्तमान सांगितलें. बाह्यात्कार समाधान खुशाली सांगितली. " मनांत पादशाहाचे काय आहे न कळे. " असें बोलिले. रामसिंग भेट घेऊन पादशाहापाशीं आले. वर्तमान सांगितलें. पादशाहांनीं एक हवेली जागा सचंतर शिवपुरा म्हणून वसवून[५८] [तेथें राजे] राहिले. मुहूर्त पाहून पादशाहाचे भेटीस चालिले. पादशाहांनीं सदर करून पांच हत्यारें आपणाजवळ ठेवून, कंबरबस्ती करून, आंगांत जरीची[५९] कुडती घालून खासा तख्तीं बैसला. तैसेच तख्ताजवळ मोठे मोठे शूर मर्दाने व तख्ताचे आसपास दोन हजार माणूस उभे केले. तैसेच आमखास[६०] यामध्यें कुल वजीर मुस्तेद करून उभे केले. मनांत कीं "शिवाजी सामान्य नाहीं. सैतान आहे. अफजलखान भेटीमध्यें मारिला. तैसाच उडोन[६१] तख्तावरि आला आणि आपणास दगा केला तरि काय करावें?" असें समजून मुस्तेदीनिशीं[६२] बसला. राजियासि भेटीस बोलाविलें. राजे व पुत्र संभाजीराजे व कारकून व हुजुरे अगत्याअगत्य दहाजण[६३] भेटीस रामसिंग घेऊन गेले. पादशाहाची नजर जाहाली. पादशाहा बोलला जे, "आवो, शिवाजी राजे.[६४]" असें बोलतांच राजियांनीं तीन सलाम केले. मनांत भाव धरिला कीं, श्रीशंभुमहादेव एक, दुसरा श्रीभवानी, तिसरा महाराज पितियास, ऐसे तीन सलाम केले. आणि उजवे बाजूस जसवंतसिंग महाराज, नवकोट मारवाडचा राजा, त्याचे शेजारीं खालतें उभें राहावयासाठीं हुकूम [पातशाहानीं] केला. राजे व पुत्र

---

*पहिले=पहिल्यानें. ५८. 'बादशाहांनीं हुकूम केला कीं शिवपुरा आहे तेथें एक हवेली देणें' पाठांतर. ५९. 'जि रे मु डी' पाठांतर. 'जिरेची' असें असतें तर बरें. जिरह=कड्यांचें कवच. ६०. आमखास=दरबारचा दिवाणखाना. ६१. 'उठोन' 'चालोन' पाठांतरें. ६२. 'खबरदारीनिशीं' पाठांतर. ६३. 'खासे खासे पन्नास असामी' पाठांतर. ६४. " शिवाजीराजा आवोजी ", " हा शिवाजी-राजा कीं काय ! " पाठांतरें.

उभे राहिले. रामसिंग यास पुसलें कीं, " आपणावरते शेजारीं कोण ? " असें पुसिलें. त्यास रामसिंग बोलिला जे, "महाराज जसवंतसिंग. " असें ऐकतांच राजा क्रोधयुक्त होऊन बोलिला कीं, "जसवंतसिंगासारखा उमराव! याच्या पाठी माझ्या लष्करांनीं पाहिल्या असतील!! याचे खालें आपण उभें राहावें म्हणजे काय?" असें क्रोधें बोलून, रामसिंगाची कटार मॉजेची[६५] घेऊन महाराजा यास मारितों म्हणवून कटार मागूं लागले. मग रामसिंग " धीर धरणें " म्हणून बोलूं लागले. शब्दाशब्दी होतांच पादशाहास कळलें. पादशाहा म्हणूं लागले कीं, " काय जाहालें ? " रामसिंग बोलिला कीं, " जंगली बाघ हयवान, त्यास गर्मी जाहाला. कांहीं करीणा जाहाला." असें बोलतांच पादशाहाचे मनांत शंका उत्पन्न जाहाली. काय होईल तें न कळे. म्हणून रामसिंगास पादशाहा बोलिले कीं, " राजियास घेऊन डेरियास जाणें. उद्यांसाद्यां सावकाश मुलाखत होईल." असें बोलतांच राजे व राजपुत्र व रामसिंग राजियाचे लोक देखील हवेलीस गेले. राजा बाहेर गेल्यावरि पादशाहा संतोष जाहाला. आणि " मोठा अनर्थ चुकला. शिवाजीची व आमची नजर[६६] जाहाली होती," ऐसें बोलून राहिले.

राजे डेरियास गेलियावरि रामसिंग व आपण बैसोन बोलिले जे, " कोण पादशाहा ! मी शिवाजी, मजला जसवंताखालतें उभें करावें ! करीणा[६७] कांहीं पादशाहास समजत नाहीं," ऐसें बोलिले. रामसिंग बोलिला जे, " तुम्हीं भेटीस येऊं नये. आले तरि रस-रंग राखून निघून जाणें. तुम्ही येथून सुखरूप गेलेत म्हणजे आम्हांस मोठी जोड[६८] जाहाली." असें बोलून रामसिंग आपले हवेलीस गेले.

राजियांनीं आपले कारकून, हुजुरे व रघुनाथपंत कोरडे यांसि बोलावून आणून विचार केला, "पुढें तजवीज काय करावी ?" पादशाहाची मजलस[६९] कळली. तेथून यश पावून निरोप घेऊन कैसें जावें ? पादशाहाजवळ

---

६५. माजेची=कंबरेची. ६६. "शिवाजीची डहूळ नदर झाली होती." म० प्रत. ६७. करीणा=हकिकत; व्यवहार ! ६८. जोड=लाभ. ६९. 'मसलत' पाठांतर.

कांहीं एक कार्य कबूल करून गेलियाविना पादशाहा निरोप देत नाहीं." [मग] रघुनाथपंत कोरडे यांस सांगोन पाठविलें कीं, "तुम्हीं पादशाहास उद्यां जाऊन अर्ज करणें कीं, "स्वामीशीं आमचा दुसरा विचार नाहीं. आपण निखालँस आपले पुत्र घेऊन देखील भेटीस आलों. सेवकाजवळोन चाकरी घ्यावी. दक्षणेस कुल अदलशाही व कुल कुतुबशाही दोनी पातशाही घेऊन हँजरतीस देतों. वरकड सुभे रवाना करतां त्यांची कामगिरी पाहाणें आणि आपली कामगिरी पाहाणें." ऐसें कितीएक गोष्टी बोलून एकांतीं घुसलखानियांत भेटीस बोलाविलें [म्हणजे] भेटी घेऊन कित्येक मजकूर बोलूं, म्हणून अर्ज करणें," म्हणून सांगितलें. त्याजवरून रघुनाथपंत कोरडे दुसरे दिवशीं पादशाहाजवळ जाऊन येणेंप्रमाणें करीणा लिहून पाठविला. पादशाहानें रोखा वाचून चित्तांत विकल्प धरिला. आणि पत्राचे पाठीशीं जाब लिहिला कीं, "सबुरी करणें. तुमच्या मुद्यामाफक करूं." असा जाब लिहिला. त्याणीं येऊन राजियासि सांगितलें कीं, सबुरी करणें. तेव्हां विकल्प आहे, दिलखुलाशानें जाब दिला नाहीं, असा तर्क राजियांनीं केला.

तेच दिवशीं शास्ताखानानें जाफरखान दिवाण, पूर्वील पादशाहाचे वेळेसही त्यास दिवाणगिरी चालत होती, परंतु मुतालिकाचे हातून कारभार होता ऐसे, त्या जाफरखानास सांगून पाठविलें कीं, "शिवाजी मोठा दगेखोर आहे. विद्यावंत असे. आपल्या गोटांत शिरला तेव्हां चाळीस गज जमीन उडाला आणि वाडांत शिरला. असा पादशाहांनीं भेटीस नेऊं नये. नेला तरि चाळीस पन्नास गज जमीन उडोन दगा देईल." असें सांगून पाठविलें. त्याजवरून जाफरखानानें पादशाहास हें वर्तमान जाहीर केलें. पादशाहा मनांत खोंचून त्यानें खरें मानलें. बळकट मनांत विकल्प धरिलें.

---

७०. निखालस=विश्वासपूर्वक, मनांत कपट न धरितां. ७१. हजरत=हुजूर, चरणाशीं. ७२. येथपासून 'प्रतापगड' प्रतीचे पांच बंद (१२१–१२५) गाहाळ झाले आहेत. मधील मजकूर 'सातारा' व 'खटाव' प्रतीवरून घेतला आहे.

( पुढें चालू. )

दुसरे दिवशीं राजे यांस कळलें कीं, जाफरखान दिवाणानें आपला गिल्ला पादशाहाजवळ केला. असें कळोन रघुनाथपंत कोरडे यांस जाफरखानाकडे पाठविलें कीं, 'आपले भेटीस येतों.' म्हणून पाठविलें. त्यानें बहूत वेळ मनांत तजवीज करून 'बरें, येऊं द्या' म्हणोन सांगितलें. त्यावरून राजे जाफरखानाचे भेटीस गेले. सन्मान बहूत केला. कित्येक आपले सरंजामाविशीं सांगितलें, परंतु त्याचे मनांत आलें नाहीं. बाहेर 'बहूत बरें' म्हणून बोलिला. जाफरखानाची बायको ती शास्तखानाची वहीण; तिनें खानास आंतोन सांगून पाठविलें कीं, "शास्तखानाचीं बोटें तुटलीं. अफजलखान मारिला. तसे तुम्हांसही शिवाजी मारील. त्यास लवकर निरोप देणें." मग राजास वस्त्रें देऊन निरोप दिला. "पादशाहास अर्ज करून सरंजाम करवितों," ऐसें बोलिला. मग राजे डेरियास आले. "जाफरखानही दिलखुलाशानें[७३] बोलिला नाहीं. बरें, श्री करील तें खरें," म्हणून बोलून राहिले.

दुसरे दिवशीं पादशाहा यांणीं राजापाशीं ५००० स्वार व पायदळ [ नेमून ] पोलादखान कोतवाल यास हुकूम केला कीं, "तूं राजाच्या डेऱ्याभोंवतीं चौकी देऊन खबरदारीनें राहाणें." त्यावरून कोतवाल येऊन डेरा ठोकून राहिला. मग राजे घाबरे जाले. कष्टी होऊं लागले. संभाजीराजे यांस पोटाशीं धरून बहूत खेद केला. निराजीपंत व दत्ताजीपंत व त्रिंबकपंत यांणीं बहुता प्रकारें समाधान केलें. तेव्हां राजे बोलिले जे, "आतां काय हुन्नर करावा ?" असा विचार करितां रात्र जाली. मग श्रीभवानी स्वप्नांत येऊन साक्षात्कार जाला कीं, "कांहीं चिंता न करणें. येथून तुजला

---

(मागील पृष्ठावरून पुढें चालू.)

'खटाव' प्रत ही थोडे दिवसांपूर्वी आमचेकडे आली. हींत शिवाजीची दिल्लीहून सुटका होईपर्यंत वृत्तांत आहे. ठाणेकर रा० भावे प्रतापगडीं गेले असतां त्यांस हे ५ बद्द उपलब्ध झाले होते. पण, नंतर देवीचा प्रासाद दग्ध झाला त्यांत ते नष्ट झाले ! ७३. दिलखुलासा=साफ मन, निष्कपट मन.

सर्व शत्रूंस भूल घालून, मोहनास्त्र घालून, पुत्रासहवर्तमान घेऊन जातें. चिंता न करणें," म्हणोन अभय जालें. मग जागृत होऊन आप्तविषयी लोकांस सांगितलें आणि समाधान मानिलें.

दुसरे दिवशीं नाना जिन्नस मेवा खरेदी करून आणविला. आणि वेळूचे पेटारे आणवून १० पेटारे मेवा भरिला. एका पेटाऱ्यास दोघे दोघे मजूर लावून, मध्यें लाकूड घालून मेवा वजिरांस पाठविला. चौकींच्या लोकांनीं पुसलें कीं, "पेटारे कोणाचे ? कोठें जातात ?" मजुरांनीं उत्तर दिलें कीं, "राजे यांणीं चौघां वजिरांस मेवा पाठविला आहे." त्यांणीं एक दोन उघडून पाहिले, तों मेवा खरा. मग जाऊं दिले. असा रांबता[७४] रोज लाविला. मग आठ चहूं रोजांनीं आपले स्वार व कित्येक कारकून लोक यांसही 'पळणें,' म्हणून सांगून पाठविलें. मग ते कुल[७५] पळाले.

मग एके दिवशीं राजे व राजपुत्र एकच[७६] पेटाऱ्यांत बसले. पुढें मागें पेटारे करून मध्यें पेटारियांत बसून चालिले. ते वेळीं आपला साज सर्व उतरून, हिरोजी फरजंद यास घालून, आपले पलंगावरि निजविला. हात मात्र त्याचा उघडा बाहेर दिसूं दिला आणि शेला पांघरून निजविला. आणि एक पोरगा रगडावयास ठेविला. जवळील कारकून होते[७७] त्यांस अगोदर दिल्लीपलीकडे* तीन कोसांवर एक गांव होता तेथें ठिकाण करून पुढें रवाना केले होते. आणि आपण उभयतां पेटारियांत बसून निघोन चालिले. चौकीचे लोक होते त्यांनीं एक दोन पुढील पेटारे उघडून पाहोन वरकड पेटारे न उघाडितां जाऊं दिले. शहराबाहेर दोन कोसांवरि जाऊन, पेटारे टाकून, पायउतारा होऊन, कारकून ज्या गांवीं होते त्या गांवास गेले. कारकून बराबरि घेतले. अवघियांनीं रानांत बसून विचार केला कीं, "आतां जरि नीट आपले देशास जातों तरि तिकडे लाग करून फौजा धावतील. तिकडे

---

७४. राबता=परिपाठ. ७५. कुल=सर्व. ७६. "दोन पेटाऱ्यांत दोघे" पाठांतर. ७७. "न होते" येथपासून प्र० गड प्रतीचा १२६ वा बंद सुरू. * आगऱ्यापलीकडे असें समजावें. पुढें पृष्ठ ५१, टीप ७८ पाहावी.

९-९८४२ ८८५१ ४-२९५

जाऊं नये. दिल्लीपलीकडे जावें. वाराणशीकडे जावें." असें करून राजे व संभाजीराजे व निराजी राऊजी व दत्ताजी त्रिंबक व राघो मित्रा मराठी ऐसे निघोन चालिले. वरकडांस मनास मानेल तिकडे जाणें, म्हणून सांगितलें. आपण व राजपुत्र व इतर लोक कारकून ऐसे वाराणशीकडे आंगास राखा लावून, फकिराचें सोंग घेऊन मथुरेकड गेले.

मागें दिल्लीमध्यें हिरोजी फरजंद पलंगावरि निजला होता. तो चार प्रहर रात्र व तीन प्रहर दिवस तैसाच निजला. चौकीचे पोलादखानाचे लोक कोठडींत येऊन पाहातात [ तों ] राजे शेला पांघरून निजले. पोर पाय रगडीत होता. पोरास लोक पुसतात कीं, "राजे आज फार वेळ निजले?" पोर म्हणतो कीं, "शीर दुखतें." ऐसें पाहोन लोक जातात. तैसाच तीन प्रहर दिवस हिरोजी निजला होता. तों प्रहर दिवस असतां हिरोजी उठोन, आपलीं पांघुरणें चोळणा, मुंडासें घालून, पोर बरोबरि घेऊन, बाहेर आला. चौकीदारांनीं पुसिलें त्यांस हिरोजीनें सांगितलें कीं, "शीर दुखतें, कोणी कोठडींत जाऊं लागेल त्यास मना करणें. आपण औषध घेऊन येतों," म्हणून चौकीदारांस सांगून दोघे बाहेर गेले. रामसिंगाचे गोटास जाऊन त्यास एकांतीं वर्तमान सांगोन, आपण तेथून निघोन देशाचा मार्ग धरिला.

मग रामसिंग पादशाहाच्या दर्शनास गेला. पादशाहास अर्ज केला कीं, "शिवाजी आपले मार्फतीनें आला होता. त्यास पादशाहानें चौकी आलाहिदा दिली. आपणाकडे कांहीं ईलाखा नाहीं." पादशाहा बोलिले कीं,

---

७८. शिवाजी दिल्लीस न जातां आगरा येथें गेला होता, तेथेंच औरंगजेबाचा मुक्काम होता, असा पुरावा अलीकडे प्रसिद्ध झाला आहे. आगरा येथून मथुरेस जाणें शिवाजीस अनुकूल होतें; दिल्लीहून मथुरेकडे गेला असता तर तो पाठलाग करणारांस सांपडण्याचा संभव जास्त होता. 'दिल्लीस गेला' हा मराठी बखरकारांचा व ग्रांट डफ साहेबाचाही गैरसमज झाला असें म्हणावें लागतें. 'आतां जरि नीट आपले देशास जातों' वगैरे वाक्येंही चिंतनीय आहेत. ७९. "दोन प्रहरां उपरांत" म० प्रत. ८०. "सौदा" पाठांतर. ८१. इलाखा=संबंध.

" तुम्हांसि त्याचा इलाखा नाहीं. पादशाही बंदा[८२] त्यास पादशाहा सर्फराजी[८३] करतील. तुम्ही त्याचे दरम्यान नाहीं.[८४]" असें बोलल्यावर रामसिंगानीं तसलीमें[८५] करून डेरियास आले.

नऊ तास दिवस आला. नववे तासा चौकीचे लोक म्हणत होते कीं, " आज माणसाचा राबता नाहीं. राजा श्रमी[८६] जाहाला आहे म्हणून चाकर सांगतात. त्याजवर कोणी जात येत नाहीं, काय वर्तमान ? " म्हणून कोठडींत पाहावयासि गेले तों पलंगावरि कोणी नाहीं. राजा पळाला ऐसें जाहालें. हें देखोन पोलादखानानें पादशाहाजवळ वर्तमान सांगितलें कीं, " राजा कोठडींत होता. वरचेवर जाऊन पाहात असतां एकाएंकीं गैइब[८७] जाहाला. पळाला किंवा जमिनीमध्यें घुसला कीं अस्मानामध्यें गेला, हें न कळे. आम्ही जवळच आहों. देखत देखत नाहींसा जाला. काय हुन्नर जाहाला नकळे." ऐसें जाऊन सांगतांच पादशाहास आश्चर्य वाटून बहूत तजविजींत[८८] पडला. आणि कुल फौजांत ताकीद करून चौतर्फा अष्ट दिशेस दोन लाख साठ हजार स्वार शोधावयांस रवाना केले. त्यास सांगितलें कीं, " शिवाजी हुन्नरवंत आहे. एकादा वेष धरून जातं असेल. तरि तुम्ही जंगम, जोगी, संन्यासी, तापसी, बैरागी, नानकपंथी, गोरखपंथी, फकीर, ब्राह्मण, कंगाल, ब्रह्मचारी, परमहंसी, वेडीं नानापरींचीं सोंगें शोध करून, राजा ओळखून, कैद करून आणणें. अशी इशारति सांगोन रवाना केले. फौजा चोहोंकडे स्वार जाहाल्या. आणि पादशाहांनीं मनांत शंका धरिली कीं, "राजा शहरांत कोठें दडून राहिला असेल. आणि रात्रीस आपणांस दगा करील." म्हणून तजवीज करून, बहूत सावध चौकी पहारा ठेवून जागेच पलंगावर राहून बैसले. लोक कंबरबस्ती करून रात्रंदिवस जवळ ठेविले. ये जातीनें राहूं लागले.

---

८२. बंदा=(गुलाम) नौकर. ८३. सर्फराजी=पोषाख, सन्मान. ८४. तुम्ही त्याचे दरम्यान नाहीं=तुम्हांकडे त्याचें कांहीं नाहीं. ८५. तसलीम=सलाम, मुजरा. ८६. 'जहमत', 'काहला' पाठांतरें. ८७. गइब, गैब=गुप्त, नाहींसा. ८८. तजवीज=विचार, चिंता.

र वाचनालय, सातारा.



पुढें राजे व राजपुत्र मजल दरमजल चालोन मथुरेस गेले. मथुरेमध्यें ओळखीचे माणूस शोधितां कृष्णाजीपंत व काशीराऊ व विसाजीपंत हे त्रिवर्ग बंधू ब्राह्मण, मोरोपंत पेशवे यांचे मेहुणे, त्यांस निराजीपंत ओळखीत होते. त्यांणीं जाऊन, त्यांची भेट घेऊन, वर्तमान सांगितलें. त्यांणीं धैर्य धरून कबूल केलें. त्याजवर त्यांचे घरीं संभाजी राजे पुत्र ठेविले कीं, "आपण देशास आपल्या राज्यांत जाऊन पावलों म्हणून तुम्हांस पत्र व जासूद पाठवितों. तुम्हीं राजपुत्रास घेऊन देशास सर्व बंधू आपल्या कुटुंबानिशीं येणें. तुमचें सर्व प्रकारें चालवूं. ऊर्जित करून बक्षीस देऊं." असें सांगोन राजपुत्रास ठेविलें, आणि त्यांचा एक बंधू कृष्णाजीपंत समागमें घेऊन वाराणशीस गेले. "गया-प्रयागीं यात्रा तुमचे ओळखीनें तुम्हीं आपल्यास करून देणें." म्हणून सांगून, त्यास बरोबर घेऊन, वाराणशीस आले. तेथें गुप्तरूपें स्नान करून, श्रीविश्वेश्वर-दर्शन करून प्रयाग-स्नान केले व गयावर्जन केलें. तेथें कर्जही उदंड घेऊन धर्मही केला. पुढें देशास आपले राज्यांत यावें असें केलें. नीट वाटे यावें तरि पादशाहाच्या फौजा गेल्या त्या मार्गें जातां* नये, म्हणून विचार करून गोंडवणांतून भागानगर, विजापुरावरून राजगडास आले. मार्गीं कित्येक जागां उदंड शोध पडला होता. अपाय होतां दगाच‡ व्हावा असें जालें होतें. परंतु श्रीभवानीनें संरक्षून स्वास्तिक्षेम आणिलें. निराजीपंत व दत्ताजीपंत व राघोजी मराठा असे चौघे आले. राजगडास आलियावर थोर धर्म, मोठा महोच्छाव केला. साखरा वांटल्या. तोफांचे आवाज केले. मातुश्रीनें व कारकुनांनीं व लष्कर गड, कोट, हशम, सर्वांनीं संतोष करून खुशाली केली.

पुढें. सत्तावीस गड मोंगलांस दिले [होतें] ते मागती घ्यावे ही तजवीज केली. मोरोपंत पेशवे व निळोपंत मजमदार व अंणाजीपंत सुरनीस

८९. 'प्रयाण' असें मुळांत आहे पण तो हस्तदोष असावा. *मागें पृष्ठ ५१, टीप ७८ पाहावी. ‡ "दगा काशी येथें व जगन्नाथपुरीस जातांना होण्याचा समय प्राप्त झाला होता." जदुनाथ सरकार. ९०. मागें पृष्ठ ४४, कलम दुसरें पाहा.

यांसि सांगितलें कीं, "तुम्हीं राजकारण, यत्न करून किल्ले घ्यावे." आपण राजियांनीं मावळे लोकांस सांगितलें कीं, "गड घेणें."

त्याजवरून तानाजी मालसुरा म्हणून हंजारी मावळियांचा होता. त्यानें कबूल केलें कीं, "कोंडाणा गड आपण घेतों," असें कबूल करून वस्त्रें, विडे घेऊन गडाचे यत्नास ५०० माणूस घेऊन गडाखालीं गेला. आणि दोघे मावळे बरे, मर्दानें निवडून रात्रीं गडाच्या कड्यांवरून चढविले. जैसे वानर चालून जातात, त्याचप्रमाणें कड्यावर चालून गेले आणि कडा चढून, गडावर जाऊन, तेथून माळ लावून वरकड लोक देखील[९१] तानाजी मालसुरा चढून गडावरि तीनशें माणूस गेले. गडावरि उदेभान रजपूत होता. त्यास कळलें कीं, गनिमाचे लोक आले. ही खबर कळून कुल रजपूत कंबरबस्ता होऊन, हातीं तोडा बार घेऊन, हिलाल चंद्रजोती लावून बाराशें माणूस तोफांची[९२] व तिरंदाज, बरचीवाले, पटाईत, सुऱ्या, आडहत्यारी ढाला चढवून चालोन आले. तेव्हां मावळे लोकांनीं 'श्रीमहादेव!' असें स्मरण करून नीट फौजेवर रजपुतांचे चालून घेतलें. मोठें युद्ध एक प्रहर जालें. पांचशें रजपूत ठार जाले. चाळीस पन्नास मावळे ठार जाले. उदेभान किल्लेदार खासा त्याशीं व तानाजी मालसुरा सुभेदार याशीं गांठ पडली. दोघे मोठे योद्धे, महाशूर, एक एकावर पडले. वार करीत चालले. तानाजीचे डावे हातची ढाल तुटली. दुसरी ढाल समयास आली नाहीं. मग तानाजीनें आपले डावे हाताची ढाल करून, त्याजवरि वोढ[९३] घेऊन, दोघे महारागास पेटले. मोठें युद्ध केलें. एकाचे हातें एक तुकडे होऊन फिरंगीच्या वारें पडले. दोघे ठार जाले. मग सूर्याजी मालसुरा, तानाजीचा भाऊ, यानें हिंमत धरून, कुल लोक सांवरून, उरले रजपूत मारिले. कित्येक रजपूत कडे उडोन पळोन मेले. असें बाराशें माणूस मारिलें. किल्ला काबीज केला. आणि गडावर पागेचे खण होते त्यांस आग लाविली. त्यांचा उजेड राजियांनीं राजगडा-

९१. देखील तानाजी मालुसरा=तानाजीसुद्धां, सह. ९२. तोफाची=तोफवाले, गोलंदाज. ९३. वोढ घेऊन=त्याजवर शत्रूचा मारा घेऊन.

हून पाहिला आणि बोलले कीं, "गड घेतला. फत्ते जाली!" असें जाहालें. तों जासूद दुसरे दिवशीं वर्तमान घेऊन आला कीं, "तानाजी मालसुरा यांनीं मोठें युद्ध केलें. उदेभान किल्लेदार यास मारिलें आणि तानाजी मालसुराही पडला." असें सांगितलें. गड फत्ते केला, असें सांगतांच राजे म्हणूं लागले कीं, "एक गड घेतला, परंतु एक गड गेला!" असे तानाजी-साठीं बहूत कष्टी जाहाले. पुढें गडावरि ठाणें घातलें. सूर्याजी मालसुरा भाऊ नांवाजून त्याचा* सुभा त्यास सांगितला. धारकरी लोकांस बक्षिसें सोन्याचीं कडीं दिलीं. द्रव्य अपार दिलें. वस्त्रें जरी कुल लोकांस दिलीं. ये जातीनें प्रथम कोंडाणा घेतला.

पुढें मोरोपंत पेशवे यांणीं व निळोपंतीं व अंणाजीपंतीं व मावळे यांणीं सव्वीस गड ऐसेच ख्यात करून चौ महिन्यांनीं घेतले. सल्लयानें गड दिधले होते ते मागुती घेऊन आपलें राज्य करूं लागले.

राजगडास वाराणशी होऊन सुखरूप पावलियावरि मथुरेस माणसें व पत्रें पाठविलीं. त्याजवरून कृष्णाजीपंत व काशीराऊ व विसाजीपंत या त्रिवर्गांनीं आपले कुटुंबासहित संभाजीराजियास जानवें धोत्रें नेसवून, आपला भाचा म्हणवून राजगडास आले आणि राजियासि भेटले. मग राजे पुत्रास भेटले. आनंद थोर जाहाला. मोठा दानधर्म केला. आणि कृष्णाजीपंत त्रिवर्ग बंधूंस 'विश्वासराव' म्हणवून नांव किताब दिलें. लक्ष होन बक्षीस दिले. तिघां बंधूंस दहा हजार होन तैनात केली. मातबर लोकांत असामी घातली. मोकाशे महाल दिधले. नांवाजिलें. तसेच निराजीपंत हे बराबरि बहूत श्रमसाहस करून आले व दत्ताजीपंत बरोबरि होते व राघो मित्राही बरोबरि होता. त्यास निराजीपंत नीतिन्याय सर्व जाणते, चतुर, चौकस, निजामशाई ब्राह्मण, त्यांस न्यायाधिशी सरकारांतून सांगितली. जितकी राज्यांतील न्याय-मनसुबी तितकी त्यानें करावी. त्यांचे पुत्र प्रल्हादपंत

---

* त्याचा=तानाजीचा ९४. तिघां भावांस 'मथुरे' असें उपनांवही पडलें, कारण ते 'मउरे'हून आले होते.

धाकटे बारा चौदा वर्षांचे होते. शाहाणा, बुद्धीचा देखोन त्यास लष्करची सबनिशीची मुतालकी सांगोन लष्करासमागमें सरनौबताजवळ ठेविला. प्रल्हादपंत मोठे माणूस होतील, थोर भार घेतील, असें राजे बोलले. दत्ताजीपंतास हुद्दा काय सांगावा म्हणून तजवीज केली. तों गंगाजीपंत वाकनीस मृत्यू पावला. त्याची वाकनिसी दत्ताजीपंतास सांगितली. सरकारकुनांमध्यें गणना केली. रावो भित्रा यांसि हुजूर लोकांचा हवाला सांगितला. समागमें जे जे लोकीं श्रमसाहस केला त्यांस नांवाजिलें.

पुढें राजियांनीं आपले पालखीबरोबरि चाखोट माणूस पाहून निवडक असामी ठेविले. चहूं पादशाहांचे आपण दावेदार, एखादे वेळेस प्रसंग पडतो, तेव्हां जवळ आहेत ते कार्यास येतील. असें जाणून मावळे लोकांत पाहाणी परीक्षा करून, निवडक माणूस पाहून, पतकें केलीं. त्यांचीं [नांवें] नांवनिशीवार.

| | |
|---|---|
| १ शंभरलोक म्हणून नांव ठेविलें. | १ तीसलोक म्हणून नांव ठेविलें. |
| १ साठलोक* म्हणून नांव ठेविलें. | १ वीसलोक म्हणून नांव ठेविलें |
| १ चाळीसलोक म्हणून नांव ठेविलें. | कलम १ |

येणेंप्रमाणें पतकापतकांचीं नांवें ठेविलीं. मावळ्यामावळ्यांमध्यें लोक उत्तम निवडला. निवडक भरती करून चार पतकें मिळून दोन हजार माणूस ठेविले. त्यांत कांहीं बंदुखी, कांहीं विटेकरी, वरकड आडहत्यारी, फिरंग [ वाले ] असे माणूस सजले. तितके माणसांस साज करून दिले. डोईस मंदील, आंगास सखलादी ‡फतू, दोहों हातीं दोन सोन्याचीं कडीं, कोणास रुप्याचीं कडीं, तरवारांस अँबनाळ तैनाळ सोनेरुप्याचे, बंदुकीस

---

* ह्या मावळ्यांच्या निरनिराळ्या टोळ्या राजरक्षणासाठीं 'बॉडी गार्ड' सारख्या होत्या. मागें पृष्ठ ४०, टीप *पाहा. तेथें 'साठी लोक' मुरार बाजीच्या हल्ल्यांत पतन पावले. ते शिवाजीनें त्याच्या मदतीस मुद्दाम पाठविले होते असें दिसतें.
‡ फतू=पान्थकंचुक, प्रवाशाचा डगला. ९५. अबनाळ, तैनाळ (तहनाळ)=म्यानाच्या वरील बाजूचें अडकावण व खालच्या बाजूचें अडकावण.

नगर वाचनालय, सातारा.



कट‡ रुप्याचे व विटियांसि कट तैसेच, कानास जोडी कुडक्यांची, येणेंप्रमाणें अवघे लोकांस साज सरकार-निसबतीनें देऊन लोक सजाविले. अवघ्यांचे एकच साज. मर्दानी म्हणावे तरि एकापेक्षां एक अधीक. अशी परीक्षा करून हमेशा २००० मावळे लोक पालखीबरोबर जवळ असावे. तसेच त्यांस तैनाती सरदार हजारी हशमांत केले. त्याप्रमाणें जुमलेदार प्रमाण केले. आणि दोन अडीच हजार माणूस हशम केला. र[९६]हस्तां असावें.चालते वेळेस पालखीबरोबरि चौतर्फा चालत असावें. ये जातीनें लोक ठेविले.

त्यावरि पनाळा किल्ला अदलशाईचा तेथें भेद करून गड घेतला. राजे गडावरि राहिले. मग विजापुराहून शिद्दी जोर वजीर, वीस हजार स्वार, [ याणें ] राजियासि वेढा घातला. गड नवाच घेतला होता. सामान करून मजबुती करावयासि अवकाश जाहाला नाहीं. परंतु गड बरा भांडविला. नेताजी पालकर सरनोबत राजियाचा त्यास पत्रें जासूद पाठविले कीं, "तुम्हीं लष्कर घेऊन उपराळ्यास येणें आणि शिद्दी जोर यास मारून चालवणें." म्हणून पत्रें पाठविलीं. त्यास लष्कर दूर लांबलें. समयास यावयासि फावलें नाहीं, आणि गडावर सामान नाहीं. मग राजियांनीं विचार केला आणि गड शिद्दी जोरास दिला. आपण उतरोन आले. गड शिद्दी जोरांनीं घेऊन आपलें ठाणें बैसविलें.

मग राजियांनीं नेताजी पालकर यास बोलावून आणिला, आणि "समयास कैसा पावला नाहींस?" म्हणून शब्द लावून, सरनोबती दूर करून, राजगडचा सरनौबत कडतोजी गुजर म्हणून होता, त्याचें नांव दूर करून, प्रतापराव नांव ठेविलें, आणि सरनोबती दिधली. प्रतापरावानीं सेनापती

‡ कट=तिरव्याची नळी व ती जींत बसविली असते ती लांकडी बैठक यांस जागोजाग बंद घेतात ते 'कट.' ९६. रहस्तां ? रस्त्यावर; मार्गी ? ९७. शिद्दी जोहराचा पन्हाळ्यावर हल्ला, शिवाजीचें पलायन, रुस्तूम जमान वगैरेंचा पराभव, हें सर्व मोंगलांशीं भांडण करण्याच्या पूर्वी म्हणजे १६६२ ( स० इ० ) सालाच्या पूर्वी झालें. मागें पृष्ठ २८, टीप ५६ पाहा.

करीत असतां शाहाण्णव कुळींचे मराठे चारी पादशाहींत जे होते व मुलखांत जे जे होते ते कुल मिळविले. पागेस घोडीं खरेदी केलीं. पागा सजीत चालिले व शिलेदार मिळवीत चालिले. असा जमाव पोक्त केला. चहूं पादशाईत दावा लाविला.

राजे दिल्लीहून पळोन आपल्या देशास पितापुत्र सुखरूप आले. येऊन चहूं महिन्यांत सत्तावीस गड घेतले. मोठी ख्यात केली. हें औरंगजेबास कळोन मनांत चिंतातूर जाला. तेव्हां शाहाऑलम, वडील पुत्र, यास पादशाहांनीं कित्येक विचार राजकारण सांगून त्यासि फौजेनिशीं रवाना केलें शाहाजादियास सांगितलें कीं, "जोरावारीनें शिवाजी हातास लागत नाहीं. तुम्हीं जाऊन औरंगाबादेस राहाणें आणि सला मामला राजियासि करून त्याचें सख्य करणें. आणि भेटी न ये तरि मुलाज माफ करणें. आणि दौलत त्याचे नांवें अगर मुलाचे नांवें देऊन त्याची फौज चाकरीस आपणाजवळ आणणें. त्यास मुलूकमोकासा, पैकाटका, ठाणीं जें पाहिजे तें देऊन शिवाजी आपला चाकर जालासें करणें. येवढें यश तुम्हीं घेणें. म्हणजे सर्व यश आलें. असें करणें." म्हणून बुद्धिवाद सांगून शाहास फौजेनिशीं रवाना केलें. तो साठ सत्तर हजार स्वारांनिशीं निघाला. तो मजल दरमजल औरंगाबादेस येऊन राहिला. आणि राजियाकडे पत्रें, जासूद, हलकारे, हेजीब, पाठविले. ते राजगडास दाखल जाहाले. शाहाजादियाचीं पत्रें दिलीं. तीं वाचून पाहिलीं. तेथें लिहिलें होतें जे, "सला करून तुम्हीं आम्हीं एक व्हावें." असें लिहून पाठविलें. त्यावरि राजे बहूत संतुष्ट होऊन रघुनाथपंत कोरडे यांस औरंगाबादेस पाठविलें. कित्येक जडजवाहीर वस्त्रेंही शाहास पाठविलीं. रघुनाथपंतीं जाऊन भेट घेतली. शाहानें बहूत सन्मान केला. एकांतीं कित्येक गोष्टी बोलिला कीं, "राजे व आपण भाऊ, तुम्ही व आम्ही एक विचारें राहून तुम्हीं भेटीसही येणें, तुमचे पुत्राचे नांवें दौलत देतों. एक सरदार

---

९८. दावा लाविला=आपला हक्क सुरू केला, अंमल बसविला. ९९. महंमद मुआज्ञम.

फौज चाकरीस देणें व एक ब्राह्मण मातबर देणें. मोकासा देऊन चालवूं. तुम्हीं पातशाही रुजवातीनें असणें." संभाजी राजाचे नांवें हप्तहजारी दौलत द्यावी, पंधरा लक्ष होनांचा मुलूख वऱ्हाड व खानदेश द्यावा, असें केलें. उत्तम भूषणें वस्त्रें देऊन रवाना केलें.

ते परतून राजाच्या दर्शनास आले. भेट जाली. शाहाजादियाचे अलंकार, वस्त्रें, पत्रें दिलीं. दौलतीच्या गोष्टी सांगितल्या. सर्व भावार्थ कळलियावरि राजियांनीं विचार केला कीं, "आपणास एक विजापुरचे पातशाहीशीं दावा, भागानगरकरांशीं दावा व मोंगलाशीं दावा; असे तीन दावे सोसवत नाहींत. आपलें राज्य नवें, त्याहीमध्यें दोन तीन चपेटे होऊन हलाखी जाली आहे. त्यास एक शत्रू तरी मित्र करावा आणि दोन वर्षें बळ धरून सांवरावें. मग पुढें जें कर्तव्य तें करावें." असा विचार करून, मोंगलाशीं सला करावा हा विचार करून, फौज प्रतापराऊ सरनोबत याबराबरि पांच हजार स्वार देऊन, समागमें निराजीपंत सरकारकून दिधले. व मोरोपंत पेशवे व मजमदार व सुरनीस यांचे मुतालीक दिले. प्रल्हादपंत, निराजीपंताचे पुत्र, यांस लष्करची सबनिशी दिधली. मुलूख मोकासा देतील त्यास सुभेदार रांउजी सोमनाथ कारकून करून दिधले. ऐसे रवाना केले. मोंगलाशीं सला केला. संभाजी राजे यांस हप्तहजारी कबूल करून निराजीपंत व प्रतापराव औरंगाबादेस गेले.

मग शाहानें बहूत सन्मानें भेट घेतली. सचंतर जागा दाखवून पुरा वसविला. हत्ती, घोडे, जवाहीर, वस्त्रें सर्वांस दिधलीं. वऱ्हाड देश जागा जाहागीर पंधरा लक्षांचा होनांचा दिधला. त्या मुलखांत राउजी सोमनाथ सरसुभेदार ठेविले. हुजूर वांटणीही दिली. टक्कापैका लोकांस बहूत पावला. खुशाल राहिले.

---

१. चपेटा=ठोकर. २. औरंगाबादेस या काळच्या बहुतेक राजांच्या नांवाचे पुरे आहेत; उदाहरणार्थ 'जयसिंग पुरा', 'जसवंतसिंग पुरा', इ० या पुऱ्यांमध्यें त्या त्या राजांचे कारभारी अद्यापही आहेत.

मग शाहाजादियानें दिल्लीस पादशाहास खबर लिहून पाठविली. त्यावरि पादशाहास कळतांच बहूत खुशाल जाला. आपला देश सुखरूप राहिला हा संतोष पादशाहास जाहाला. असे दोन वर्षे फौज [सुद्धां] औरंगाबादेस होते. आणि इकडे राजास फुरसत जाहाली. टकापैका मुलखांत मेळविला. कित्येक अदलशाही गड, कोट, देश काबीज केला. शाहाचा व राजियाचा घरोबा बहूत चालिला. परस्परें वस्ताभावा धाडूं लागले. याकरितां दिल्लीस औरंगजेबास शंका उत्पन्न जाली कीं, "शाहाजादे व शिवाजी एक जाहाले. एखादे वक्तीं फितवा होऊन आपणास दगा करतील." अशी कल्पना केली कीं, "आतां या उभयतांत कज्या वाढवावा." म्हणून शाहास लिहिलें कीं, "शिवाजी हरामी आहे. त्याचा सरदार प्रतापराव व निराजीपंत हे दोघे फौजेनिशीं आहेत. याकरितां त्यांस पातेजों[3] नये. एकादे वक्तीं दौलतावादेस भेद करतील. तरि तुम्हीं त्या दोघांस कैद करणें. त्यांचीं घोडीं अवघीं तबेल्यास लावणें. येविषयीं रयात[4] न करणें," म्हणून लिहिलें. हें वर्तमान शाहाचा वकील पादशाहाजवळ होता, त्यानीं टाकोटाक इशारतीनें पुढें शाहास पाठविलें कीं, "येथें मजकूर असा जाहाला असे." तुम्हीं हुशार राहाणें.

असें वर्तमान पादशाहाजादे यांनीं निराजीपंतास एकांतीं बोलावून हें वर्तमान सांगितलें, आणि वस्त्रं अलंकार देऊन गुप्तरूपें निरोप दिधला कीं, "तुम्हीं उद्यां रात्रीचे कुल फौजेनिशीं उठून पळून राजियाकडे जाणें. तुमची बिशाद राहिली तर पावेल. पायदळ लोक घरोघरीं ठेवणें. मागून वस्तभाव सावकाश नेणें. दोचौ रोजांत पादशाहाचे कागद येतील. मग तुम्हांस कैद करावें लागेल. याकरितां अगोदर निघून जाणें." असें सांगितलें. त्याजवरून निराजीपंत येऊन प्रतापराव यास व अवघे लोकांस सांगून, दुसरे दिवशीं तयारी करून, रात्रीस फौजेनिशीं निघोन गेले. तेच मजल दरमजल राजियाजवळ आले. भेटी जाहाली. कित्येक खजीना व चित्रविचित्र वस्त्रें भूषणें घेऊन आले. राजे खुशाल जाहाले, आणि बोलिले कीं, "दोन वर्षे लष्करचें

३. पातेजणें=विश्वासणें. ४. रयात=क्षमा, कसूर.

पोट भरलें. आणि शाहाजादा मित्र जोडला. ही बरी गोष्ट जाहाली. आतां मोंगलाई मुलूख मारून खावयास वाव जाहाला." असें बोलिले. मग औरंगाबादेसां† राजियाची फौज निघोन गेली.

यावरि आठा दिवशीं पादशाहाचीं पत्रें हुजूरचे लेख आले. वर्तमान कळलें. मग शाहा बोलिला कीं, "मराठे हरामजादे. आठ दिवस अगोदर पळाले. हजीर असते तरि कैद करतों." असें बोलिले. आणि दिल्लीस पादशाहास जाब लिहिला कीं, "हुकुमाप्रमाणें वर्तणूक करावी, परंतु मराठे आठ दिवस अगोदर पळाले, कैद करावयास विलंब[५] न्हवता." म्हणून लिहून पाठविलें. त्याजवरून पादशाहास कळोन थक्क जाहाला. "मराठे हरीफ[६] बहूत आहेत," असें बोलिले. ये जातींचें वर्तमान जालें.

प्रतापरावाची व राजियाची भेट जाहाली. पागा सजली. गनिमाची फौज आपले राज्यावर चालून आली त्यास मारून चालवून मोंगलदेश मारून धुंध उठविली.

मग रांगणा किल्ला राजियाचा होता, त्यास विजापुराहून रुस्तूम जमा वजीर सात आठ हजार लष्कर घेऊन गडास वेढा घातला. ते वक्तीं गडकरी यांनीं थोर भांडण केलें, व राजियांनीं लष्कर पाठवून उपराळा[७] करून रुस्तूम जमा मारून चालविला आणि गड रक्षिला. रुस्तूम जमा नामोहम जाहाल्यावर अबदुल करीम *व बेलोलखान वजीर विजापुराहून बारा हजार जमाव स्वार घेऊन रांगणियास वेढा घातला. गडकरी यांणीं बहूत मारामारी केली व राजियांनींही लष्कर पाठवून बाहेरून उपराळा करून मारामारी केली. बेलोलखानाचा थोर वाखा[८] केला. आणि पाऊस पडला, झड लागली. पावसाळियांत कित्येक मेले. हत्ती, घोडे, उंटें मेलीं. लष्कर सडलें. अशी अवस्था जाहाली. बेलोलखान जीव वांचवून पळोन गेला. गड सुखरूप राहिला.

---

† 'औरंगाबादेहून' तर नव्हे. ५. विलंब=अवकाश. ६. हरीफ=लबाड, धूर्त. ७. उपराळा=मदत, कुमक. *येथें, 'व,' नको होता, कारण हीं दोन्हीं एकाच इसमाचीं नांवें होत. ८. वाखा=हेंगणगत.

पुढें जितकीं शहरें मोंगलाईत होतीं ते जागां चार पांच माणसें वेषधारी करून पाळतीस ठेविलीं. पाळती घेऊन दोघे खबर सांगावयास यावे. दोघांनीं तेथें हुशार राहावें. मग लष्कर पाठवून हवेलिया, शहरें मारावीं. ही तजवीज केली.

तों इतक्यांत सुरतेहून पाळती बहिरेंजी जासूद आला कीं, "सुरत मारिल्यानें अगणित द्रव्य सांपडेल." असें सांगितलें. त्याजवरून राजियांनीं विचार केला, "लष्कर चाकरी-नफरी, काम मनाजोगें होणार नाहीं. याजकरितां, जावें तरि आपण खासा लष्कर घेऊन जावें." असा विचार केला. आणि मकाजी आनंदराव म्हणजे महाराज शाहाजी यांचा फरजंद[10] पाळलेला व वेंकाजी दत्तो ब्राह्मण मोठे लष्करी नामोशाचे सरदार, हे महाराजांकडून सेवा सोडून राजियाकडे आले होते; त्यांस राजियांनीं नांवाजून पागेच्या पंचहजाऱ्या सांगितल्या. आणि प्रतापराव सरनौबत व वेंकाजी दत्तो व [ मकाजी ] आनंदराव व वरकड सरदार दहा हजार पागा व दहा हजार शिलेदार असे वीस हजार जमाव लष्कर, तसेच सात पांच हजार मावळे लोक निवडक व सरकारकून मोरोपंत पेशवे व निळोपंत व अंणाजीपंत व दत्ताजीपंत व बाळ परभू चिटणीस असे बरोबर घेतले. कोळवणां[11]तून नीट सुरतेस पांच गांव,*सात गांव फक्त मजल करून एकाएकीं सुरतेस पावले. सुरतेचे लोक गैरहुशार होते. चढे घोड्यानिशीं सुरतेच्या दरवाज्याजवळ पेठेंत लष्कर शिरलें. मोंगलाचीही फौज पुढें आली. मोठी मारामारी जाहाली. तांब्राकडील लोक बहूत मारिले. आणि सावकारांचे वाडे काबीज करून सोनें, रुपें, मोतीं, पोवळें, माणीक, हिरे, पाच, गोमेदराज, वैडूर्य, असे नवरत्नें; नाणें, मोहोरा, पुतळ्या, इभ्राम्या, सतराम्या, असर्फ्या[12], होन, नाणें नाना जातीचें इतक्या जिनसांच्या धोंकटिया[13] भरल्या.

---

९. बहिरजीचें आडनांव 'जाधव' होतें. १०. फरजंद=मलगा, लेंकवळा. ११. कोळवणांतून म्हणजे भीमाशंकर, जव्हार, रामनगर इ० कोळ्यांच्या मुलखांतून. *गांव=चार कोस. १२. इभ्राम्या, सतराम्या, असफ्या हीं नानाप्रकारचीं सुवर्णाचीं नाणीं निरनिराळ्या बादशहांचीं होत. १३. धोकटी, धोंगटी=दोन पुडांची पिशवी.

कापड भांडें ताब्याचें वरकड हान [अन्य ?] जिन्नस यास हात लाविलाच नाहीं. असें शहर दोनें[14] दिवस अहोरात्र लुटिलें. उत्तम घोडे जितके युद्धांत व सावकारांच्या घरांत सांपडले तितके घेतले. आणि राजियांनीं विचार केला कीं, लौकर निघून जावें. असें करून कुल लष्करांतून निमे घोडीं भांडावयास लष्करी ठेविलीं. निमे घोडियावरि धोंगाटिया मालाच्या घातल्या. पाईच्या लोकांस हमेण्यौं[15] करून त्यांजजवळ दिधल्या. अशी मुस्तेदी[16] करून, बोझीं घेऊन निघाले. सुरतेचा कोट घेतला नाहीं. अवकाश थोडा म्हणून शहर मारून चालिले. ही खबर मोंगलांचे सुभेदार वीस उमराव व मोहबतखान व दाऊदखान असे सात गांवची दवड करून, बराबर हजार स्वार एक एक सुभ्याबराबर, चालून आले. त्यांनीं राजियास गांठलें. गनीम आला ऐशी खबर कळली. राजा खासा घोड्यावर बसून बख्तर[18] घुगी घालून, हातीं पट्टे चढवून, मालमत्ता घोडीं, पाईचे लोक पुढें रवाना करून, आपण दहा हजार स्वारांनिशीं सडे सडे राऊत उभे राहिले. *वणी दिंडोरी म्हणवून शहर आहे. ते जागां उभे राहून सुभ्यांचे लोक आले त्यांशीं घोरांदर युद्ध केलें. मोहबतखान व दाऊदखान यांनीं युद्ध केलें. राजियांनीं आपली फौज पुढें करून पाठीवर आपण खासा राहून झगडा दिधला. प्रतापराव सरनोबत व व्यंकोजी दत्तो व आनंदराव वरकड सरदार पुढें होऊन मोठी कत्तल केली, आणि मोंगल मारून मुरदे पाडिले. दोनप्रहर युद्ध जालें. मराठे यांणीं शर्त केली. तीन हजार मोंगल मारिले. तीन चार हजार घोडे पाडाव केले. दोन वजीर मोंगलाई सांपडले. असे फत्ते करून

---

१४. 'सहा दिवस' ग्रांट डफ. 'चार पांच दिवस' चिटणीस. १५. हमेणी=लांब पिशवी. १६. मुस्तेदी=तयारी. १७. इंग्रजांच्या वखारीबद्दल येथें उल्लेख नाहीं. त्यांनीं यावेळीं आपला बचाव केला व कांहीं सावकारांचें आपल्या कोटांत संरक्षण केलें. कदाचित् शिवाजीस तितकी फुरसद सांपडली नसेल, असेंही म्हणतां येईल. १८. बख्तर=पोलादी कड्यांचें चिलखत. घुगी=शिरस्त्राण. *ही वणी दिंडोरीची लढाई अक्टोबर १६७० मध्यें झाली. वणी दिंडोरी नाशिक जिल्ह्यांत आहेत.

आले. तों पुढें उदाराम वजीर मोंगलांचा याचा लेंक जगजीवन [ व ] उदाराम [ याची ] बाईल रायबागीण[१९] असे व सरदार पांच हजार मोगल घेऊन उंबर[२०]-खिंडीस आले. त्यांस मारून चालविलें. रायबागीण कोंडली. तिणें दांतीं तृण धरून लेंक राजियाची म्हणून बोलून कौल घेतला. मग तीस कौल देऊन [२१]अनात करून सोडिली. आणि माघारे राजे राजगडास आले.

मालमत्ता सुरतेची आकार करितां सर्व बिशात पांच [२२]क्रोड होनांची आणली. चार हजार घोडीं आणिलीं. ती पागा केली. पागेस खूण चौकटीचा डाग घोड्याचे उजवे टिरीवर देऊन, अशी ओळखण करून, पुढें ज्या ज्या मुलखांत अदलशाही, निजामशाही गड होते तितके घेतले. कित्येक डोंगर बांके जागेंत होते ते गड वसविले. जागोजागां गांवावरि मुलखांत नूतन गड वसविले. गडाकरितां मुलूख जप्त होतो असें समजून गड बांधिले, व कोंकणांत कल्याण, भिवंडी, राजापूर पावेतों देश काबीज केला. काबीज करितां करितां जागां जागां पुंड पाळेगार होते व देशमुख होते, त्यांमध्यें जे युद्धास आले त्यांस मारून गर्दीस मेळविलें, आणि ज्यांनीं कौल घेतला, त्यांस यथायोग्य चालवून रक्षिलें. रेवदंडा, राजपुरी दर्यामध्यें किल्ला निजामशाही आहे. तेथें हबशी किल्लेदार जागियाचा खावंदच. याचीं पाणियांतील जाहाजें [२३]गुराबा चाळीस पन्नास आरमार त्यानें करून, मुलूख मारून, पैदा करून जागा जतन आहे. त्याचे लोकांनीं राजियाचे देशास उपद्रव मांडिला. मग राजियानें बाजी पासलकर यास लष्कर मावळा हजार दोन हजार [दिला.] तैसेच जाहाजें पाणियांतील जालीं. समुद्रास पालॅ[२४]ण राजियानीं घातलें. हा

१९. रायबागीण ही माहूरची देशमुखीण. हिचा भ्रतार उदाराम एका लढाईंत पडला असतां ही पुढें होऊन आपल्या लोकांस धीर देऊन जय पावली, म्हणून तीस 'रायबागीण' असा किताब बादशाहानें दिला होता. उदाराम=उद्धवराम. हा माहूरचा देशमुख, देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण, मोंगलाचे पदरीं होता. त्याला 'रोज उदाराम' अशी पदवी होती. २०. 'उंदीरखिंडीस' पाठांतर. २१. अनात=अनाथ (?) २२. "साडेआठ कोट होनांची जागा आणिली." पाठांतर. २३. गुराब=एक प्रकारचें तारूं. २४ पालण=पल्याण=खोगीर.

एक हात संजला. राजपुरी एक पाणियांत उरली, याकरितां अद्यापि निजामशाहाचें नांव चालतें. तें स्थळ हस्तगत करावें म्हणून राजियांनीं जागां जागां डोंगर पाहून गड वसविले, कीं येणें कडोन दर्या जेर आहे, आणि पाणियांतील राजे जेर होतील. असें जाणून कित्येक पाणियांतील डोंगर बांधून दर्यामध्यें गड वसविले. पाणियांतील म्हणजे केवळ जंजिरे असे करून गड जाहाजें मेळवून दर्यास पालाण राजियांनीं घातलें. जोंवर पाणियांतील गड असतील तोंवर आपलें नांव चालेल, असा विचार करून अगणित गड जंजिरे जमिनीवर व पाणियांत वसविले. असें कर्म केलें.

त्याजवरि रा[२५]जपुरीहून कायसांवत म्हणोन पांच हजार फौजेनिशीं युद्धास आला. मोठें युद्ध होतां बहूत रणखंदल जालें. कायसावंत खासा व बाजी पासलकर महायोद्धा,—याच्या मिशा दंडायेवढ्या, यांस पीळ घालून वरि केशांच्या आधारें निंबें दोहींकडे दोन ठेवीत होता, असा शूरमर्द ठेविला—याशीं व त्याशीं खासाखाशी गांठ पडली. एकास एकानीं पंचवीस जखमा करून ठार पडले. मग उभयतांकडील दळ आपले जागियास गेलें.

इतकियांत राजियाचे बाप शाहाजी महाराज बेंगरुळीं होते ते विजापुराकडे येत असतां एकाएकीं चित्रदुर्गांत [ल्या] *विलायतीमध्यें बो[२६]र्गदरी गांवीं घोडियावरून पडून मृत्यू पावले. हें वर्तमान राजियास कळलें. बहूत शोक केला. सर्वही विधान करून दानधर्म अपार केले, आणि बोलले कीं, " मजसारख्या पुत्राचा पराक्रम महाराज पाहाते तरि उत्तम होतें. आपण आपला पुरुषार्थ कोणास दाखवावा ? मागें अफजलखान मारिला व शास्ताखानास शास्ती केली, पराभवातें पावविला, आणि मिरजा राजियाची भेट घेऊन दिल्लीस गेलों, पादशाहाची भेट घेऊन मागती आपल्या राज्यास

---

२५. राजपुरीचा आणि सावंताचा कांहीं संबंध नाहीं. पण यावेळीं तो हबशाच्या मदतीस आला होता. पासलकर यास वाडीच्या सावंतावर पाठविलें होतें. *विलायत=मुलूख, देश. २६. "बोदेगिरगांवीं" पाठांतर. "तुंगभद्राकाठीं बसवापट्टन (बेदनूर ) नजीक शाहाजी १६६४ मध्यें मृत्यू पावला." ग्रांट डफ.

आलों. मागती कित्येक गड घेतले व शहरें मारिलीं आणि पागा, शिलेदार लष्कर चाळीस हजार केलें. असें पराक्रमाचें वर्तमान ऐकून महाराज संतुष्ट जाले. समाधान-पत्रें आपणास वरचेवर येत होतीं. तैशींच अलंकार वस्त्रें पाठवीत होते. या उपरि त्यांमागें आपणास कोणी आतां वडील नाहीं!" म्हणून मोठा खेद केला. त्या उपरि मातुश्री अग्निप्रवेश करीत होती, तिचे मांडीवर बैसून, गळां मिठी घालून, आण घालून राहाविली. "आपलें पुरुषार्थ पाहावयास कोणी नाहीं. तूं जाऊं नको." म्हणून मोठा यत्न करूनें राजियांनीं व सर्व थोर थोर लोकांनीं राहाविली. असें वर्तमान जालें.

पुढें राजियास राजपुरीचे शिद्दी, घरांत जैसा उंदीर तैसा शत्रू, यास कैसें जेर करावें म्हणून ‡तजवीज पडली. तेव्हां रघुनाथ बल्लाळ सबनीस यांनीं आंगें अर्ज केला कीं, आपण शिद्दीवर स्वारी करितों. असें म्हणून सात पांच हजार मावळे खकम पाईचे घेऊन राजपुरीवरि चालिले. त्यांनीं जाऊन राजपुरी पावेतों तळें, घोंसाळें कुल देश मारून राजपुरी पावेतों सरद दरियाकिनारा मोकळा केला. शिद्दीच्या एक दोन फौजा आल्या त्या मारिल्या. तेव्हां राजपुरीकडून रघुनाथपंताशीं राजकारण करून सला केला. देश थोडाबहूत मागून, पुढें सज्जन मनुष्य पाठवून, आणशफत देऊन रघुनाथपंतास भेटीस नेलें. भेट जाहाली. सल्याची बळकटी करून सख्य जालें. रघुनाथपंतास वस्त्रें घोडा दिधला. आपले देशास आले. पुढें काळानुसार रघुनाथपंत मृत्यू पावले. त्या नंतर शिद्दीचें शैल* तुटलें. यावरि हबाशियांनीं बदल खाऊन देशास उपद्रव करूं लागले. मग राजियांनीं व्यंकाजी दत्तो फौजेनिशीं नामजाद रवाना केले. त्यांनीं जाऊन, त्याचा मुलूख मारून तलफ[२७] केला. मग शिद्दीनें आपले जातीचे हबशी लष्कर घोडेस्वार व हशम नामजाद व्यंकाजी दत्तोवर रवाना केले. यांशीं त्यांशीं युद्ध जालें. तीनशें हबशी व्यंकाजीपंतीं मारिले. घोडे पाडाव केले. व्यंकाजीपंतीं कैस्त[२८] फार केली.

---

‡ तजवीज=विचार, काळजी. *शैल=शल्य, कांटा. २७. तलफ=जप्त. २८ कस्त=मेहनत.

बारा जखमा त्र्यंकाजीपंतास लागल्या. असा चौकीं[२९] बसवून आले. शिद्दानें सल्याचें नातें लाविलें होतें. परंतु राजियांनीं सला केलाच नाहीं. त्याचे देशांत जागां जागां गड कोट नवेच बळावून राहिले. राजपुरी नजीक डोंगर बळाविला होता, तो घेऊन, गड बांधून कुल देश काबीज केला. ठाणीं ठेविलीं. मग त्याचा इलाज चालेना. पांच सात हजार हशम व सुभे ठेविले. असें केलें. मग राजपुरीस मुलूख नाहीं. दाणे कोठून यावे ? त्यास पाणियांतील जाहाजें होतीं. तेणेंकरून वरकड मुलूख मारून, सामान आणून खाऊं लागले. त्यास राजियांनीं जाहाजें पाणियांतील साजिलीं. गुराबा व तरांडीं व तारवें, गलबतें, शिबाडें[३०], गुराबा, पगार अशीं नाना जातींचीं जाहाजें करून दर्यासागर* म्हणोन मुसलमान सुभेदार व मायनाईक म्हणोन भंडारी असे दोघे सुभेदार करून, दोनशें जाहाजें एक सुभा, असें आरमार सजलें. त्यास व शिद्दीचे जाहाजांत युद्ध होऊन शिद्दीचीं जाहाजें पाडाव केलीं. युद्ध बहुत जाहालें. दर्यांत तरांडें फिरेना असें जालें. त्यावर हमेषा युद्ध करीत चालले मग चोरून मारून हबशी सामान नेत होता. राजियाचीं जाहाजें जागां जागां बंदरें शहरें मोंगलाई व फिरंगी व वलंदेज, इंग्रज, किलाताब ऐशा सत्तावीस पादशाहा पाणियांत आहेत, त्यांचीं शहरें बेदनूर, सौंदें, श्रीरंगपट्टणें[३१] ऐशीं दर्या किनारे नाना शहरें मारून पोट भरीत चालले. जागां जागां युद्ध करीत मालमत्ता मेळवून, आपलें पोट भरून राजियास रसद द्रव्यें जिन्नस आणून देऊं लागले. ये रितीनें सातशें जाहाजें पाण्यांतील जालीं. समुद्रामध्येंही एक लष्कर जालें. हा एक § बेत साजिला. पाण्यांतील एक राजपुरी[३२] निजामशाही उरली. याकरितां अद्याप निजामशाहाचें[३३] नांव चालतें.

---

२९. चौका=जरब, धाक. ३०. नौकाविशेष. *'दर्यासारंग' असें असावें. सारंग=नाखवा, तांडेल. ३१. हीं ठिकाणें दर्याकिनारीं नाहींत हें सांगणें नको. § 'बेत,' येथें 'हात' तर नव्हे ! ३२. येथें राजपुरी=जंजिरा. ३३. ह्यावेळीं जंजिरेकरे मोंगलाचे अंकित होते. निजामशाही मागेंच बुडाली होती.

तें स्थळ जेर करावें म्हणोन*, कोंकणांत कुडाळीं लखम सावंत देसाई म्हणोन पुंड होता. बारा हजार हशमानिशीं राहात असे. कुडाळ म्हणजे आदलशाही, त्यानें विजापुरास सांगून पाठविलें कीं, " फौज घोडा-राऊत, हशम मेळवून आपण राजियावरि चालोन जातों आणि कोंकण सोडवितों." म्हणोन सांगोन पाठविलें. त्याजवरून विजापुरींहून खवासखान सरलष्कर, मोठा योद्धा, दहा हजार स्वारांनिशीं कुडाळास आला. लखम सावंत बारा हजार हशमांनिशीं सामील होऊन कोंकण सोडवीत चालले. इतकियांत राजास खबर कळून लष्कर व हशम निवड करून नीट चालून त्याजवर घेतलें. खवासखानास विजापुराहून मदतीस बाजी घोरपडे, दीड हजार स्वार, येत होते. घाट उतरोन कोंकणांत राहिले. त्याजवर राजियांनीं लष्कर पाठवून छापा घालून, बाजी घोरपडे कुल भाऊबंद सहवर्तमान[३४] बुडविले. बाराशें घोडीं पाडाव केलीं. मोठें युद्ध जालें. पुढें कुडाळावरि खवासखानावरि जावें, त्यासही यासारखें बुडवावें, तों त्यानीं हें वर्तमान ऐकिलें. बाजी घोरपडे दीड हजार घोडे समवेत बुडविले. ही खबर ऐकून, धास्त खाऊन घाटावर पळून गेला. नीट विजापुरास पावला. पुढें लखम सावंतावरि राजियांनीं नामजादी केली. त्याचीही फौज कित्येक मारिली. यावरि लखम सावंत कुडाळ प्रांत सोडून फिरंगणांत‡ बाहेर देशांत पळाला. कुडाळ देश राजियांनीं काबीज केला. फिरंगी यास राजियाचा धाक, तेथें त्यास ठेवून घेववेना असें जालें. जागा कोठें नाहीं तेव्हां राजियांशीं राजकारण लावून पितांबर शेणवी, मत्स्याहारी ब्राह्मण, म्हणून कुडाळीं हेजीब पाठवून दिला. राजियाचा कौल घेऊन भेटीस आला. भेट जाली. " आपण सावंत

---

*मूळांत हें वाक्य अपुरेंच राहिलें आहे. ३४. शाहाजीस विश्वासघातानें धरून विजापुरास कोंडून ठेवणारा बाजी घोरपडा हाच. ह्याचा सूड घेशील तरच तूं माझा पुत्र खरा, असें शिवाजीस शाहाजीनें मागें लिहिलें होतें. त्याजवरून शिवाजीनें त्याचा ह्या प्रसंगीं सत्यानाश उडविला. पण हें मुधोळ येथेंच झालें. बाजी कोंकणांत आला नव्हता. ‡ फिरंगाण=फिरंग्याचा म्ह० पोर्तुगिजांचा मुलूख.

नगर वाचनालय, सातारा



म्हणजे भोंसले यांचा गोत्रज. आपलें तुम्हीं चालविणें उचित आहे.” असें कित्येक बोलिल्यावरि राजियांनीं देशमुखी कुडाळची करार करून तनकादाखल साहा हजार होन वेतन करार करून द्यावें असें केलें. वाडा-हुडा बुरजांचा बांधूं नये. कुडाळीं राहावें. जमाव करूं नये. असें करून ठेविलें. त्याचे सरदार राम दळवी व तान सावंत यांस हशमांच्या हजारिया देऊन आपले आलाहिदा चाकर तिघे तीन जागां नामजाद ठेविले. पुनः लखम सावंताची व यांची भेट होऊं न दिली. असा कुडाळ देश काबीज केला. फोंड कोट इदलशाही होता. तेथें मोहबतखान राजबिंडा सरदार जबरदस्त होता. ते जागां वेढा घालून, सुरंग लावून हुडे बुरूज उडविले. फोंड घेतलें. मोहबतखानास कौल देऊन विजापुरास जावयास निरोप दिला. तेव्हां राजियाकडील सरदार इब्रामखान मुसलमान मोठा धारकरी, लष्करचा हजारी, बरोबरि होता. त्यानें कष्ट मेहनत बहूत केली. फोंड घेऊन कडवाड[३५], शिवेश्वर, मिरज, अंकोलें, कदरें, सुपें, उडवें हे कोट कोंकणचे कुल घेऊन गोकर्ण महाबळेश्वर, वरघाट सुपें, येथवर सरद लाविली; व गोंवियाचे फिरंगी यांस दबावून त्यांजवळून तोफा, नख्त, जडजवाहीर घेऊन, आपलेसे करून, त्यास उदमास कौल देऊन आलम ‡ दरफ्ती करावयासि निरोप दिला. असें कुल कोंकण काबीज केलें.

पुढें बिदनुरीं शिवापा नाईक जंगम[३६] होता. त्याचें शहर बसनूर* म्हणून थोर नामांकित होतें. दर्याकिनारा, येथें पालती पाठवून पालती आणून, वरघाटें जातां मार्ग नाहीं म्हणून पाणियांतील आपलीं जाहाजें आणून सिद्ध करून, आपण राजा खासा जाहाजांत बसून जाऊन *बसनुरास एकाएकीं दिवस उगवावयासि गेले. शहरचे लोक बेहुशार होते. एकाएकीं जाहाजांतून

३५. कडवाड=हल्लीं कारवार म्हणतात तें शहर व परगणा. ‡ हें आम-दरफ्ती तर नव्हे! ३६. जंगम=लिंगाईत. * ज्यास ग्रां० ड० बार्सीलोर म्हणतो तें बसनूर अगर बसलूर दक्षिण कानडा जिल्ह्यांत कुंडपूरच्या पूर्वेस ४ मैलांवर असून बिदनूरच्या राजाचें मुख्यबंदर होय, असें जदुनाथ सरकार म्हणतात.

उतरले. शहर मारिलें. एक दिवस शहर लुटून फन्ना केलें. जैसी सुरत मारून मालमत्ता आणिली, त्याप्रमाणें बसनूरची मत्ता अगणित माल जडजवाहीर कापडजिन्नस घेऊन आपले देशास आले. मत्ता सर्व पाहातां दोन कोटी होनांची आँणली.

त्या उपरि कारंजें मोंगलाईंत मोठें शहर होतें तेथून पालती आणून खासा राजियांनीं लष्कर बरोबर घेऊन चालिले. जातां जातां औरंगाबादेची पेठ मारिली. सात गांवची दौड करून जाऊन, कारंजियावरि तीन दिवस मुकाम करून, कुल शहरचे वाडे काबीज करून, मत्ता खणती लावून काढली. नक्त, जडजवाहीर, सोनेंरुपें, उंच कापड असें घेऊन स्वारी करून चॉलिले. मोंगलांचे सुभे जागां जागां दिलेलखान व बाहादूरखान, एखलासखान व बेलोलखान व इंद्रमणी असे उमराव, जागां जागां, कोणी दहा हजार कोणी बारा हजार असे चौतर्फा चालून आले. त्यांशीं युद्ध करीत भांडत चालिले. मोठें मोठें झुंज करून मोंगल मारून, गर्दीस मेळवून, हत्ती घोडे उंट मालमत्ता पाडाव करून आणिली. आणि कुल गनिमाचे वजीर माघारे नामोहरम होऊन गेले. राजे आपले फौजेनिशीं सुखरूप देशास आले. पाठीवर दिलेलखान बारा हजार स्वारांनिशीं दहा बारा गांवें अंतरानें भीमातीर पावेतों आला. मग राजे राजगडास [ गेले. ] मालमत्ता संख्या पाहातां सात कोडींचा आकार जाला.

---

३७. हुबळी १६७३ सालीं लुटली. येथें मुबलक दौलत सांपडली. हुबळीचें वर्तमान ऐकून, बेदनूरकरानें शरण येऊन दरसाल करभार देण्याचें कबूल केलें. सें ग्रांट डफ म्हणतो. तेव्हां ही समुद्राच्या बाजूनें केलेली स्वारी " बार्सीलोर " याजवरील होय. बिदनूर वरघाटीं आहे. बसनूर दर्याकिनारीं असें वर लिहिलें आहेच. ग्रांट डफचें बार्सीलोर तें हेंच बंदर. जदुनाथ सरकार. ३८. कारंजें हें १६७० च्या दिसेंबरांत प्रतापरावानें लुटिलें. ह्या स्वारींत विशेष गोष्ट ही झाली कीं, प्रतापरावानें सर्व खानदेशामध्यें प्रत्येक गांवचे पाटील-कुळकर्ण्यांपासून सरकारी वसुलापैकीं चवथाई शिवाजीस देत जाऊं असे करार लिहून घेतले, व

( पुढें चालू. )

पुढें रायरीगड[३९] अदलशाही होता तो घेतला. राजा खासा जाऊन पाहातां गड बहूत चखोट, चौतर्फी गडाचे कडे तासिल्याप्रमाणें, दीड गांव उंच, पर्जन्यकाळीं कडियावरि गवत उगवत नाहीं, आणि धोंडा तासींव एकच आहे, [ असा चखोट. ] दौलताबादही पृथ्वीवर चखोट गड खरा, परंतु तो उंचीनें थोडका. दौलताबादचे दशगुणीं गड उंच. असें देखोन बहूत संतुष्ट जाले आणि बोलिले, तक्तास जागा गड हाच करावा. असें करारीं करून तेच गडीं घर, वाडे, माडिया, सदरा, चौसोपे आणि अठरा कारखाने[४०] यांस वेगळाले महाल, व राणियांस महाल, तैशींच सरकारकुनास[४१] वेगळीं घरें व बाजार, पंच हजारियांस वेगळीं घरें व मातबर लोकांस घरें व गजशाळा व अश्वशाळा व उष्टरखाने, पालखी महाल व वहिलीमहाल[४२], कोठी, थटीमहाल[४३] चुनेगची चिरेबंदी बांधिले.

राजियास प्रथम स्त्री संभाजीराजियाची माता होती, ती निवर्तली. त्याजवरि राजियांनीं साहा स्त्रिया केल्या. त्यांमध्यें मोहित्यांची ‡ कन्या सोईराबाई गरोदर होती. तीस पुत्र जाहला. तो पालथा उपजला. राजियास वर्तमान सांगितलें. राजे म्हणूं लागले कीं, “ दिल्लीची पातशाई पालथी घालील.” असें बोलिले. मग ज्योतिषी म्हणों लागले कीं,

---

( मागील पृष्ठावरून समाप्त. )

त्यांस आलेल्या चवथाईबद्दल पावत्या देऊन, दरवर्षीं असें केल्यास लुटीचें भय तुम्हांस नाहीं इतकेंच नव्हे, तर तुमचें आम्ही संरक्षण करीत जाऊं असेंही आश्वासन दिलें. ग्रांट डफ. ३९. रायरीस शिवाजीनें 'रायगड' असें नांव दिलें. ४०. हे कारखाने निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळे प्रकारें दिलेले आढळतात. एके ठिकाणीं ते असे दिले आहेत:— खजीना–जामदारखाना–जिराईतखाना–पीलखाना–फरासखाना–तासेखाना–शिकारखाना–दारूखाना–उष्टारखाना –अबदारखाना–मुदपाक–नगरखाना–खलबतखाना–शरापखाना–शिलेखाना-तोफखाना–तालीमुदपाक–नगारखाना–खलबतखाना– शरापखाना–शिलेखाना– तोफखाना– तालीमखाना–बंदीखाना. ४१. सरकारकून=अष्ट प्रधान वगैरे. ४२. वहिलीमहाल=रथशाला. ४३. थटीमहाल=गोशाला. ‡‘ शिरक्यांची ’ असें असावें.

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

"थोर राजा होईल. शिवाजी राजियाहून विशेष कीर्ती होईल." असें भविष्य केलें. मग राजियांनीं राजा-राम म्हणोन नांव ठेविलें. आणि बोलिले कीं, "राजाराम प्रजा सुखी राखील. आपणापेक्षां याचा पराक्रम होईल. नांवाची कीर्त बहूत होईल. आपलें नांव रक्षील तर एवढाच रक्षील." असें बोलिले, आणि दानधर्म बहूत केला.

पुढें मोरोपंत पेशवे यांनीं त्रिंबकगडापासून सालेरी किल्ल्या पावेतों किल्ले कित्येक घेतले. कितीएक नवे वसविले. असे चाळीस गड नवे कदीमें त्यांणीं घेतले. कोळवण † काबीज केलें. रामनगर, *जवाहीर हा देश घेतला. त्या देशांतही गड वसविले. अशी ख्यात केली.

हें वर्तमान दिल्लीस पातशाहास सर्वही कळलें कीं, " सुरत मारिली, बसनूर मारिलें, वराणपूर, औरंगाबाद मारिली. सालेरी आदीकरून सर्व किल्ले घेतले. खानदेश, बागलाण, गुजरात, वऱ्हाड देश बांधीत चालिले. असें ऐकून बहूत कष्टी होऊन बोलिले कीं, "काय इलाज करावा ? लाख लाख घोड्यांचे सुभे रवाना केले ते बुडविले. नामोहरम होऊन आले. आतां कोण पाठवावें? शाहाजादे पाठवावे तरि तिकडेच फितवियांत मिळून दिल्लीच घेतील. याकरितां कोणी पाठवावयास दिसत नाहीं. याउपरि आपण खासा कंबरबस्ती करून शिवाजीवर जावें, तर शास्ताखानाचा न्याय जालियास काय करावें? याकरितां, शिवाजी जोंवर जिवंत, तोंवर दिल्ली आपण सोडीत नाहीं." असा विचार केला, आणि इखलासखान म्हणजे केवळ शूर व बेलोलखान यांस बोलावून आणून वीस हजार स्वारांनिशीं सालेरीस रवाना केलें. सालेरी घेऊन फस्त करणें. तसें दिलेलखान यांस दाहा हजार स्वारांनिशीं अहिवंत‡ [ किल्यावर ] रवाना केलें. दिलेलखान

---

४४. या पुत्राचा जन्म चैत्र शुद्ध ९ स झाला म्हणून ' राजा राम ' असें नांव ठेविलें. ४५. कदीम=जुने. † कोळवण=कोळी-वन=कोळ्यांचा मुलूख. *म्हणजे 'जव्हारचें राज्य.' ‡सालेर, अहिवंत इ० किल्ले बागलाण, कळवण व दिंडोरी तालुक्यांत. मात्र सालेर हल्लीं गायकवाडाकडे आहे.

येऊन खळा जवळयास‡ लागले. गडकरी बरे भांडले. मोठें युद्ध जालें. गड हातास आला नाहीं. मोरोपंत पेशवे यांनीं उपराळियास मावळे लोक बारा हजार रवाना केले. त्यांनीं जाऊन छापे घातले. ऐसा घाबरा केला. रामाजी पांगेरा म्हणून हशमांचा हजारी [ त्यानें ] हजार लोकांनिशीं ‡ कणेरागड आहे त्याखालें दिलेलखानाशीं युद्ध केलें. हजार लोक थोडे देखून दिलेलखान यानें फौजेनिशीं चालून घेतलें. रामाजी पांगेरे यांनीं आपले लोकांत निवड करून, निदान करावयाचे आपले सोबती असतील ते उभे राहाणें, म्हणून निवड करितां सातशें माणूस उभे राहिले. तितकियांनीं निदान करून भांडण दिधलें. दिलेलखान याची फौज [ इनें ] पायउतारा होऊन चालून घेतलें. चौफेरा मावळे लोक वेढिले. एक प्रहर टिपरी जैसी शिमग्याची दणाणते तैसे मावळे भांडिले. दिलेलखानाचें बाराशें पठाण रणास आणिले. मग सातशें माणूस व रामाजी पांगेरा सर्वही उघडे बोडके होऊन एकएकास वीस वीस तीस तीस जखमा तिराच्या, बर्चीच्या लागल्या. लोक मेले. मोठें युद्ध जालें. मग दिलेलखान यानीं तोंडांत अंगोळी घालून एक घटका आश्चर्य केलें[४६].

त्याजवर इखलासखान[४७] नबाब याणीं येऊन सालेरीस वेढा घातला. आणि गडाखालें उतरला. हें वर्तमान राजियास कळोन राजियानीं प्रतापराव सरनोबत लष्कर देऊन मोंगलाईंत पाठविले होते, त्यांस पत्रें व जासूद पाठविले कीं, "तुम्हीं लष्कर घेऊन, सिताबीनें[४८] वरघाटें सालेरीस जाऊन, बेलोलखानावरि छापा घालून, बेलोलखान मारून चालवणें; आणि कोंकणांतून मोरोपंत पेशवे यांस हशमानिशीं रवाना केलें; हे इकडून येतील आणि

‡ खळा जवळा व कणेरा व अहिवंत चांदवडच्या डोंगरांत (नासिक जिल्हा) आहेत. ४६. ही पांगेऱ्याची हकिकत ग्रांट डफ देत नाहीं. ही कणेराची लढाई त्यास माहीतच नव्हती. दिलेलखान चाकणास लागला होता व तो किल्ला त्याणें घेतला इतकें मात्र तो लिहितो. ४७. मोहबतखान मुख्य असून इखलासखान हा एक त्याच्या हाताखालचा सरदार होता. ४८. सिताबीनें=जलदीनें, सत्वर.

तुम्हीं वरघाटें येणें; असे दुतर्फा चालून घेऊन, गनिमास मारून गर्दीस मेळविणें." अशीं पत्रें पाठविलीं. त्यावरून प्रतापराव लष्कर घेऊन वरघाटें आले. मोरोपंत पेशवे कोंकणांतून आले. उभयतां सालेरीस पावले. एक तर्फेनें लष्करानीं घोडीं घातलीं. एक तर्फेनें मावळे लोक शिरले. आणि मारामारी केली. मोठें युद्ध जाहालें. चार प्रहर दिवस* युद्ध जाहालें. मोंगल, पठाण, रजपूत, रोहिले, तोफाची, हत्ती, उंटें आराबा घालून युद्ध जाहालें. युद्ध होतांच पृथ्वीचा धुराळा असा उडाला कीं, तीन कोश औरसचौरस आपलें व परकें माणूस दिसत नव्हतें. हत्ती रणास आले. दुतर्फा दहा हजार माणूस मुर्दा जाहाले. घोडीं, उंट, हत्ती [ यांस ] गणना नाहीं. रक्ताचे पूर वाहिले. रक्ताचे चिखल जाहाले त्यामध्यें रुतों लागलें. असा कर्दम जाहाला. मारतां मारतां घोडे जिवंत उरले नाहींत. जे जिवंत सांपडले ते साहा हजार घोडे राजियाकडे गणतीस लागले. सवाशें हत्ती सांपडले. साहा हजार उंटें सांपडलीं. मालमत्ता खजीना, जडजवाहीर, कापड, अगणित बिछाईत हातास लागली. बेवीस वजीर नामांकित धरले. खासा इखलासखान व बेलोलखान पाडाव जाले. ऐसा कुल सुभा बुडविला. हजार दोन हजार सडे सडे पळाले. असें युद्ध जालें. त्या युद्धांत प्रतापराव सरनोबत व आनंदराव व त्र्यंबकाजी दत्तो व रुपाजी भोंसले व सूर्यराव कांकडे, शिदोजी निंबाळकर व खंडोजी जगताप व गोंदजी जगताप व संताजी जगताप व मानाजी मोरे व विसाजी बल्लाळ, मोरो नागनौथ व मुकुंद बल्लाळ, वरकड बाजे वजीर, उमराव असे यांणीं कस्त केली. तसेंच मावळे लोक यांणीं व सरदारांनीं कस्त केली. मुख्य मोरोपंत पेशवे व प्रतापराव सरनोबत या उभयतांनीं आगींजणी केली. आणि युद्ध करितां सूर्यराव कांकडे पंचहजारी मोठा लष्करी धारकरी, याणें युद्ध थोर केलें. ते समयीं जंबूरियाचा गोळा लागून पडला. सूर्यराव म्हणजे सामान्य योद्धा नव्हे. भारतीं जैसा कर्ण योद्धा,

*दिवसा 'तर नव्हे !' ४९. 'रंगनाथ' प्र० प्रत. ५०. आंगेजणी=स्वतःचें शौर्य. ५१. सूर्यराव हा शिवाजीच्या जुन्या बाळपणच्या सवंगड्यापैकीं एक होय.

( पुढें चालू. )

कि. १-०-३२ ८८४८५ ५२८४

त्याच प्रतिमेचा असा शूर पडला. वरकडही नामांकित शूर पडले. असें युद्ध होऊन फत्ते [५२] जाहाली.

हें वर्तमान प्रतापराव याणीं मोरोपंत पेशवे याणीं राजियास पत्रें लिहून जासूद पाठविले. राजियांनीं खबर ऐकून बहूत खुशाल जाले. तोफा मारल्या. साखरा वांटल्या. खबर घेऊन जासूद आले त्यांचे हातीं सोन्याचीं कडीं घातलीं. आणि प्रतापराव सरनौबत व मोरोपंत पेशवे, आनंदराव, त्र्यंबकाजीपंत, यांस बक्षीस अपार द्रव्य दिलें. सरदार हजारी, पंचहजारी लष्करचे, मावळे त्यांस बक्षिसें दिधलीं. नांवाजिलें. वजीर जे पाडाव जाले त्यांस वस्त्रें अश्व देऊन सोडणें म्हणोन हुकूम पाठविला. त्यावरून पेशवे व सरनौबत [ व ] सरदार खुशाल जाहाले. बेलोलखान [५३] व नबाब व वजीर पाडाव जाले त्यांस वस्त्रें व अश्व देऊन सोडिलें. दिलेलखान सालेरीहून चार मजलींवर होता. त्याणें ही खबर ऐकून माघारा पळोन गेला.

ही खबर दिल्लीस पादशाहास कळून बहूत दिलगीर झाले. तीन दिवस बाहेर आले नाहींत. आमखास [५४] [ मध्यें ] तीन दिवस आले नाहींत. असे कष्टी जाले. " खुदानें मुसलमानाची पातशाही दूर करून शिवाजीसच दिधली असें वाटतें. आतां शिवाजी अगोदर आपणांस मृत्यू होईल तरि बरें. आतां शिवाजीची चिंत्ता जिवीं सोसवत नाहीं." असें बोलले. मग बहादूर

---

( मागील पृष्ठावरून समाप्त. )

जावळी व रोहिडा हे किल्ले शिड्या लावून घेतले त्यावेळीं यानें फार मोठी कामगिरी बजाविली होती. ग्रां० ड०. ५२. शिवाजीच्या फौजेनें हा मोठा जय संपादिला. यांत मोगलांचे २२ सरदार मारले गेले व पुष्कळ मोठमोठे पाडावही सांपडले. पाठविलेल्या सैन्याचा पराजय झाला हें पाहून मोहबतखानानें सालेरीचा वेढा उठविला. ही लढाई खुद्द शिवाजीनें मारिली असें जदुनाथ सरकार म्हणतात, पृ० २४२; पण सर्व बखरकार मोरोपंत व प्रतापराव यांनींच हा जय मिळविला असें लिहितात. ५३. हा मोहबतखान असावा. बेलालखान कोण! विजापूरचा एक सरदार बहिलोल नांवाचा होता, पण येथें तर हा मोंगलाकडील आहे. पुढें पृष्ठ ७८ व ७९ पाहा. ५४. आमखास=दरबारचा दिवाणखाना.

कोका, पातशाहाचा दूध-भाऊ, याणें येऊन पातशाहाचें समाधान केलें कीं, " तुम्हीं दिल्लीची पातशाई खुशाल करणें. आपण शिवाजीवरि जातों. त्यास हालँखुद ठेवितों. त्याचें लष्कर पातशाही मुलखांत न ये असें करितों. नाना हुन्नर करून त्यास जेर करितों. पातशाहांनीं फिकीर न करावी." असें समाधान करून, पातशाहास आणून तख्तावर बसविलें. बहादूँरखानास नांवाजून वस्त्रें अलंकार आपले गळ्यांतील पदक व शिरची कलगी जडावाची, दोन हत्ती व घोडे असें देऊन दौलत जाफा* दिधली, आणि समागमें सत्तर हजार स्वार दिले. हँरोलीस दिलेलखानास हुकूम करून दिल्हा. येणेंप्रमाणें फौज दक्षणेस राजियावर पाठविली. ती मजल दरमजल दिल्लीहून चालिली. राजियास ही खबर बातमी दिल्लीहून आली. राजे बोलिले कीं, " बहादूरखान पेंडीचें गुरूं आहे. त्याचा गुमान काय आहे? त्यास आपले मुलकांत यावयास दोन वर्षें लागतील!" असें बोलिले.

मग अंणाजी दत्तो सुरनीस यांनीं मालसांवत, मावळे यांचा हजारी, यास सांगून, हल्ला करून पन्हाळा किल्ला अदलशाही होता तो घेतँला, व

---

५५. हालखुद=जसा पाहिजे तसा. 'यथावश्यं तु हाल्खुदं' राज व्य० कोशः ५६. हा खानजहान बहादूर होय. * जाफा=अधिक. ५७. 'सेनामुखं हरोल. स्यात्' राज व्य० कोश. हारोल, हरोल=बिनी, आघाडी.

५८. सन १६७३ पन्हाळा किल्ला या उपर शिवाजीपासून विजापूरकरांच्या हातीं लागला नाहीं. त्यांनीं तो परत घेण्याकरितां पुढें केलेले सर्व प्रयत्न व्यर्थ गेले. एका जुन्या दफ्तरांत ह्या पन्हाळे प्रकरणास उद्देशून शिवाजीवर केलेली कविता सांपडली आहे ती येणेंप्रमाणें:—

पराक्रम किले पन्हाळा.

होतों पन्हाळ्यावरि मी शिवाजी। चक्रावतीची डरडार भाजी॥ आतां पुढें कोण धजेल पाहों। मी भोंसला का उगलाचि राहों?॥१॥ फौजेंत माल मृ कं द गजेंद्र चाले। शोभे निशाण भगवें गज फार डोले। दैत्येंद्र का राजगडास येना। मी आपुला पर्वत त्यासि देना॥२॥ भावें भजावें मज मोंगलानीं। भविष्य सांगे

(पुढें चालू.)

सातारा, चंदन, वंदन, नांदगिरी, परळी असे किल्ले घेतले. राजा खासा किल्ले देश पाहावयास रायरीहून निघोन आले. वांईचा कोट येतांचे घेतला तसाच कोट कऱ्हाडचा घेतला. सिरोळ, कोल्हापूर हे कोट घेतले. हुकेरी, रायबागपर्यंत देश घेतला.

मुलूख चौतर्फा सुटला. मुलकांत आटोप कैसा होय ? तेव्हां मोरोपंत पेशव्याचा हवाला कल्याण-भिंवडीपासून देखील कोळवण सालेरीपर्यंत वरघाट व कोंकण, त्यांचे स्वाधीन देश केला. लोहगड व जुन्नर देखील बारा मावळें हार्डोंळ्याचे घाटापासून पेशव्याचा हवाला केला. अंणाजी दत्तोंचे स्वाधीन चऊंलपासून दाभोळ, राजापूर, कुडाळ, बांदें, फोंड, कोपलपर्यंत कोंकण अंणाजी सुरनीस याचे स्वाधीन केलें. वरघाट वाईपासून कोपल तुंगभद्रा पावेतों देश नेमून दत्ताजीपंत वाकनीस याचे स्वाधीन केला. दत्ताजीपंतास पन्हाळां ठेविलें. असा देश तीन सरकारकुनांच्या हवालां केला. याखेरीज मोंगलाई देश येथें सुभेदार ब्राह्मण सात पांच ठेविले. तेही

---

( मागील पृष्ठावरून समाप्त. )

तुळजा भवानी। समुद्र याचें जळ मोजवेना। माध्यान्हिंचा भास्कर पाहवेना। मुष्टींत वैश्वानर बांधवेना ऐसा शिवाजी नृप जिंकवेना॥ ३॥

ह्याच श्लोकाच्या खालीं पेशव्याच्या वर्णनाचा एक श्लोक आहे, तो पेशवा मोरोपंत असावा, व सालेरीच्या जवळील युद्धांत त्यानें केलेल्या पराक्रमास उद्देशून हें कवन रचिलें असावें असें दिसतें, म्हणून तेंही येथें देतों.

पुण्याच्या कप्या (?) गर्जताहे शिवाजी। तिथें नांदतो पेशव्या मर्द गाजी। जशीं कौरवें मारिलीं अर्जुनानें। तशीं मोंगलें मारिलीं पेशव्यानें॥१॥

ह्या कवितांत अशुद्धें कांहीं आहेत तीं ज्यांस तिची दुसरी प्रत मिळेल त्यांनीं शुद्ध करावीं. ही कविता रामदासाच्या धाटणीवर केलेली दिसते. मात्र पेशव्याशीं पुण्याचा संबंध या वेळीं कसा जुळतो ?

५९. 'येतां येतां' महाड प्रत. ६०. 'हरेळूच्या' महाड प्रत. 'देवाळ्याचे' सा० प्रत. ६१. "चौक—दाभोळसुभा, राजपुरी, कुडाळ देश, बांदे, खारें व अंकोला" म० प्रत. 'चौक, राजपुरी' हें चुकीचें. खारें=खारें-पाटण असावें.

पेशव्याचे आज्ञेंत ठेविले. गड कोट किल्ले येथें सरकारकुनांनीं परामर्ष करावा. परंतु किल्लेदार कारकून लोक जे ठेवणें ते राजियांनीं आपले नजरगुजर करून ठेवावे. कामाचा माणूस पाहून तैनात जाजती हशमांस करणें ती सरकारकुनांनीं करावी. ये जातीनें तह केला. सरकारकुनांचे मुतालीक राजियाजवळ असावे. वर्षास हिशेब मुलकाचा व रसद घेऊन सरकारकुनांनीं राजदर्शनास यावें. येणेंप्रमाणें कारभार करीत चालले.

पुढें विजापुराहून अबदुल[६२] करीम बेलोलखान बारा हजार स्वारांनिशीं इकडे चाल करून आला. तो फौजेनिशीं हिकडे चालला ही खबर राजियास कळोन कुल लष्कर प्रतापराव यास हुकूम करून आणविलें आणि हुकूम केला कीं, "विजापूरचा बेलोलखान येवढा वळवळ[६३] बहूत करीत आहे. त्यास मारून फत्ते करणें." म्हणोन आज्ञा करून लष्कर नबाबावरि रवाना केलें. त्यांनीं जाऊन उंबराणीस नबाबास गांठिलें. चौतर्फा राजियाचे फौजेनें कोंडून उभा केला. पाणी नाहीं. असा जेर केला. युद्धही थोर जाहालें.* इतक्यांत अस्तमानही जाला. मग निदान करून नबाब पाणियावरि जाऊन पाणी प्याला. त्याजवरि प्रतापराव सरनौबत यास आंतस्त कळविलें कीं, " आपण तुम्हांवारि येत नाहीं. पादशाहाचे हुकमानें आलों. याउपरि आपण तुमचा आहें. हरएक वक्तीं आपण राजियाचा दावा न करीं." असें कितीएक ममतेचें उत्तर सांगोन सला केला. मग राजियाचें लष्कर निघोन गेलें. राजियास खबर कळून लष्करास ताकीद करून फजीत केलें कीं, "सला काय निमित्य केला ?" असे रागास आले. पुढे प्रतापराव फौजेनिशीं मोंगलाईंत भागानगरचा देश, देवगड, रामगिरी, बाजे[६४] देश मारून लुटून माघारे आले.

---

६२. विजापूरच्या सुलतानास अर्धांगवायु होऊन तो मरण पावला. त्याचा मुलगा शिकंदर हा लहान होता, आणि मुत्सद्यांमध्यें भांडणें सुरू झालीं. ह्या मुत्सद्यांपैकीं हा अबदुल करीम एक होय. ६३. 'चळवळ' प्रताप० प्रत. * हीं उंबराणी ( उमराणी ) येथें लढाई झाली. उमराणी विजापूरच्या पश्चिमेस सुमारें १८ कोशांवर आहे. ६४. बाजेदेश=इतर प्रदेश.

तों राजियाजवळ निळो सोनदेव मजमदार होते त्यांस एकाएकीं मृत्यु जाहाला. त्यांची मजमदारी त्यांचे पुत्रास सांगावी असें केलें. त्यांस वडील पुत्र नारोपंत होते ते कांहीं शाहाणे नाहींत. रामचंद्रपंत धाकटे पुत्र, तो शाहाणा. राजियाचा लोभ फार, कीं हा मोठा शाहाणा, दैवाचा, भाग्यवंत, बापापेक्षां लक्षगुणीं थोर होईल. असें म्हणून नारोपंतास मजुमदारी मात्र सांगून हुद्दा चालविला.

त्याजवरि मागती विजापुराहून बेलोलखान पन्हाळे प्रांतास पादशाहांनीं रवाना केला. तो सदर प्रांतांत आला. त्याजवरि राजियास कळलें कीं, बेलोलखान मागती आला आहे. मग राजे म्हणूं लागले कीं, "हा घडोघडी येतो," याकरितां मागती प्रतापराव यास पाठविलें कीं, "तुम्हीं लष्कर घेऊन जाऊन बेलोलखान येतो, याशीं गांठ घालून, बुडवून फत्ते करणें. नाहीं तर तोंड न दाखविणें." ऐसें प्रतापराव यास निक्षून सांगून पाठविलें. त्यावरि प्रतापराव जाऊन बेलोलखानाशीं गांठलें. *जेसरीवरि नबाब आला. त्यानें गांठिलें. मोठें युद्ध जालें. अवकाल होऊन प्रतापराव सरनोबत तरवारीचे वारानें ठार जाले. रण बहूत पाडिलें. रक्ताच्या नद्या चालिल्या. त्याजवर बेलोलखान विजापुरास गेला. आणि राजियाचें लष्कर पन्हाळ्याखालें आलें.

प्रतापराव पडले, ही खबर राजियांनीं ऐकून बहूत कष्टी जाले, आणि बोलिले कीं, "आज एक बाजू पडली!" प्रतापराव यास आपण लेहून पाठविलें कीं, "फत्ते न करितां तोंड दाखवूं नये, त्यासारिखें करून बरें म्हणविलें. आतां लष्कराचा बंद कैसा होतो? सरनौबत कोण करावा?" अशी तजवीज करून, आपण स्वस्थ लष्करांत येऊन, लष्कर घेऊन कोंकणांत चिपळून जागा परशुरामाचें क्षेत्र आहे, तेथें येऊन राहिले[६६]. मग लष्करची

---

* 'जेसरी' कोठें? ६५. प्रतापरावाबरोबर हसाजी मोहिते पंचहजारी हा होता. त्यानें प्रतापरावाचा माड झालेला पाहून विजापूरकरांवर निकरानें हल्ला केला, त्यांत मुसलमानांचा पराभव होऊन मराठ्यांचा जय झाला व त्यांस लूट पुष्कळ सांपडली. त्या कामगिरीबद्दल हसाजीस पुढें सरनौबत केलें. ६६. कोंकणांत छावणीस राहण्याचें कारण हें कीं त्या सालीं देशावर दुष्काळ पडला होता.

पाहाणी करून लहान थोर लष्करास व पायदळ लोकांस खजीना फोडून वांटणी केली, आणि सरनोबतीस माणूस पाहातां हसाजी मोहिते म्हणून पागेमध्यें जुमला होता; बरा शाहाणा, मर्दाना, सबुरीचा[६७], चौकस, शिपाई मोठा धारकरी पाहून, त्यास 'हंबीरराव' नांव किताबती देऊन सरनोबती सांगितली. कुल लष्करचा गाहा[६८] करून हंबीरराव यांचे ताबीजें[६९] दिधलें. आणि फौज [ सुद्धां ] वरघाटीं रवाना केला.

त्यानंतर शाहाजी राजे पडले. विजापूरचे पादशाहांनीं त्यांची दौलत त्यांचे धाकटे पुत्र व्यंकाजी राजे होते त्यांस दिधली. नारो दीक्षित कुल कारभारी महाराजांचे होते, ते मृत्यू पावले. त्यांचे पोटीं रघुनाथ नारायण व जनार्दन नारायेण हे दोघे बंधू, सर्व विद्येनें निपुण व राजकारणी, बुद्धिवंत, चतुर, शाहाणे होते. त्यांचा व व्यंकाजी राजियाचा बनाव बसेना. मग ते उभयतां[७०] बंधू त्याजवळून निघून राजियाकडे आले. येतांच रघुनाथपंत व जनार्दनपंत व बाळकृष्ण चुलतभाऊ व बाळकृष्णपंताचे पुत्र कमळाजीपंत व जनार्दनपंताचे पोटीं गंगाधरपंत म्हणोन सुबुद्ध जाले. असे पांचजण व घरचीं माणसें, घोडीं व हत्ती असें सामान बायकांसहवर्तमान राजियाकडे आले. हें वर्तमान राजियास कळतांच राजे सामोरे जाऊन भेट घेतली. वरकडही सरकारकून जाऊन भेट घेऊन सन्मानें आणिले. त्यांस सर्वांस मिळून, देखील घोडीं, चाळीस हाजार होन तैनात सालीना करून, तनखे वराता देऊन, सरकारकुनांमध्यें श्रेष्ठत्व गौरवें देऊन, त्यांचें चालवून‡ ठेवून घेतलें.

हंबीरराव लष्कर घेऊन संपगांवास गेले. इतकियांत विजापूरचा सरदार हुसेनखान मायाणा पठाण मोठा तोलदार, पांच हजार पठाण, तिरंदाज, बरचीवाले, आडहत्यारी असे पं च रू स [ ? ] तसे * बहिले, बंदुकी,

---

६७. सबुरीचा=शांत, सहनशील. ६८. गाहा=एकीकरण, एकंदर. ६९. 'स्वाधीन केलें' महाड प्रत. ७०. जनार्दनपंत शिवाजीजवळ होताच व त्याजकडे एक मोठा अधिकारही होता. ‡ जनार्दनपंत 'सुमंत' होताच, रघुनाथपंतास पुढें 'अमात्य' पद दिलें. * बहिले, बेले=पायचे लोक, पाईक. प्रो० सुरेंद्रनाथ सेन.

तोफखाना असा होता. हुसेनखान म्हणजे जैसा नबाव बेलोलखान याच्या जोडीचा सरदार. तो हंबीरराव याजवर चालून आला. मराठे म्हणजे मोठे हरीफ, त्यांनीं शर्त करून भांडण दिधलें. नीट ग च ड ते [?] घोडीं घालून मारामारी केली. हुसेनखानाचे कित्येक लोक मारिले व घोडीं मारिलीं व हत्ती रणास आणिले. मोठें युद्ध बळकट दोन प्रहर दिवसापासून चार प्रहर रात्र पर्यंत जालें. साहा प्रहरांत कुल फौज बुडविली. हुसेनखान खासा धरिला. चार साडेचार हजार घोडीं पाडाव केलीं. बारा हत्ती पाडाव केले. तसे उंट व बाजे जिन्नस, बिछाईत, खजीना व कापड बेमुहिन[71] सांपडलें. मोठें झुंज करून फत्ते केली. रण दुतर्फा अपार पडलें.

यानंतर फत्तेची खबर [लिहून] राजियाकडे जासुदाबरोबर पत्रें पाठविलीं. त्यानीं जाऊन वर्तमान सांगितलें. त्याजवरून राजे बहूत संतोष पावून खुशाल जाले. हुसेनखानाचा भाऊ किल्ले कोपल येथें होता त्याशीं राजकारण मोरोपंत पेशवे यानीं केलें आणि कोपल घेतलें. कोपल म्हणजे दक्षणचा दरवाजा. तक्ताची जागा. असा किल्ला घेतला. मोठें स्थळ प्राप्त जाहालें. कोपल म्हणजे तुंगभद्रेचे कांठीं. तुंगभद्रा पावेतों देश हस्तगत जाहाला. कोपळीं[72]-करितां कनकगिरी, हरपनहल्ली, रायदुर्ग व चित्रदुर्ग व विद्यानगर, बुं दी कोट[73] बाजे पाळेगार [ रुजू ] जाले. असें कार्य जालें.

यानंतर पुढें दिल्लीहून बहाँदूरखान[74], देखील-हरोल दिलेलखान, हे फौजेनिशीं अमदानगरास येऊन राहिले. हें वर्तमान राजियास कळलियावर राजियानीं गड कोट किल्ले यांस खबर केली आणि मजबुतीनें राहिले. मग जासूद पत्रें नबाब बहादूरखान यांजकडे गुप्तरूपें पाठविलीं. "हरद्र[75] सोधावें, पुढें तजवीज करणें ती करावी," असें केलें. आणि राजियांनीं आपलें लष्करास हुकूम करून, हंबीरराव सरनौबत फौज घेऊन मोंगलाईत शिरले.

७१. "बेमुबलक" सा० प्रत. ७२. 'कोपल हस्तगत करितां' सा० प्रत. ७३. 'बुंडीकोट' सातारा प्रत. ७४. बहादूरखान इ०—मागें पृष्ठ ७५।७६ पाहा. ७५. 'हरिद्र ध्यावें' सातारा प्रत.

खानदेश, बागलाण, गुजराथ, अमदाबाद, बऱ्हाणपूर, वऱ्हाड, माहूर वरकड देश नर्मदा पावेतों, देखील-जालनापूर, या देशांत स्वारी करून, मुलूख मारून, खंडणी करून जप्त केला. मालमत्ता अगणित जमा करून चालिले. तों बहादूरखान यांनीं कुल जमाव घेऊन हंबीररायाचे पाठीवर चालून आले. राजियाची फौज तोलदार गांठली. मोंगल बहूत धास्तीनें घाबिरा होऊन सात आठ गांवचे अंतरानें चालिला. दिलेलखान उतावळा होऊन फौजेशीं गांठ घातली. हंबीरराव यांनीं दिलेलखान नजरेंत धरिला नाहीं. तोलदारीनें मत्ता घेऊन आपले देशास आले. मालमत्ता राजियास दिली.

पुढें वेदमूर्ति राजेश्री गागाभट म्हणून वाराणशीहून राजियाची कीर्ती ऐकून दर्शनास आले. भट गोसांवी, थोर पंडित, चार वेद साहा शास्त्रें योगाभ्याससंपन्न, ज्योतिषी, मांत्रिक, सर्व विद्येनें निपुण, कलयुगींचा ब्रह्म-देव, असे पंडित—त्यांस राजे व सरकारकून सामोरे जाऊन, भेट घेऊन सन्मानें आणिलें. त्यांची पूजा नाना प्रकारें रत्नखचित अलंकार, पालखी, घोडे, हत्ती देऊन द्रव्यही उदंड देऊन पुजिलें. गागाभट बहूत संतुष्ट जाले. भट गोसांवी यांचे मतें, मुसलमान बादशाहा तक्तीं बसून, छत्र धरून, पातशाही करितात, आणि शिवाजी राजे यांनींही चार पादशाही दबाविल्या आणि पाऊण लाख घोडा लष्कर गड कोट असें [ मिळविलें ] असतां त्यांस तक्त नाहीं, याकरितां मऱ्हाठा राजा छत्रपती व्हावा असें चित्तांत आणिलें. आणि [ तें ] राजियासही मानिलें. अवघे मातबर लोक बोलावून आणून विचार करितां सर्वांचे मनास आलें. तेव्हां भट गोसांवी म्हणूं लागले कीं, तक्तीं बसावें. तेव्हां राजियाचे वंशाचा शोध करितां राजे शुद्ध क्षत्री शिसोदे उत्तरेहून दक्षिणेस एक घराणें आलें, तेंच राजियाचें घराणें असें शोधिलें. उत्तरेचे क्षत्रियांचे व्रतबंध होतात त्याप्रमाणें व्रतबंध करावा. हा विचार आधीं करून भट गोसावी यांनीं राजियाचा क्षेत्रीं व्रतबंध केला. शुद्ध क्षत्रिय आधीं केला. अपार द्रव्य धर्म केला. कुल आपले देशांतून पर देशांतून पन्नास[७६] सहस्त्र वैदिक ब्राह्मण थोर थोर क्षेत्रींहून मिळाले. तो सर्वही समुदाय

---

७६. 'पन्नास सहस्त्र' हे शब्द प्र० गड प्रतींत मात्र आहेत.

राहून घेतला. प्रत्यहीं मिष्टान्न भोजनास घालूं लागले.[77] पुढें तक्तारूढ व्हावें [म्हणून] तक्त सुवर्णाचें, बत्तीस मणाचें, सिद्ध करविलें. नवरत्नें अमोलिक जितकीं कोशांत होतीं त्यामध्यें शोध करून मोठीं मोलाचीं रत्नें तक्तास जडाव केलीं. जडित सिंहासन सिद्ध केलें. रायरीचें नांव 'रायगड' म्हणोन ठेविलें. तक्तास स्थळ तोच गड नेमिला. गडावरि तक्तीं बसवावें असें केलें. सप्त महानदियांचीं उदकें व थोर थोर नदियांचीं उदकें व समुद्रांचीं उदकें, तीर्थ क्षेत्र नामांकित तेथील तीर्थोदकें आणिलीं. सुवर्णाचे कलश केले व सुवर्णाचे तांबे केले. आठ कलश व आठ तांबे यांनीं अष्ट प्रधानांनीं राजियास अभिषेक करावा असा निश्चय करून, सुदिन पाहून मुहूर्त पाहिला. शालिवाहन शके १५९६ ज्येष्ठमासीं शुद्ध १३ स मुहूर्त पाहिला. ते दिवशीं राजियांनीं मंगलस्नानें करून श्रीमहादेव व श्रीभवानी कुलस्वामी, उपाध्ये प्रभाकर भटाचे पुत्र बाळंभट कुलगुरू व भट गोसांवी, वरकड श्रेष्ठ भट व सत्पुरुष अनुष्ठित, यांची सर्वांची पूजा यथाविधी अलंकार वस्त्रें देऊन [केली.] सर्वांस नमन करून अभिषेकास सुवर्ण-चौकीवर बसले. अष्ट प्रधान व थोर थोर ब्राह्मणांनीं स्थळोस्थळचीं उदकें करून सुवर्ण-कलशपात्रीं अभिषेक केला. दिव्य वस्त्रें, दिव्य अलंकार घेऊन, सर्व पूज्य मंडळीस नमस्कार करून सिंहासनावर बसले. कित्येक नवरत्नादिक सुवर्ण-कमळें व नाना सुवर्ण-फुलें, वस्त्रें उदंड दिधलीं. दानपद्धतीप्रमाणें षोडश महादानें इत्यादिक दानें केलीं. सिंहासनास अष्ट खांब जडित केले त्या स्थंनीं[78] अष्ट प्रधानांनीं उभें राहावें. पूर्वीं कृतायुगीं, त्रेतायुगीं, द्वापारीं, कलयुगाचे ठायीं पुण्यश्लोक राजे सिंहासनीं बैसले, त्या पद्धतीप्रमाणें शास्त्रोक्त सर्वही साहित्य सिद्ध केलें. अष्ट खांबीं अष्ट प्रधान उभे राहिले. त्यांचीं नांवें बितपशील:—

१ मोरोपंत, त्रिंबकपंताचे पुत्र, पेशवे, मुख्यप्रधान.

१ हंबीरराव मोहिते सेनापती.

१ त्रिंबकजी सोनदेवं[79] डबीर,

---

७७. पुढील मिती प्र० प्रत देत नाहीं. महाड प्रत देते. ७८. 'स्तंभीं' म० प्रत. ७९. 'त्रिंबक सोनदेव होते त्यांचें पुत्र रामचंद्रपंत डबीर' म० प्रत 'डबीर जनार्दनपंत हनुमंते, सुमंत' ग्रांट डफ व चिटणीस.

१ नारो[८०] निळकंठ व रामचंद्र निळकंठ मुजुमदार, यांचें नांव अमात्य.

१ अण्णाजीपंत[८१] सुरनीस, यांचें नांव सचिव.

१ दत्ताजी त्रिंबक वाकनीस, यांचें नांव मंत्री.

यांचें पुत्र रामचंद्रपंत, सुमंत.

१ रावजी[८२] पण्डितराव होते त्यांचे पुत्रास रायजीराज [?]

१ निराजी रावजी[८३] यांस न्यायाधिशी.

येणेंप्रमाणें संस्कृत नांवें ठेविलीं. अष्ट प्रधानांचीं नांवें ठेविलीं ते स्थळें नेमून उभे केले. आपापले स्थळीं उभे राहिले. बाळ प्रभू चिटनीस व नीळ प्रभू पारसनीस वरकड अष्ट प्रधानांचे मुतालीक व हुजरे, प्रतिष्ठित सर्वही यथाक्रमें पद्धतीप्रमाणें सर्वही उभे राहिले. छत्र जडावाचें मोतीलग झालरीचें करून मस्तकावर धरिलें. छत्रपती असें नांव चालविलें. कागदीं पत्रीं स्वस्तिश्री [राज्याभिषेक] शक, सिंहासनावर बसले त्या दिवसापासून नियत चालविला. पन्नास सहस्र ब्राह्मण वैदिक मिळाले. या वेगळे तपोनिधी व सत्पुरुष, संन्यासी, अतिथी, मानभाव, जटाधारी, जोगी, जंगम नानाजाती मिळाले. तितक्यांस चार मास मिष्टान्न उलफे[८४] चालविले. निरोप देतां पात्र पाहून द्रव्य, अलंकार, भूषणें, वस्त्रें अमर्याद दिधलीं. गागाभट मुख्य अध्वर्यू, त्यांस अपरमित द्रव्य दिलें. संपूर्ण खर्चाची संख्या एक क्रोड बेताळीस लक्ष होन जाले. अष्ट प्रधानांस लक्ष लक्ष होन बक्षीस दर असामीस, त्या खेरीज एक एक हत्ती, घोडा, वस्त्रें, अलंकार असें देणें दिलें. येणेंप्रमाणें राजे सिंहासनारूढ जाले. या युगीं सर्व पृथ्वीवर म्लेंच्छ बादशाहा. मऱ्हाटा पातशाहा येवढा छत्रपती जाला. ही गोष्ट कांहीं सामान्य जाली नाहीं.

---

८०. नारो नीळकंठ हुशार नव्हता म्हणून पद त्याच्या नांवें देऊन कारभार धाकटा बंधू रामचंद्रपंत याजकडून घेऊं लागले. ८१. 'अनाजी दत्तो' म० प्र०. ८२. रघुनाथ पंडितराव त्यांचे पुत्र दानाध्यक्ष' म० प्र०. 'रघुनाथपंत पंडितराव' ग्रांट डफ. ८३. 'बाळाजी सोनदेव' ग्रांट डफ. ८४. उलफा= (नेमणूक) न शिजविलेलें धान्य, शिधा.

हीं वर्तमानें बहादूरखान कोकॉं[८५] यासि कळलीं. त्यानें पुढें पेडगांव भीमातीर येथें येऊन छावण्या केल्या. आणि दिल्लीस पातशाहास हें वर्तमान सिंहासनाचें लिहिलें. पातशाहास कळून तक्तावरून उतरून अंतःपुरांत गेले. आणि दोन्ही हात भुईस घांसून, आपले देवाचें नांव घेऊन परम खेद केला. दोन दिवस अन्न उदक घेतलें नाहीं. आणि बोलिले कीं, " खुदानें मुसलमानाची पादशाई दूर करून, तक्त बुडवून मराठियास तक्त दिलें. आतां हद्द जाली!" असो, बहूत खेद, दुःखाचे पर्वत मानिले. मग मोठे मोठे वजिरांनीं नानाप्रकारें समाधान करून आणा खुणा घालून तक्तावर बसविलें. ऐसेंच विजापूरचे पातशाहास व भागानगरचे पातशाहास वरकड सर्वांस वर्तमानें कळून खेद जाहाला. रूमशाम, इराण, तुराण व दर्यांतील[८६] पातशाहांस खबर कळून मनांत खेद करूं लागले. खेद करून आशंका मानिली. ये जातीचें वर्तमान जाहालें.

पुढें राजे तक्तीं बसून राज्यभार करूं लागले. निजामशाही देश काबीज केला व मोंगलाईही जप्त केली. भागानगरच्या बादशाहांनीं राजे यांशीं सला करून, निराजीपंताचे पुत्र प्रल्हादपंत मोठे बुद्धिवंत यांस हेजिबीस ठेवून घेऊन, करभार राजियास देऊन स्नेहांत मिळाले. वरकड किरकोळीं राज्यें होतीं तीं घेतलीं. कितीएकांनीं करभार देऊन अंकित होऊन राहिले. तुंगभद्र देशापासून कावेरीपर्यंत कर्नाटक साधावें, हा हेत मनांत धरिला. त्यास लष्कर पाठवून साधावें, तरि दिवसगतीवर पडतें. म्हणून खुद्द राजियांनीं आपण जावें असें केलें. त्यास पेडगांवीं बहादूरखान गनीम पाठीवर येईल म्हणून निराजीपंत न्यायाधीश पाठविले. कित्येक द्रव्य अलंकार [ भूषणें ] रत्नखचित पाठविलीं. त्यास अंतरंगें सख्य [करून] "एक वर्षपर्यंत आपणास कर्नाटक साधावयास लागेल, तुम्हीं राज्यास उपद्रव न

---

८५. मागें पृष्ठ ७६ व ८१ पाहा. ८६. दर्यांतील बादशाह म्हणजे 'युरोपियन लोक.' ह्या दर्यांतील बादशाह्या २७ किंवा २२ होत्या असें मानीत असत. मागें पृष्ठ ६७ पाहा. तेथें फिरंगी, वलंदेज इ० २७ पादशाह्या असें आलें आहे.

करणें," असें त्यास सांगून ठायीं ठेविलें. आणि कर्नाटकास जावयास समागमें निवडून पागे पतके पंचवीस हजार स्वार व सरकारकून रघुनाथ नारायण व जनार्दन नारायण हे कर्नाटकचे माहितगार यांस बरोबर घेतलें. वरकड पेशवे व सुरनीस व वाकनीस वरकड लष्कर राज्यास रक्षणास ठेविलें. आणि विचार केला कीं, "कर्नाटक साधावयास द्रव्य लागेल त्यास खजिन्यांतील द्रव्य वेंचूं नये. नूतन मिळवावें आणि वेंच करून देश साधावा." असा विचार करितां भागानगरचे पातशाहींत द्रव्य उदंड आहे. तेथें निष्ठुरता करून द्रव्य मेळवावें, तरि वर्षास करभार भागानगरकर देतात. तेथें निष्ठुरता करूं नये. सख्य करून त्यांची भेट घ्यावी. भेटीनंतर सर्वही अनुकूळ करून देतील. असा विचार करून भागानगरीं प्रल्हादपंत हेजीब राजियाचे होते त्यांसि हें वर्तमान लिहून भेट घ्यावी हा विचार केला. तानाशाहा पातशाहा भागानगरकर यांनीं मनांत बहूत शंका धरिली कीं, "जैसा अफजलखान बुडविला, कीं शास्ताखान बुडविला, दिल्लीस जाऊन अलमगीर पातशाहास पराक्रम दाखविला, ऐसा एखादा अनर्थ जाहाला तर काय करावें ? भेट मात्र राजियाची न घ्यावी. जें मागतील तें देऊं," असें बोलिला. मग पातशाहाशीं व अकंणापंत व मादंणापंत कारभारी यांशीं प्रल्हादपंतें आण, शपथ, क्रिया बहूत दिधल्या. अपाय नाहीं, स्नेहाची भेट घेऊन जातील, अशी बळकटी केली.

येणेंप्रमाणें राजियाशीं घटाई केली. उभयतांच्या भेटी व्हाव्या ऐसा नेम करून मग राजे मजल दरमजल लष्कर घेऊन भागानगरास चालिले. भागानगरची विलायत लागल्यावर ताकीद केली. एक काडी रयतेची तसनस न व्हावी ऐसें केलें. कित्येक गर्दाना मारून जाबता बसविला, आणि

८७. रघुनाथ नारायण हनुमंते ह्याचें व व्यंकोजीचें बनेना म्हणून तो तंजावराहून शिवाजीकडे आला होता. जनार्दनपंत आधींच शिवाजीचा सुमंत प्रधान झाला होता. ८८. म्हणजे 'हैदराबाद.' ८९. विलायत = मूळ देश, स्वतःचा देश. येथें, भागानगरचा मुलूख. ९०. जाबता = धाक.

मजलीस जाऊन तेथें खुष-खरेदी सर्व पदार्थ घेऊन चालिले. लूट नाहीं. असे जातां पुढें पातशाहास खबर कळून बहूत संतुष्ट जाहाला. पातशाहा पुढें दोन चार गांव सामोरे यावे असें केलें. राजा मोठा साधक, आण घालून पातशाहास सांगून पाठविलें कीं, " तुम्हीं न येणें. आपण वडील भाऊ, मी धाकटा भाऊ. आपण पुढें न यावें." असें सांगून पाठविल्यावरि पातशाहा बहूत संतुष्ट जाहाले. आणि मादंणापंत व अकंणापंत म्हणजे ब ज या [?] पातशाहा, सर्व पातशाही [मध्यें] धणी, हे उभयतां पुढें येऊन, राजियास घेऊन शहरास गेले. राजियांनीं आपले लष्करास कुल जरी सामान केलाच होता. सुमुहूर्त पाहून पातशाहाचे भेटीस नगरामध्यें चालिले. पातशाहांनीं कुल नगर शृंगारिलें. चौफेरी बिदीस कुंकुम-केशराचे सडे रंगमाळा घातल्या. गुढिया, तोरणें, पताका, निशाणें नगरांत लाविलीं. नगर-नागरिक लोक कोट्यानकोटी राजा पाहावयास उभे राहिले. नारींनीं मंगळ-आर्त्या अगणित उजळून राजियास वंदिलें. सोनें-रुपियाचीं फुलें राजियांवरि उधळलीं. राजियांनीं लोकांस खैरात द्रव्य वस्त्रें अगणित दिलीं, आणि सर्व सैन्यासहित‡ दाद-महालास पावले. पातशाहास " खालते उतरूं नका, आपण खासा येतों " म्हणून शफत घालून सांगून पाठविलें. पातशाहा महालावरि राहिले. राजियांनीं आपले लष्करचे लोक कंबरबंदी करून महालांखालीं बसविलें आणि शिडीवरून चालिले. खासा राजा व *जनार्दन नारायण व प्रल्हादपंत व सोनाजी नाईक दौलतबंकी[९३] व बाबाजी ढमढेरे[९४] पांचजण चढले. महालांत गेले. पादशाहा पुढें येऊन क्षेम आलिंगन केलें. उभयतां एकासनीं बसले. मादंणापंत व अकंणापंत व जनार्दनपंत, प्रल्हाद-पंत, सोनाजी नाईक बंकी व बाबाजी ढमढेरे असे होते. पादशाहा व राजे

---

९१. 'पुष्पें बलायत दूर केली' म० प्रत. ‡ दाद-महाल=न्यायमंदिर ९२. 'जिन्याखालीं' म० प्रत. * येथें 'रघुनाथ नारायण' असें असावें. जनार्दनपंत देशीं राहिला होता. ९३. "दौलद्बंकी महाद्वारपाल इत्यभिधीयते" राज व्य० कोश. महाड प्रतीचा पाठ. 'सोमाजी नाईक हकीम' असा आहे. ९४. 'बाजी ढांसरे' महाड प्रत.

व मादंणापंत त्रिवर्ग बसले, वरकड उभे राहिले. उभयतांचा स्नेह अतिशय. बोलणें जालें. पातशाहांच्या स्त्रिया झरोकियांतून जाळपांलांतून[९५] राजा पाहातां बहूत थक्क जहाल्या. पादशाहाही बहूत खुशाल जाहाले. एक प्रहर बसून राजियाच्या पराक्रमाच्या गोष्टी ऐकिल्या. कित्येक अलंकार रत्नजाडित व वस्त्रें, हत्ती, घोडे राजियास व राजियाकडील लोकांस सर्वांस देऊन निरोप दिला. राजे व पातशाहा महालाखालीं येऊन राजे आपल्या स्थळास चालिले.

महालाखालीं रघुनाथ[९६]पंत व हंबीरराव वरकड सरदार लष्कर ठेविले होते, त्यांसही समागमें घेऊन आपले जागियास आले. मार्गीं येतां नगरलोकांस खैरात केली. राजे उठोन गेलियावरि पादशाहाचें समाधान जालें कीं, राजा प्रामाणिक, आपल्यास रक्षिलें, क्रिया जतन केली. ऐसें आश्चर्य मानून प्रल्हादपंतास कित्येक बाक्षिसें पादशाहांनीं दिलीं कीं, तुम्ही प्रामाणिक, [असें] म्हणून नांवाजून राजियाकडे पाठविलें.

दुसरे दिवशीं मादंणापंतीं राजियास आपले घरास मेहेँ[९७]मानीस नेलें. आणि आपले मातोश्रीचे हातीं पाक* सिद्ध करून मादंणापंत व अकंणापंत जवळ बसून राजियास भोजन घातलें. वरकड राजियाकडील समुदाय् होता त्यासही भोजनास घातलें. आणि अलंकार, वस्त्रें, हत्ती, घोडीं देऊन स्थळास पोहोंचविलें. पातशाहांनीं मादंणापंतास बोलावून नेऊन विचारलें कीं, "राजियास काय पाहिजे तें देऊन, राजियास संतुष्ट करून निरोप द्यावा." असा विचार करून सुमुहूर्त पाहून मागती राजे भेटीस आणिले, आणि जडजवाहीर रत्नाचे अलंकार, हत्ती, घोडे अपरमित दिधले. कुल सरकारकून व हंबीरराव व वरकड सरदार यांचे मुजरे महालावरि उभयतां छत्रपती बैसून, मुजरे घेऊन, सरदारांचे पराक्रम नांव पाहून, सर्वांस अलंकार वस्त्रें हत्ती, घोडे, मनुष्य पाहून दिधले. आणि पातशाहा बोलिले

---

९५. जाळीचें वस्त्र, पडदा. 'जाळ्या लावून' म० प्र०. ९६. 'रघुनाथ नारायण हणवीर' म० प्रत. ९७. मेहमानी=पाहुणचार. 'मेहमानी तु आतिथ्यं' राजव्यवहार कोश. *पाक = सैंपाक.

कीं, " सर्वांप्रसंगीं आपणांस तुम्हीं सहाय असावें." ऐशी बळकटी करून, राजियाची आण शपथ घेऊन निरोप दिला. प्रतिवर्षी करभार जो देणें तो येणेंप्रमाणें देऊन, प्रल्हादपंत नेहमीं आपणाजवळ ठेऊन आपले निजवतीनें आमचेजवळ असों देणें, ऐसें बोलिले. राजे आपले स्थळास आले.

त्या उपरि, राजियास भागानगरचे मोठमोठ्या सरदारांनीं मेहमान्या केल्या. ऐसे एक महिनाभर भागानगरीं होते. तेथील द्रव्य वस्तभाव घेऊन चंदीकडे सेनासमुदाय घेऊन चालिले. मग श्रीशैल्यास आले. नीळगंगेचे स्नान करून श्रीचें दर्शन जालें. तीर्थविधी जाला. राजियांनीं स्थळ देखोन परम आनंद जाला कीं, केवळ कैलास दुसरें, असें स्थळ वाटलें. तेथें हें देह श्रीस अर्पण करावें, शिरकमल वाहावें, ऐसें योजिलें. [ ते ] समयीं श्रीभवानी अंगांत आविर्भवली आणि बोलली जे, " तुज ये गोष्टी" मोक्ष नाहीं. हें कर्म करूं नको. पुढें कर्तव्यही उदंड तुझे हातें करणें आहे." असें सांगून श्री गेली. हें वर्तमान सावध जाल्यावरि राजियास कारकुनांनीं सांगितलें. मग श्रीस शिरकमल वाहावें हा विचार राहिला.

पुढें कर्नाटकचा देश साधावा म्हणोन चंदीस वेढा घेतला. चंदीमध्यें खानखान विजापूरकरांचा वजीर याचे पुत्र रूपलखान व नासरीखान[1] हे उभयतां होते. त्यांस राजकारण करून, त्यांस कौल देऊन, बाहेर काढिलें आणि स्थळ साध्य केलें. त्रिमल[2] महाल म्हणून आहे तेथें शेरखान विजापूरचा वजीर पांच हजार स्वारांनिशीं होता. पठाण तोलदार, हत्ती सामान द्रव्य अगणित होतें. तो राजावर चालून आला. त्याशीं युद्ध करून त्यास बुडविला. जिवंत खासा शेरखान धरिला. पांच हजार घोडे व बारा हत्ती पाडाव केले. द्रव्य जवाहीरही अपार हस्तगत जालें. मोठें युद्ध केलें. असें कर्म करून[3] त्रिमल महाल फत्ते केला.

---

९८. 'श्री शैल-मल्लिकार्जुन' हें बारा ज्योतिर्लिंगांपैकीं एक होय. ९९. ये गोष्टी = या गोष्टीनें. १. " रुद्लखान व नासीर महमदखान " महाड प्रत. २. 'त्रिवादी' म० प्रत, ३. 'असें कर्म जालें.' म० प्रत. वरील पाठ महाड प्रतीचा.

त्या उपरि राजश्री व्यंकाजी राजे, धाकटे भाऊ राजियाचे, यांनीं चंदावरचें राज्य साध्य करून राज्य करीत असत. त्यांनीं आपले कारकून होते ते समागमें घेऊन राजियाचे भेटीस आले. भेट बंधूबंधूंची जाली. *एकाजी राजाचे कारकून काकाजीपंत पेशवे भेटले व कोन्हेर महादेव मुजूमदार भेटले. जगंनाथपंत, व्यंकाजी दत्तोचे पुत्र, सर्व सैन्य भेटलें व भिवजी राजे व प्रतापजी राजे नाटकशाळेचे पुत्र महाराजांचे होते, तेही भेटले. बहूत संतोष जाला. उभयतां बंधूंची मेहमानी परस्परें जाली. देणेंही उभयतांनीं उदंड दिलें. आठ दिवस एकत्र होते. मग राजियांनीं व्यंकाजी राजे यांसि प्रश्न केला कीं, " महाराज तुमचे आमचे पिते. आपण त्यांजकडून निरोप घेऊन पुण्याकडे जाऊन येवढें राज्य साधिलें. कीर्त केली. ऐशियासि वडिलांची बारा बिरदें तुम्हांजवळ आहेत. तीं तुम्ही चालवीतच आहां. ऐशियास आपण वडील पुत्र आणि पराक्रमी, तुम्हांहून पराक्रम विशेष केला. बारा बिरदें मात्र तुम्हांजवळ आहेत तीं आपणास देणें. आपण चालवूं. नवीं बिरदें करावयाची काय आशंका आहे ? परंतु वडिलांचीं हातचीं आहेत तेवढीं आपणाजवळ असावीं म्हणून मागितलीं." त्याजवरून त्यांनीं विकल्प चित्तांत आणून दिलीं नाहींत. त्याजवर एकाजी राजे यांच्या कारकुनांनीं व कारभारी यानीं त्यांचे पोटांत भय घातलें कीं, राजे तुम्हांशीं खटखट करून बिरदें जोरावारीनें घेतील. असें सांगून, त्यांस धास्त उत्पन्न करून रात्रीचे वेळेस व्यंकाजी राजे पळून चंदावरास बिरदें घेऊन गेले.

त्यास दुसरे दिवशीं राजियास वर्तमान कळलें कीं, व्यंकाजी राजे पळून गेले. त्याजवरून आश्चर्य केलें कीं, " काय निमित्य पळाले? आम्ही त्यांस धरीत होतों कीं काय ? आम्हांस बिरदें काय करावयाचीं? आमचीं बिरदें अष्ट दिशेस लागलीं आहेत. समुद्रवलयांकित भूमंडळीं कीर्त आपली जाली आहे. तेथें बिरदें काय करावयाचीं? वडलांची वस्त असावी म्हणून मागितलीं

---

* एकाजी = व्यंकाजी. ४. नाटकशाळा = उपस्त्री, राख. ५. शाहाजीचे.

होतीं. पळावयाचें नव्हतें. द्यावयाचीं नव्हतीं तरि न देणें. उगेच उठून पळून गेले. अति धाकटे ते धाकटे, बुद्धीही धाकटेपणा योग्य केली." असें बोलिले. मग त्यांचे कारकून व सरदार पळत होते ते राजियाच्या लोकांस सांपडले. त्यांस धरून आणिलें. मग त्या अवघियांस वस्त्रें भूषणें, अश्व देऊन चंदावरास बंधूसंनिध पाठविलें. संताजी राजे म्हणून महाराजांचे नाटकशाळेचे पुत्र होते. ते शूर परक्रमी होते. ते राजियाच्या भेटीस आले. भेट जाली. त्यांस कर्नाटकांत हजार घोड्यांची दौलत दिधली. महाल मोकाशे दिले. हत्ती, घोडे, वस्त्रें देऊन रवाना केले. आणि येलूरकोट[६] यामध्यें इदलशाई ठाणें होतें. तो कोट म्हणजे पृथ्वीवर दुसरा गड असा नाहीं. कोटांतजीत पाणियाचा खंदक. पाणियास अंत नाहीं असें. उदकांत दाहा हजार सुसरी. कोटाचे फांजियांवरून[७] दोन गाडिया जोडून जावें ऐशी मजबुती. पडकोट[८] तरि चार चार फेरियावरि फेरे. ये जातीचा कोट. त्या कोटास वेढा घालून कोट घेतला. वरकडही जागां जागां गढी कोट घेतले. कित्येक नवे वसविले. असे शंभर कोट त्या प्रांतीं केले. वीस[९] लक्ष होनांचें राज्य साध्य केलें. चंदी म्हणजे जैसें विजापूर, भागानगर, तैसाच तक्ताचा जागा. येथें राजियांनीं राहावें. परंतु इकडेही राज्य उदंड. त्याचें संरक्षण जालें पाहिजे. याजकरितां चंदीस रघुनाथ नारायण ब्राह्मण त्यास मजमू संपूर्ण राज्याची सांगितली, आणि त्यास तो प्रांत स्वाधीन करून चंदीस ठेविलें. त्यापाशीं तूर्त फौज असावी म्हणून हंबीरराव सेनापती सेनेसहित ठेविले. आणि राजियांनीं आनंदराव व मानाजी मोरे हे दोघे सरदार फौजेनिशीं बराबर घेऊन चंदीहून निघाले. घाट चढून वरतें आले. कोल्हार, बाळापूर हे कोट घेतले. देश काबीज केले. कित्येक गड वसविले. पुंडपाळेगार मारून गर्दीस मिळविले. त्या प्रांतीं रंगो नारायण म्हणून कारकून सरसुभेदार ठेविले.

---

६. येलूर=वेलोर. ७. 'सफेली' म० प्रत. 'प्राकारवेदिका फांजिः' राज० व्य० कोश. ८. 'पडकोठस्तथासद्भिः प्राकारवलयं स्मृतं' रा० व्य० कोश. ९. 'बारा लक्ष' म० प्रत.

तोही प्रांत रघुनाथपंताचे स्वाधीन केला. कोल्हार प्रांतें मानाजी मोरे सरदार फौजेनिशीं ठेविले आनंदराव राजियांनीं बराबर घेऊन कोपलास आले. तेथून लक्ष्मेश्वरास आले[१०]. तेथून मजल दरमजल संपगांव प्रांतीं आले. बलवाडा म्हणून कोट होता. तेथें देसाईण बायको होती. तिनें राजियाचे लष्करचें कहीकाबाडी[११] बैल नेले. हें वर्तमान राजियास कळलें. बलवाडास वेढा घातला. कोट घेऊन देसाईण धरिली. तीस शिक्षा केली. मग पुढें पन्हाळियास आले, आणि राज्याचाही परामृर्ष[१२] केला. मग राजे आले हें वृत्त सर्वांस कळलें. त्याजवरून निराजीपंत बहादुरखाना[१३]जवळ ठेविले होते, तेही दर्शनास आले, व खानांनींही जडजवाहीर, वस्त्रें राजियासि पाठविलीं.

त्या उपरि, कर्नाटकांत हंबीरराव फौजेनिशीं व रघुनाथ नारायण ठेविले होते हें वर्तमान व्यंकाजी राजे यांस कळोन राजियांनीं आपली फौज व पाळेगारांची फौज मिळविली, आणि हंबीरराव यावरि चालून आले. ते समयीं हंबीरराव याचे चौगुणी* घोडा राऊत हशम अगणित व्यंकाजी राजे यांचे होते. मग यांस त्यांस युद्ध जालें. मग राजियाचा पुण्यप्रभाव अधिक आणि भाग्योदय, हंबीरराव यांनीं व्यंकाजी राजियाची फौज मोडली. मोठें युद्ध जाहालें. अगणित रण पडलें. आणि व्यंकाजी राजियाचे चार हजार घोडे पाडाव केले. व हत्ती जड-जवाहीर बाजे सरदार भिवजीराजे व प्रतापजी राजे वरकडही नामांकित लोक पाडाव केले. अशी फत्ते केली. यश आलें. आणि पाडाव केले सरदारांस वस्त्रें देऊन सोडिलें. यावरि रघुनाथपंत व हंबीरराव चालोन चंदावराकडे गेले. मग व्यंकाजी राजे यांनीं सभ्य मनुष्य मध्यस्त घालून सख्य करावें असें जालें. त्याजवर रघुनाथपंतीं व हंबीररायांनीं राजियाकडे जासूद पत्रें देऊन पाठविले. मग राजियास वर्तमान कळोन या उभयतांस

---

१० याच्या पुढें 'लक्ष्मेश्वरचा किल्ला वेढा घालून घेतला. खान गौडा देसाई यास धरून शिक्षा केली.' असें म० प्रत लिहिते. ११. 'कहीकाबाडी = लांकूड-फांटें, दाणा वैरण नेणारे. १२. 'परामर्ष' हा शब्द पूर्वी असा लिहीत असत. १३. मागें पृष्ठ ८५ पाहा. *चौगुणी = चौपट.

उत्तर पाठविलें कीं, "व्यंकाजी राजे आपले धाकटे बंधू आहेत. मूलबुद्धी केली. त्यास तोही आपला भाऊ, त्यास रक्षणें. त्याचें राज्य बुडवूं नका." अशीं उत्तरें आलियावरि उभयतांनीं व्यंकाजी राजे यांशीं सला केला. आणि द्रव्यही उदंड घेतलें. मग रघुनाथपंतीं हंबीरराव यास लष्कर सहवर्तमान निरोप देऊन राजियाकडे पाठविलें. आणि रघुनाथपंत आपण तिकडे कर्नाटकांत फौज दाहा हजार स्वार पागा व शिलेदार जमा करून तें राज्य रक्षून राहिले.

हंबीरराव याची व राजियाची भेट जाहाली. कित्येक नांवाजिलें बक्षिसें दिलीं. आणि पुढें खासा राजियांनीं अवघें लष्कर घेऊन जालनापूर मोंगलाईंत त्यास वेढा घातला. पेठा मारिल्या. शहर लुटून फन्ना केलें. अगणित द्रव्य, सोनेंरुपें, जडजवाहीर, कापड, घोडे, हत्ती, उंटें फरत केलीं. मोंगलांची[१४] फौज [ घेऊन ] रणमस्तखान चालोन आला. युद्ध जालें. सिदोजी निंबाळकर राजे यांजकडील पांच हजार फौज, तीन दिवस युद्ध केलें. रणमस्तखान यासि कैद करून आणिला. त्यासि बुडवावें तों त्याचे कुमकेस केसरसिंग व सरदारखान व बाजे उमराव असे वीस हजार फौज तीन कोसांवर राहिली. मग केसरसिंग यानें अंतरंगें सांगून पाठविलें कीं, उभय पक्षीं भाऊपणा आहे. आमची गांठ पडली नाहीं तोंवर तुम्हीं कूच करून जाणें. हें वर्तमान कळतांच राजे तेथून निघाले. लष्कर, जडगिरी मार्गानें जावें अशी तजवीज केली. ते समयीं बहिरजी जासूद यानें कबूल केलें कीं, " मोंगलांची गांठ न पडतां लष्कर घेऊन ठिकाणास जातों. साहेबीं फिकीर न करणें." तीन रात्री खपोन रात्रंदिवस अवकाश

---

१४. " मोंगलाच्या फौजा, रणमस्तखान व केशर सिंग बडा, व लष्कर खान व बाजेउमराव अशा फौजा पंचवीस तीस हजार चालून आले. त्यांशीं व राजियाचे फौजेशीं युद्ध बहूत जाहलें. मोगल नामोहेरम करून हत्ती, घोडे पाडाव केले. गनिमाचे वजीर निघोन गेले. ते वक्तीं सिदोजी निंबाळकर पंच-हजारी वजीर राजियाचा पडला. पुढें छावणीचे दिवस. फौजाही निघोन देशास आल्या. राजे पुरंधरास आले." पाठांतर.

न करितां पा व गड येथें लष्कर घेऊन आला. राजे बहिरजी नायकावर खुशाल झाले. त्याजकडे फाजील होतें तें माफ करून आणखीही बक्षीस दिलें. तेथून सावकास लष्कर घेऊन राजे पुरंदरास आले.

इतकियांत संभाजीराजे राजियाचे पुत्र ज्येष्ठ राजियावर रुसून मोंगलाईत गेले. ते जाऊन दिलेलखानास भेटले. मग त्यांनीं बहूत सन्मान करून चालविलें. पातशाहास दिल्लीस दिलेलखानानीं लिहून पाठविलें कीं, " राजियाचा पुत्र संभाजी राजा रुसून आपणाजवळ आला आहे. त्यास गौरव करून आम्हीं ठेवून घेतला आहे. तर पादशाहानीं मेहरबान होऊन त्यास *नांवाजावें म्हणजे राज्यांत दुई होईल. राज्यांतील लष्कर उठोन आपोआप येईल आणि किल्ले कोट साधतील," म्हणून लिहिलें. त्याजवरून पादशाहांनीं विचार केला कीं, " राजियाचा पुत्र आला आहे, त्यास नांवाजितां पातशाहींत फितवा करून पातशाही बुडवितील.नांवाजूं नये.हुजूर आणून कैदेंत ठेवावा." ऐसा विचार करून दिलेलखानास लिहून हुकूम पाठविला कीं, संभाजी राजियास घेऊन हुजूर येणें. असें लिहिलें. तों अगोदर दिलेलखानाचा वकील पातशाहाजवळ होता, त्यानीं हें वर्तमान खानास लिहून पाठविलें. तें वर्तमान खानास कळतांच संभाजी राजियास सूचना करून पळविलें. ते पळून पन्हाळियास आले. हें वर्तमान राजियास पुरंधरास कळतांच संतोष पावून पुत्राचे भेटीस पन्हाळियास आपण आले. मग पितापुत्रांची

---

१५. संगमनेराजवळ मोंगलाच्या फौजेनें शिवाजीस गांठिलें. तेव्हां लढाई होऊन मोंगल हटले. तथापि त्यांस मदत येऊन लगट फार झाला तेव्हां बहिरजीनें मोठ्या शिताबीनें शिवाजीची ह्या संकटांतून सुटका केली. वरील ' पावगड ' हा ' पट्टा ' गड असावा. ह्या गडावर शिवाजीस लुटीसह बहिरजीनं पोंचविल्यावर शिवाजीनें गडाचें नांव ' विश्रामगड ' असें ठेविलें. १६. संभाजीनें एका ब्राह्मणाच्या स्त्रीशीं दुर्वृत्त करण्याचा प्रयत्न केल्यावरून शिवाजीनें त्याची चांगली कानउघाडणी केली, ती संभाजीस रुचली नव्हती. *नांवाजणें=सत्कार करणें, शाबासकी देऊन पोशाख वगैरे देणें. १७. दुई=दुफंळी.

भेट जाहाली. बहूत रहस्य[18] जाहालें. त्या उपरि राजे म्हणूं लागले कीं, "लेंकरा, मला सोडूं नको. औरंगजेबाचा आपला दावा. तुजला दगा करावयाचा होता, परंतु श्रीनें कृपा करून सोडून आणिला. थोर कार्य जालें. आतां तूं ज्येष्ठ पुत्र थोर जालास, आणि सचंतर[19] राज्य कर्तव्य हें तुझ्या चित्तीं आहे असें आपणास कळलें. तर मजला हें अगत्य आहे. तरि तुजलाही राज्य एक देतों. आपले पुत्र दोघेजण, एक तूं संभाजी व दुसरा राजाराम. ऐसियास हें सर्व राज्य आहे, यास दोन विभाग करतों. एक चंदीचें राज्य, याची हद्द तुंगभद्रा तहद कावेरी हें एक राज्य आहे. दुसरे तुंगभद्रा अलीकडे गोदावरीनदीपर्यंत एक राज्य आहे. ऐसीं दोन राज्यें आहेत. त्यास तूं वडील पुत्र, तुजला कर्नाटकीचें राज्य दिधलें. इकडील राज्य राजारामास देतों. तुम्हीं दोघे पुत्र दोन राज्यें करणें. आपण श्रीचें स्मरण करून उत्तर सार्थक करीत बसतों," असें बोलिले. तेव्हां संभाजी राजे बोलिले कीं, "आपणास साहेबाचे पायांची जोड आहे. आपण दूधभात खाऊन साहेबांचे पायांचें चिंतन करून राहीन." असें उत्तर दिधलें. आणि राजे संतुष्ट जाहाले. मग पिता पुत्र बैसून कुल राज्य आपलें देखिलें. कर्नाटक किती आहे व खजीना काय आहे व कारखाने व मुत्सद्दी सरकारकूंन[20] लोक कोण कोण? लष्कर, पागा, शिलेदार किती? सरदार काय काय? गड कोठें? किती? हशम काय? समुद्रांतील जंजिरे, पाणियांतील जाहाजें किती? इसमांचा आकार केला. बितपशीलः— कारखाने अठरा व महाल मुलूख नाना जिन्नसवार संख्या करणें तो केला. बितपशीलः—

### अठरा कारखाने.[21]

| | | | |
|---|---|---|---|
| १ खजीना. | १ जव्हाहीरखाना. | १ अंबारखाना. | १ शरबतखाना. |
| १ तोफखाना. | १ दफ्तरखाना. | १ जामदारखाना. | १ जिरातखाना. |

१८. "हर्ष झाला" पाठांतर. १९. सचंतर=स्वतंत्र, निराळें. २०. "कारकून मोस्तेसर लोक" पाठांतर. मोस्तेजर? २१. ह्या यादीशीं पृष्ठ ७१ टीप ४० मधील याद ताडून पाहावी.

१ मुद्बखखाना. १ उष्टरखाना. १ नगारखाना. १ तालिमखाना.
१ पीलखाना. १ फरासखाना. १ आबदारखाना. १ शिकारखाना.
१ दारूखाना. १ शहतखाना (?)

## बारा महाल.

१ पोतें. १ सौदागीर. १ पालखी. १ कोठी. १ इमारत. १ वहिली.[२२] १ पागा. १ सेरी[२३]. १ दरुनी.[२४] १ थट्टी. १ टंकसाळ. १ छबीना.

## खजीना नाणेंवार व कापड जिन्नसवार बी॥

सुवर्ण ———————————— नाणें.

१००००० गंबॉर[२५] एक लक्ष, २००००० मोहरा दोन लक्ष, ३००००० पुतळ्या तीन लक्ष. १३६४५२५ पातशाही होन. १००००० सतलाम्या एक लक्ष. १००००० इभराम्या एक लक्ष. ४००००० शिवराई[२६] होन. १५००००० कावेरी पाक [होन.] १२७४६५३ सॅणगरी[२७] होन. २५४०३० अच्युतराई होन. ३००४५० देवराई होन. १००४००[२८] रॉमचंद्रराई होन. १००००० गुती होन. २००००० धारवाडी होन. ३००००० फॅलम[२९] नाणेंवार. २००००० प्रलखटी [?] होन. १००००० पाक (व) नाईकी होन. ३००००० आदवणी होन. ५००००० जडमाल होन. १४०००० ताडपत्री होन. १००००० साधें सोनें नग कांबी, वजन खंडी १२॥

## पुरवणी होनांचीं नांवें. (फलम याचे पोटीं).

१ अफरजी. १ त्रिवॉळुरी.[३०] १ त्रिसुळी. १ चंदावरी. १ बिलधरी. १

---

२२. वहिली महाल=रथशाला. २३. सेरी=तृप्ति, समाधान, आराम. २४. दरुनी=अंतःपुर, राणीवसा. २५. 'गाहर' किंवा 'गबरे' असेही पाठ आहेत. २६. यावरून शिवाजीनें आपल्या नांवाचे होन पाडिले होते, असें दिसतें. असा एक होन भा० इ० सं० मंडळांत आहे. शिवराई पैसा आजपर्यंत नजरेस येत होताच. शिवराई रुपये मात्र आढळांत नाहींत. २७. सणगिरी होन कांहीं प्रतींत दिलेले नाहींत. २८. '१०४००' पाठांतर. २९. फलम=एक सोन्याचें नाणें, सुमारें ३ रुपये किंमतीचें. ३०. 'त्रिमलारी' पाठांतर.

उलफकरी. १ महमदशाई. १ वेलुरी. १ कटेराई. १ देवजवळी. १ रामनाथपुरी. १ कुनगोटी.

**रुपये ——————————————— जड जव्हाहीर.**

५००००० रुपये. २००००० आसरपद्या. १०००००० आबाशा. २५००००० दाभोळी कबरी. १०००००० चुली कबरी. ५००००० बसरी कबरी. १०००००० रुपें साधें व मीनगारी व भांडीं नग वजन खंडी ५०. [जवाहीर] १ माणकें. १ पांच.१ वैडूर्यें. १ नीळ. १ पैराज. १ मोतीं. १ पोंवळें. १ पुष्कराज. १ हिरे. एकूण ९.

कापड जरी व साधे व रंगाचें व खुमास जिन्नसवार छपन्न देश व दर्यावरील अजमासें किंमत होन १,००,००,०००
५०,००० निशाणी होन.

धान्यसंग्रह, रससंग्रह, अगणित होता. कोठार व देशांत अमर्याद होती. ——————— कलम.
एकूण चंद्रमे संख्या
२५००५००
५००००० येलुरी[31] होन.

**घोडे-राऊत संख्या पागा सिलेदार १,०५,००० एक लक्ष पांच हजार. तपशील.**

**पागा ४५,००० यांचे सरदार. नांवें:—**

१ हंबीरराव सरनौबत. १ संताजी घोरपडे. १ मानाजी मोरे. येसाजी काटकर. १ संताजी जगताप. १ निंबाजी[32] पाटोळे. १ जेतोजी टकर. १ परसोजी भोंसले. १ गणोजी शिरके. १ बाळोजी काटकर. निळोजी काटे. १ नेतोजी[33] पालकर. १ तुकोजी निंबाळकर. १ गोंदजी जगताप. १ संभाजी हंबीरराव. १धनाजी जाधव. १शामाखान १वाघोजी[34] शिरके. १ हरजी[35] निंबाळकर. १ भवानराव. १ आनंदराव हशमहजारी.

---

३१. ह्या पैक्याच्या यादींत कोठें कोठें फरक पडतो. ३२. 'बिंबाजी' किंवा 'बुवाजी' पा०. ३३. 'नथोजी' प्र० प्रत. ३४. 'राघोजी' पा० ३५. 'मालोजी' पा०.

१ तेलंगराव. १ रुपाजी[३६] भोंसले. १ व्यंकटराऊ खांडकर. १ खंडोजी जगताप. १ उदाजी[३७] पवार. १ रामजी[३८] कांकडे. १ कृष्णाजी घाडगे. १ सावजी मोहिते.—एकूण २९.

शिलेदार व मुलखींचे सुभेदार:—

१ नागोजी बल्लाळ. १ गणेश शिवदेव. १ चंदो हिरदेव. १ नमाजी[३९] शिंदे. १ रामाजी भास्कर. १ बयाजी[४०] गडदरे. १ बाळाजी निळकंठ. १ हिरोजी शेळके. १ त्रिंबक विठ्ठल. १ महादजी नारायण. १ बाळोजी शिवतरे. १ जानराव वाघमारे. १ संक्रोजी माने. १ अमरोजी पांढरे. १ रामाजी जनार्दन. १ मुधोजी थोरात. १ कृष्णाजी भांदडे[४१]. १ बहिरजी[४२] वडगरे. १ चंदो नारायण. १ खेमणी. १ खंडोजी आटोळे. १ राघो बल्लाळ. १ बळवंतराव देवकांते. १ बहिरजी घोरपडे. १ मालोजी[४३] थोरात. १ बाळाजी बहिरव. १ देवाजी उघडे. १ गणेश तुकदेव. १ केरोजी पवार. १ उचाले. १ नरसोजी शितोळे.

हत्ती व हत्तिणी, छावे सुमार १२६०.

पाणियांतील जहाजें आरमारचे सरदार,
१ दर्यासागर १ इब्रामखान.
( दर्या सारंग ? ) १ मायनाईक.

हशम मावळे सरदार असामी १,००,००० यांचे सरदार:—

१ येसाजी कंक सरनोबत[४४]. १ सूर्याजी मालसुरे. १ गणोजी दरेकर. १ मुग्बाजी बेनमणा. १ माल सावंत. १ विठोजी लाड[४५]. १ इंद्रोजी गावडे[४६]. १ जावजी महानलाग. १ नागोजी प्रल्हाद. १ पिलाजी गोळे. १ मुधोजी सोनदेव. १ कृष्णाजी भास्कर. १ कलधोंडे[४७]. १ हिरोजी मराठे.

---

३६. ‘ संताजी ’ पाठांतर. ३७. ‘ दादाजी ’ पा०. ३८. ‘बाबाजी’ किंवा ‘ दादाजी कांकडे. ’ पा०. ३९. ‘नेताजी’ पा०. ४०. ‘रामाजी’ गडदरे पा०. ४१. ‘ जावदेव ’ पा०. ४२. ‘ बहिर्जी मुरग ’ पा०. ४३. ‘ मानाजी ’ पा०. ४४. ‘ दरेकर ’ पा०. ४५. ‘ कवडे पा०. ४६. ‘ गरवडे ’ पा०. ४७. ‘कल-दंड’ पा०.

१ रामाजी मोरे. १ हिरोजी भालदार. १ तुकोजी कडू. १ राम दळवी. १ दत्ताजी इडि ( तु ) लकर. १ पिलाजी सणस. १ जावजी पाये. १ भिकजी दळवी. १ कोंडजी वडखले. १ त्रिंबकजी प्रभू. १ कोंडजी फरजंद. १ तानाजी तुंदुसकर[४८]. १ तानसावंत मावळे. १ महादजी फरजंद. १ येसजी दरेकर. १ बाळाजीराव दरेकर. १ सोन दळवे. १ चांगोजी कडू. १ कोंडाळकर. १ ढवळेकर. १ तानसावंत भोंसले. एकूण ३६.

## गड[४९], कोट, जंजिरे व देशांतील जंजिरे, गड, कोट बितपशील.

१ कोंढाणा ऊर्फ सिंहगड. १ घनगड[५०]. १ येलबर्गागड. १ रांगणा ऊर्फ प्रसिद्धगड. १ लिंगाणा. १ चंदन. १ मसीतवाडे ऊर्फ मानगड. १ जयगड. १ लोहगड. १ कोट फोंड. १ कोट लावड. १ रसाळगड. १ हडपसर ऊर्फ पर्वतगड. १ कोट केचर. १ सातारागड. १ परळीगड ऊर्फ सज्जनगड. १ वल्लभगड. १ जवळेगड. १ हरुषगड. १ कुरडू ऊर्फ मंदरगड. १ सालोभागड. १ रोहिडा. १ मदगिरिगड. १ जिवधण. १ कोट मंगळूर. १ कोपलगड. १ कोट कुष्टगी. १ पन्हाळागड. १ नौबतगड. १ कोटसुपें. १ पुरंदरगड. १ पाली ऊर्फ सरसगड. १ अचलागिरीगड. १ भोरप ऊर्फ सुधागड. १ कोट अंकोलें. १ पांडवगड. १ वंदन. १ कोट शिवेश्वर. १ खेळणा ऊर्फ विशाळगड. १ त्रिंबक ऊर्फ श्रीगड. १ कोट हलियाळ. १ बहादूरगड. १ तानवडा. १ सालेरीगड. १ मनोहरगड. १ अहिवंतगड. १ ठकरीगड. १ माहुलीगड. १ चाउड ऊर्फ प्रसन्नगड एकूण[५१] ४९.

---

४८. 'मंदुसरा' पाठांतर. ४९. गड=डोंगरी किल्ला. कोट=मैदानांत पायापासून बांधिलेला. जंजिरा = समुद्रांतील किंवा समुद्रानजीकचा. ५०. 'धनगड' पाठांतर. ५१. याशिवाय दुसरे प्रतींत नांवें सांपडतात तीं.—केदारकोट, कोरागड, कासेगड, कोलजागड, कनकगड, कोहीमगड, कोठारगड, कंकणीगड, कृष्णागिरीकोट, कुलागड, कैहातकोट, कुडाळकोट, कडवरीगड, कारडीगड, कोचनागड, कल्याणगड, नागिरीगड, नांदगिरीगड ऊर्फ कल्याण, नळदुर्ग,

( पुढें चालू. )

## नवे राजियांनीं गड वसविले त्यांची नांवनिशीवार सुमारी. सुमार १११.

१ राजगड चारी माच्या. १ तोरणा ऊर्फ प्रचंडगड. १ केळजा. १ वैराटगड. १ कमलगड. १ वर्धनगड. १ प्रतापगड. १ कांगोरी ऊर्फ मंगळगड १ गहनगड. १ पताकागड. १ पद्मागड. १ सुभकरगड. १ सबलगड. १ बहिरवगड ऊर्फ सारंगा. १ गगनगड ऊर्फ बावडा. १ सारंगगड. १ सुरगड. १ जंजिरे विजयदुर्ग. १ जंजिरे सिंधुदुर्ग. १ जंजिरे खांदेरी. १ पावनगड. १ पारगड. १ भिंवगड (भीमगड). १ भूधरगड. १ राजगड. १ सहन ( ज ) गड. १ नाकगडगड. १ लोणजागड. १ काचणागड. १ सिदीचागड. १ वसंतगड. १ सुंदरगड. १ महीमानगड. १ मच्छंद्रगड. १ व्यंकटगड. १ माणिकगड. १ लोकलगड (कलोल ?). १ कोथळागड. १ श्रीवर्धनगड. १ कमरगड. १ वासोटा ऊर्फ व्याघ्रगड. १ खोलगड. १ प्रचितगड. १ प्रौढगड. १ वनगड. १ नरगुंदगड महद्गड. १ रामदुर्ग ऊर्फ भुजबळ. १ बालेराजा. १ अंजनवेली. १ सरगड. १ मुरगोड. १ श्रीमंतगड. १ गजेंद्रगड. १ कोट येळूर. १ कनकाद्रिगड. १ रवळागड.

---

( मागील पृष्ठावरून समाप्त. )

तरूगड, देवगड, गुणवंतगड, गंधर्वगड ऊर्फ भुजबळ, ढालगड, चंद्रगड, चतुरगड, चा ( र ) दीगड, रायगड तक्ताची जागा, रत्नगड, राजहंसगड, राजमाचीगड, हसूरकोट, हेमाद्रीगड, हंसगड, सुधाकरगड, सुंदरगड, सिंधुदुर्ग जंजिरा, सुगाणागड, सबळगड, सामत्रागड, सिंहगड, सज्जनगड, सेरगागड, सुमारगड, येशवंत दुर्ग, व्येंद्रगड, वरूपगड, विदांविद्गड, विश्वासी ईश्वरकोट, शरगागड, शेवळगड, माचणागड, मंगलगड, कांगोरी, महीधरगड, महानगड, मानाडगड, मत्तगड, मृगंगड, ( पिटकड ! ) महोगड, महीतळीगड, मित्रगड, मकरंदगड, भोरगिरी, भिलवडी, भुजबळगड, भूपाळगड, भद्रगड, प्रचितगड, पराक्रमगड, पाराशरदनाम, पैना ( जा ) रगड, प्रल्हादगड, पहारगड, बीरकोट, बळराजगड, बाळाकोट. यांपैकीं कांहीं नांवें मागील यादींत आलीं आहेत.

दा. त. ८८४२ ५२६५

१ नाचणागड. १ रामसेजगड. १ रुद्रमाळगड. १ समानगड. १ वल्लभगड. १ महीपालगड. १ मयोरगड ऊर्फ नवलगुंद. १ पद्मगड. १ सोनगड. १ कुंजरगड. १ तुंगगड ऊर्फ कठीणगड. १ महीपतगड. १ मदनगड. १ कांगोरीगड. १ वारूगड. १ भूषणगड. १ कोट बोटगीर. १ कंबल गड. १ मंगलैगड[52]. १ स्वरूपगड. १ ढोलागड. १ मनरंजनगड. १ बहुलगड. १ महींद्रगड. १ रजेगड. १ बळवंतगड. १ श्रीगलडवगड. १ पवित्रगड. १ कलानिधीगड. १ गंधर्वगड. १ सुमनगड. १ गंभीरगड. १ मंदरगड. १ मर्दनगड. १ दहीगड. १ मोहनगड. १ गडागड. १ वीरगड ऊर्फ घोसाळा. १ तिकोना ऊर्फ वितंडगड. १ जंजिरे सुवर्णदुर्ग. १ जंजिरे रत्नागिरी. १ राजकोट. १ सेवणागड. १ सेवकगड. १ कोहजगड. १ कठोरगड. १ भास्करगड १ कपलगड. १ हरिश्चंद्रगड. १ जंजिरे कुलाबा. १ सिद्धगड. १ मंडणगड.—एकूण सुमारें १०८[53].

## कर्नाटक प्रांतींचे गड केले नवे एकूण सु॥ ७९ बितपशील :—

## कोल्हार, बाळापूर—वरघाट.

१ कोल्हार, बाळापूर भोर. १ नंदीगड. १ चंदनगड. १ ब्रह्मगड. १ गणेशगड. १ श्रीवर्धनगड. १ वज्रगड. १ मर्दनगड. १ कोट बिदनूर. १ भास्करगड. १ पिपला ऊर्फ प्रकाशगड. १ कोट ढमकूर. १ कोट कोलार कदीम. १ दुर्गमगड. १ भीमगड. १ सरसगड. १ अहिनिजादुर्ग. १ कट्टरगड. १ मकरंदगड. १ बुरवडैगड[54]. १ सोमशंकरगड. १ हातमलगड. १ भूमंडणगड. १ मेज कोल्हारगड. १ महीपालगड. १ भीमगड नजीक कपशेरी. १ बुंदीकोट. १ कोट एलूर. १ कैलासगड. १ महीमंडणगड. १ अर्जुनगड. १ अर्काटगड. १ पडवीरगड. १ भंजनगड. १ राजगड चंदी.

---

५२. 'मनगड' पाठांतर. ५३. वर सुमार १११ म्हटलें आहे, परंतु मोजिले असतां १०८ च भरतात. महाड प्रतींत ८३।८४च दिले आहेत. ५४. 'बरुट कोट' पाठांतर.

१ मदोन्मत्तगड चंदी. १ मुखणे गड कोटवेल. १ भातुर. १ पाले कोट.
एकूण ३८.

### घाटाखालीं गड कोट.

१ पतनगदनेगड. १ जगदेवगड. १ केवळगड. १ गगनगड. १ मदगड. १ कस्तुरीगड. १ रत्नगड. १ प्रबळगड. १ मार्तंडगड. १ कृष्णागिरी चंदी. १ शारंगगड चंदी. १ लागगड चंदी. १ कोट त्रिचंदी. १ सुदर्शनगड. १ महाराजगड. १ कृष्णागिरीगड. १ रंजनगड. १ शिँदगड. १ मल्लकार्जुनगड. १ प्राणगड. १ कुंजरगड. १ आरकोटगड. १ कर्नाटकगड. १ बिगेवाँळुंगड. १ बहिरवगड. १ कोटसुभा. १ मनगड. १ कोट त्रिकळूर. १ बेटवल ऊर्फ केमल. १ विशाळगड. १ कोट त्रिमल. १ चेलगड चंदी. १ गर्वगड चंदी. १ कोट देवणा पाटी. १ रामगड. १ चिंताहर कोट. १ वृद्धाचल कोट. १ चवीकोट. १ निलसाजित गड. १ यशवंत गड. १ देवगड. एकूण ४१.
एकंदर गड बेरीज ७९[५७].

### एकंदर गड बेरीज.

५० प्रथम पन्नास. १११ नवे राजियांनीं वसविले. ७९ कर्नाटक प्रांतींचे. एकूण[५८] २४०.

एणेंप्रमाणें आपलें राज्य सालेरी किल्यापासून गोदावरी नदी अलीकडे कुल देश वरघाट तळघाट तुंगभद्रा पावेतों हा एक प्रांत, व तुंगभद्रे

---

५५. 'शीरगड' पांठातर. ५६. 'बींगपल्ली दुर्ग' पाठांतर. ५७. ह्या खेरीज आणखी नांवें दुसऱ्या प्रतींत आढळतात तीं हीं:—१ कोंडापूरकोट. १ कराडकोट. १ काणणूर. १ कामकोट. १ गोकाककोट. १ गोजरीगड. १ भवानीदुर्ग. १ धर्मपुरीकोट. १ धरापूरकोट. १ जवादीगड. १ प्रमोदगड. १ त्रिचनापूर. १ कोट. १ तळगिरीकोट. १ त्रिवेलीकोट. १ माणिकगड. १ मृगांकगड. १ मनोहरकोट. १ मिरजकोट. १ मंगळगड. १ बागलकोट. १ खळागड. १ रायदुर्ग. १ विराटकोट. १ सोजिरागड. १ शिरोळगड. १ शामलकोट. ५८. महाड प्रतींत ३२३ व दुसऱ्या एका जुन्या यादींत ३६४ असें आहे. प्रतापगड प्रतींत २४० असें आहे; पण मोजिले असतां ४९+१०८+८०=२३७ च भरतात.

पलीकडे देखील[५९] कोल्हार, बाळापूर, चंदी, येलूर सरद कावेरी पावेतों हा एक प्रांत. असे दोन प्रांत मिळून एक राज्य आहे. ऐशी तजवीज करून संभाजी राजियास पन्हाळ्यास ठेविलें. त्याजवळ जनार्दन नारायण सरकारकून व सोनोजी नाईक बंकी व बाबाजी ढमढेरे असे ठेविले. आणि पुत्राचें समाधान केलें कीं, " आपण रायगडास जातों. धाकटा पुत्र राजाराम याचें लग्न करून येतों. मग राज्यभाराचा विचार कर्तव्य तो करूं. तूं वडील पुत्र आहेस. सर्व प्रकारें भरंवसा तुमचा." असें बोलून रायगडास गेले.

धाकटा पुत्र राजाराम यास वधू पाहातां प्रतापराव पूर्वील सेनापती होते त्यांची कन्या नवरी नेमस्त केली, आणि लग्न सिद्धीतें पावविलें. वधूचें [ नांव ] सौभाग्यवती जानकीबाई असें ठेविलें. मोठा महोच्छाह केला. दानधर्म अपार केले.

मग कांहीं दिवसांनीं राजास व्यथा ज्वराची जाहाली. राजा पुण्यश्लोक, कालज्ञान जाणे. विचार पाहातां आयुष्याची मर्यादा जाली असें कळून जवळील कारकून व हुजरे लोक होते त्यांमध्यें सभ्य, भले लोक बोलावून आणिले. बितपशील :–

कारकून—१ निळोपंत प्रधानपुत्र. १ प्रल्हादपंत. १ गंगाधरपंत, जनार्दनपंताचे पुत्र. १ रामचंद्र निळकंठ. १ रावजी सोमनाथ. १ आबाजी महादेव. १ जोतीराव. १ बाळप्रभू चिटणीस.

हुजरे लोक–१ हिरोजी फरजंद. १ बाबाजी घाडगे. १ बाजी कदम. १ मुधोजी सरखवास. १ सुर्याजी मालुसरा. १ महादजीनाईक पानसंबळ.

असे मातबर लोक जवळी बोलावून आणिले. मग त्यांस सांगितलें कीं, " आपली आयुष्याची अवधी जाली. आपण कैलासास श्रीचे दर्शनास जाणार. शरीर क्षीण देखून पन्हाळियावरि संभाजी राजे वडील पुत्र यांस सांगितलें [होतें] कीं, 'तुम्ही दोघे पुत्र आपणास यांस राज्य वांटून देतों. आणि उभयतां सुखरूप राहाणें.' म्हणोन सांगितलें. परंतु वडील पुत्र

---

५९. देखील कोल्हार इ०=कोल्हार इ० सुद्धां, सहित.

संभाजी राजे यांनीं ऐकिलें नाहीं. शेवट आपला तो निदानसमय दिसताहे. राज्य म्यां शिवाजीनें चाळीस हजार होनाचा पुणें महाल होता, त्यावरि एक क्रोड होनाचें राज्य पैदा केलें. हे गड, कोट व लष्कर पागा ऐसें मेळविलें. परंतु मज माघारें हें राज्य संरक्षण करणार ऐसा पुत्र दिसत नाहीं. कदाचित धाकटा *कुंवार राजाराम वांचला तर तो एक हें राज्य वृद्धींतें पाववील. संभाजी राजे वडील पुत्र जाणता आहे, परंतु बुद्धी फटकॅळ[६०] आहे. अल्पबुद्धी आहे. त्यास काय करावें ? आपण तो प्रयाण करतों. तुम्ही कारकून व हुजरे मराठे कैदीम[६१] या राज्यांतील आहां. तुम्हांस या गोष्टी कळल्या असाव्या. आपणांमाघारें संभाजी राजे पराक्रमानें राज्य सर्व आटोपतील. लष्करही थोरला राजा संभाजी म्हणून त्याजकडे डौल देऊन मिळतील. राजाराम धाकटा म्हणून याजकडे लष्कर येणार नाहीं. सरकारकून राजारामाचा पक्षपात करून उभयतां बंधूंस राज्य वांटून दोन राज्यें करूं म्हणतील. शेवट लष्करचे मराठे कारकुनांचे विचारांत येणार नाहींत. शेवट अवघे सरकारकुनांसि विश्वास देऊन धरतील. संभाजी राजे हे आपले वेळचे थोर थोर ब्राह्मण यांस मारील. ब्राह्मणहत्या करील. पुढें मराठे यांस लष्करचे सरदारांसही मारील, धरील, इजत घेईल. लहान माणसें, गुलाम, यांचा पगडा पडेल, आणि थोर लोकांची चाल मोडील. संभाजी कैफ खाईल, गांज्या ओढील, इषकबाजी करील. गड-कोट-देशामध्यें अनाइक[६२] होईल. राजा परामृष करणार नाहीं. द्रव्य खजीना सर्व उडवील. सर्व राज्य गमावील. संभाजीचे गूण ऐकून औरंगजेब दिल्लीहून चालून येईल. भागानगर, विजापूर मोंगल घेईल. हें राज्यही घेतील, आणि संभाजी शेवट दगा खाईल. जे गती मलिक अंबर निजामशाहा त्याचो पुत्र फत्तेखान[६३] मलिका माघारां जाहाला, आणि पातशाही बुडविली, तैशीच

*कुंवार, कुंवर=कुमर. ६०. 'अनीतीची' पाठांतर. ६१. कदीम=जुने, फार दिवसांचे. ६२. अनाइक=अनायक, अनायकी. ६३. मलिकंबर यानें मोंगलांपासून पुष्कळ वर्षें अहंमदनगरचें राज्य बचाविलें (१५९९-१६२६). पुढें त्याचा

(पुढें चालू.)

संभाजी राजा करील. मग राजाराम राज्य करूं लागेल. तेव्हां गमाविलें राज्य साधील. मजपेक्षां पराक्रम विशेष करील. हीं पुत्रांचीं लक्षणें. आतां कारकुनांमध्यें माझे वेळचे थोरले कारकून यांस तो संभाजी वांचू देणार नाहीं. त्यांपैकीं एक प्रल्हादपंत निराजीपंताचे पुत्र व रामचंद्रपंत निळोपंताचे पुत्र हे दोघे ब्राह्मण पराक्रमी होतील. निळोपंत, प्रधानाचा पुत्र, हाही नांव धरील. या वेगळे कोणी होणार होतील. मराठ्यांमध्यें बहुतेक संभाजी मोडील. उरल्या पैकीं संताजी घोरपडे व बहिरजी घोरपडे व धनाजी जाधव हे जरि वांचले तरि हे तिघे मोठे पराक्रम करतील. मोडिलें राज्य हे तिघे ब्राह्मण व तिघे मराठे सांवरतील[६४] ". असें बोलले. येणेंप्रमाणें राजे बोलिले सर्वांचे कंठ दाटून नेत्रांपासून उदक स्रवूं लागलें. परम दुःख जालें. त्या उपरि राजे बोलिले कीं, " तुम्ही चुकूर होऊं नका. हा तो मृत्युलोकच आहे. या मागें किती उत्पन्न जाले तितके गेले. आतां तुम्ही निर्मळ सुखरूप बुद्धीनें असणें. आतां अवघे बाहेर बैसा. आपण श्रीचें स्मरण करतों," म्हणोन अवघियांस बाहेर बसविलें. आणि राजियांनीं श्रीभागीरथीचें उदक आणवून स्नान केलें. भस्मधारण करून रुद्राक्षधारण केलें. आणि योगाभ्यास करून, आत्मा ब्रह्मांडास नेऊन, दशद्वारें फोडून प्राणप्रयाण केलें. शालिवाहन शके १६०२, रौद्रनाम संवत्सरे, चैत्र शुद्ध[६५] १५, रविवारीं दोन प्रहरीं काळ रायगडीं जाला. त्या नंतर शिवदूत विमान घेऊन आले, आणि [ राजे ] विमानीं बैसून कैलासास गेले. हें जड शरीर, [ त्यांचा ] मृत्युलोकीं त्याग केला.

राजियाचें देहावसान जालें ते दिवशीं पृथ्वीकंप जाहाला. गगनीं धूमकेत उदेला. उल्कापात आकाशाहून जाला. रात्रीं जोड-इंद्रधनुष्यें निघालीं.

---

( मागील पृष्ठावरून समाप्त. )

मुलगा फत्तेखान ह्यानें आपल्या राजास मारून तें राज्य मोंगलांचे स्वाधीन केलें ( १६३७ ). ६४. हे तिघे ब्राह्मण व तिघे मराठे राजारामाच्या वेळीं प्रमुख होते, हें सुप्रसिद्ध आहे. ६५. ही मिती महाड प्रतींत मात्र आहे.

अष्टदिशा दिग्दाह होऊन गेल्या. श्रीशंभुमहादेवीं तळ्याचें उदक रक्तांबर जालें. पाण्यांतील मत्स्य बाहेर पडून §अमावसणी ? उदक जाहालें. ऐशीं अरिष्टें जाहालीं. मग राजियाचें कलेवर चंदनकाष्टें व बेलकाष्टें आणून दग्ध केलें. स्त्रिया राजपत्न्या, कारकून व हुजरे सर्व लोकांनीं सांगितलें कीं, धाकटा पुत्र राजाराम यानीं क्रिया करावी. सर्वांनीं खेद केला. राजाराम यांनीं अत्यंत शोक केला. त्या नंतर उत्तरकार्य कनिष्ठानीं करावें असें सिद्ध केल. वडील पुत्र संभाजी राजे वेळेस नाहींत, याजकरितां धाकट्यांनीं क्रिया केली. ऐसें राजियाचें चरित्र-आख्यान उत्पन्न काळापासून देहावसानापर्यंत जाहालें.

राजा साक्षात केवळ अवतारीच जन्मास येऊन पराक्रम केला. नर्मदापासून रामेश्वरपर्यंत द्वाही फिरली. देश काबीज केला. अदलशाही, कुतुबशाई, निजामशाई, मोंगलाई ह्या चारी पातशाह्या व समुद्रांतील बेवीस* पादशाहा असे जेर जप्त करून, नवेंच राज्य साधून मराठा पातशाहा सिंहासनाधीश छत्रपती जाहाला. प्रतिइच्छा [६६]मरण पावून कैलासास गेला. ये जातीचा कोणी मागें जाहाला नाहीं. पुढें होणार नाहीं. असें वर्तमान महाराजांचें जाहालें. कळलें पाहिजे.

चरित्र पुण्यश्लोक राजियाचें जे घरीं लिहून ठेवतील त्यांच्या भाग्यास पारावार नाहीं, व जे वाचतील त्यांस मोठें पुण्य जोडेल. निपुत्रियांस पुत्र होतील व दरिद्रियांस लक्ष्मीवंत होतील व अपेशियांस यशवंत होतील व पुण्यश्लोकं पराक्रमी होतील. जे पुत्रवंत असतील त्यांसही पुत्र होतील. जे लक्ष्मीवंत असतील ते विशेष भाग्यवंत होतील. यशस्वी असतील ते दिग्विजयी होतील. येणेंप्रमाणें सर्व मनोरथ पूर्ण होतील. बरें समजणें. ही बखर संपूर्ण जाहाली. चैत्र शुद्ध प्रतिपदा ते दिवशीं वर्णन समाप्त [६७]जाहालें.

§ अमासवणी = मासे मरून पडल्यामुळें खराब, दुर्गंधी झालेलें * मागें पृष्ठें ८५ व ६७ हि. ६६. इच्छेस येईल त्यावेळीं देहावसान करण्याचा वर मागें भीष्मास होता. ६७. 'ते दिवशीं राजा कैलासवासी जाला.' असें प्रतापगड प्रतींत आहे, तें चुकीचें आहे.

ईश्वर संवत्सर. मुकाम चंदी. शालिवाहन शके १६१६ [ त ] जाहाली कळलें पाहिजे. बहूत काय लिहिणें ? हे विनंती.

**समाप्त.**

---

## परिशिष्ट, १

शिवाजीनें रायगडीं राजवाड्याबरोबरच 'जगदीश्वराचें' देवालय बांधिलें. त्या देवालयाच्या महाद्वाराच्या आंत शिरतांना डाव्या बाजूच्या सुमारें १॥ हात लांबीच्या व १। हात रुंदीच्या चिऱ्यावर खालीं दिलेले दोन श्लोक लिहिलेले आहेत. ते आम्हांकडे आमच्या दोन महाडकर मित्रांनीं पाठविले. त्यांची एक प्रत आम्हांस एका जुन्या दफ्तरांतही सांपडली होती. ह्या तिहींची तुलना करून ते श्लोक येथें देऊं.

प्रासादो जगदीश्वरस्य जगतामानन्ददोऽनुज्ञया
श्रीमच्छत्रपतेः शिवस्य नृपतेः सिंहासने तिष्ठतः ।
शाके षण्णव[1]-बाण-भूमिगणनादानन्दसंवत्सरे
ज्योतीराजमुहूर्त कीर्तिमहिते शुक्लेश सार्पे तिथौ ॥ १ ॥
वापी-कूप-तडाग-राजि-रुचिरं रम्यं वनं वीतिकें[2]
स्तंभैः कुंभिगृहे नरेंद्रसदनै[3]रभ्रंलिहै र्मीहिते (?)
श्रीमद्रायगिरौ गिरामविषये ही[4]राजिना निर्मितो[5]
यावच्चन्द्रदिवाकरौ विलसतस्तावत्समुज्जृंभते[6] ॥ २ ॥

---

## परिशिष्ट २

शिवाजीच्या राजमुद्रेवर म्हणजे शिक्क्यावर श्लोक होता तो येणेंप्रमाणेः—

---

६८. सर्व प्रतींत ईश्वर संवत्सर व १६१६ शक असेंच आहे. १. षण्णव-बाणभूमिगणना=१५९६. २. "वीतिकों" असें मूळांत आहे. ३. 'सदने रम्यं लिहै रीहिते' असें मूळांत आहे. ४. 'हिराजी' हा ह्या कामावरील मेस्त्री [एंजिनियर] असें होतें. ५. "निर्मिते" असें मूळांत आहे. ६. समुज्जृभताम् ?

॥ राजमुद्रा ॥

प्रतिपच्चन्द्ररेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता
शाहसूनोः शिवस्यैषा मुद्रा भद्रायरांजते ॥

---

## परिशिष्ट ३.

### शिवाजीची छोटी वंशावळ.

१. बाबाजी [ वेडसर ] जन्म १५३३ ईसवी सन
२. मालोजी [ १५५२–१६१९—विठोजी.

३ शाहाजी—शरफजी आठ पुत्र. वंश पुणें प्रांतीं.
ज० १५९४–१६६४. मृ०

४ संभाजी शिवाजी शककर्ते वेंकाजी संताजी.

मृत १६३७. जन्म *१६२७. तंजावरकर. ( राखपुत्र. )

राज्य १६७४–१६८०.

५ संभाजी§ §राजाराम

राज्य १६८०–१६८९ राज्य १६८९–१७००

---

७. "शाहासुतस्य मुद्रेवं शिवराजस्य राजते" पाठांतर. * अलीकडील शोधावरून जन्म १६२९ मध्यें झाला असें सिद्ध होऊं पाहात आहे. शके १५५१, शुक्ल संवत्सर, फाल्गुन व॥ ३, शुक्रवारीं मध्य रात्रीं शिवनेरीस जन्म झाला. भा० इ० सं० मंडळाचें त्रैमासिक, शके १८४३ अंक १ ते ४. § संभाजी व राजाराम ह्या पुत्रांशिवाय शिवाजीस दोन कन्याही होत्या. एक शिरक्यांकडे व दुसरी निंबाळकरांकडे दिली होती.

ह्या पुरुषांबद्दल आणि स्त्रियांबद्दल विशेष माहिती.

१. मालोजीनें शाहाशरीफ नांवाच्या नगर येथील एका पिरास पुत्र व्हावा म्हणून नवस केला होता. पुत्र झाल्यावर त्या पिराचीं नांवें आपले मुलांस दिलीं. पण रा० राजवाडे म्हणतात, ‘ सिंह ’ पासून शाहाजी व ‘ शरभ ’ पासून शरफजी अशीं नांवें पडलीं असावीं !

२. मालोजीची स्त्री दीपाबाई म्हणून होती. ती फलटणचे वंगोजी ऊर्फ जगपाळराव निंबाळकर यांची बहीण होय.

३. शाहाजीची पहिली बायको जिजाबाई ही सिंधखेडकर लखुजी जाधवराव यांची कन्या. हिचा जन्म इ० स० १५९६ त झाला व विवाह इ० स० १६०४ त झाला. ही इ० स० १६७४ त मुलाचा राज्याभिषेक पाहून मृत्यू पावली. हिला संभाजी व शिवाजी हे दोन पुत्र होते. शाहाजीची दुसरी बायको तुकाबाई ही पोगरवाडीकर बाजी मोहित्याची कन्या. हिला व्यंकोजी म्हणून पुत्र होता. तो चंदीचंदावरचा राजा झाला. शाहाजीची एक नाटकशाळा होती तिला संताजी म्हणून पुत्र झाला.

४. शिवाजीची पहिली बायको सईबाई ही निंबाळकरांची कन्या. हिचा विवाह इ० स० १६३७ त झाला व ती इ० स० १६५९त वारली. हिचा पुत्र संभाजी, याचा जन्म इ० स० १६५७ त झाला. शिवाजीची दुसरी बायको सोयराबाई. ही शिरक्यांची कन्या. तिचा पुत्र राजाराम. तिचा संभाजीनें इ० स० १६८०त वध केला. शिवाजीची तिसरी बायको पुतळाबाई. ही मोहित्यांची कन्या शिवाजी मृत झाल्यावर इ० स० १६८० त सती गेली. शिवाजीच्या ४ थ्या बायकोचें नांव कोठें आढळत नाहीं.

५. संभाजीची बायको येसूबाई ही मळेकर पिलाजी शिरक्याची कन्या. हिचा पुत्र शिव ऊर्फ शाहू हा इ० स० १६८० त जन्मला. संभाजीची एक नाटकशाळा होती तिच्या पुत्राचें नांव मदनसिंग होतें.

६. राजाराम यास चार बायका होत्या. १ जानकीबाई, प्रतापराव गुजर यांची कन्या. २ ताराबाई, मोहित्यांची कन्या. ३ राजसबाई व ४ अंबिकाबाई. ताराबाईचा जन्म इ० स० १६७५ त झाला व ती इ० स० १७६१ त वारली. तिचा पुत्र शिवाजी हा वेडसर होता. त्याचा जन्म इ० स० १६९०त

झाला होता व तो इ. स० १७२० त मृत्यू पावला. त्याच्या बायकोचें नांव भवानीबाई होतें. तिच्या पुत्राचें नांव रामराजा असें होतें. तिला दुर्गाबाई व कृष्णाबाई अशा दोन कन्या होत्या. ह्या रामराजाचा जन्म इ० स० १७२० मध्यें झाला. राजारामाची तिसरी बायको राजसबाई हिला संभाजी म्हणून एक पुत्र होता. तो पुढें कोल्हापूरचा राजा झाला. राजारामाची चवथी बायको अंबिकाबाई ही विशाळगडीं राजारामाच्या पागोट्याबरोबर सती गेली. तिला एक कन्या होती. खेरीज सगुणाबाई म्हणून राजारामाची नाटकशाळा होती, तिला कर्ण म्हणून एक पुत्र होता.

## परिशिष्ट ४.

क्षत्रियकुलावतंस श्रीमन्महाराजाधिराज शिवाजी महाराज छत्रपती यांचा काल शके १६०२, चैत्र शुद्ध १५, या दिवशीं रायगड येथें झाला. देहाचें सार्थक त्यांनीं बांधिलेला जगदीश्वराचा जो प्रासाद, त्याच्या महाद्वाराच्या बाहेर दक्षिणभागीं केलें. तेथें काळ्या दगडाच्या चिऱ्यांचें जोतें अष्टकोनी सुमारें छातीभर उंचीचें बांधिलें असून वरून फरसबंदी केलेली आहे. फरसबंदीच्या खालीं पोकळी आहे, तींत महाराजांचा अवशिष्टांश रक्षामिश्र मृत्तिकेच्यारूपानें सांपडतो. ह्या जोत्यावर छत्री ( वृंदावन ) बांधण्याचा मूळचा विचार असावा. परंतु महाराजांच्या पश्चात जी धामधूम चालली होती, त्या धामधुमीमुळें तें काम सिद्धीस गेलें नाहीं असें दिसतें. फरसबंदीचे २।३ चिरे कोणी द्रव्यलोभानें अलीकडे उचकून काढलेले आहेत. महाराजांच्या अवशिष्टांशाची ही शोचनीय स्थिती 'मराठे' म्हणून घेणाऱ्या सर्व जनसमूहास लाजवीत आहे.*

---

* अलीकडे मुंबई सरकारानें ह्या अष्टकोनी जोत्याची दुरुस्ती, साफसुफी व बंदोबस्त चांगला ठेविला असल्याचें समजतें. हें त्यास भूषणास्पद होय.

महाराजांची छत्री बांधण्याचा व जगदीश्वराच्या देवालयाचा जीर्णोद्धार करण्याचा बेत मध्यंतरी झाला होता, तो अद्याप तसाच राहिला आहे. ह्या कामांकरितां शिवाजी फंड (निधी) बराच जमला तो 'धी डेक्कन बँक, पुणें.' या पेढीवर ठेविला होता. ती पेढी बुडल्यामुळें रुपयास ०९ द्यावे असें ठरलें आहे.